म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.

भारत-गौरव ग्रंथमाला

# कर्मवीर
# हेन्री फोर्ड

लेखक—

गोविंद विष्णु पेठे, एम. ए.

RT FBK 6003879

पुष्प ८४ वे.

सं. च. नं. ३०८
ता. २८-६-३०

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०१०
ठाणे

[illegible]

३८८

१८५१
७६८

११४८



कर्मवीर हेन्री फोर्ड

भारत-गौरव-ग्रंथमाला, पुष्प ८४ वें.

# कर्मवीर हेन्री फोर्ड

## यांचें चरित्र.



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगवान् श्रीकृष्ण.

REFBK-0003879

**गोविंद विष्णु पंठे, एम्. ए.**

हेडमास्तर, अक्कलकोट हायस्कूल, अक्कलकोट.

साधी १४ आणे ] किंमत [ कापडी १ रु. २ आ.

प्रकाशक
मंगेश नारायण कुळकर्णी,
मालक,
भारत-गौरव-ग्रंथमाला,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

मुद्रक
मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस, ३१८ ए,
ठाकुरद्वार, मुंबई. नं. २.

# प्रस्तावना.

आपल्या राष्ट्राची, भरतभूमीची, खरी प्रगति व्हावयास पाहिजे असल्यास पुस्तकी ज्ञानाबरोबरच नीतिमत्ता, दीर्घोद्योग, सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, धाडस, न्यायप्रियता, सात्विक महत्वाकांक्षा इत्यादि सद्गुणांचा उत्कर्ष सामान्य जनतेच्या ठिकाणींही व्हावयास पाहिजे. समाजांतील एकादी व्यक्ति थोर झाली, म्हणून तेवढ्यानें सकल समाजाची उन्नति झाली, असें होत नाहीं. धूमकेतूसारखा एकादा तेजोनिधि तारा कांहीं काल प्रकाशला आणि दिवंगत झाला, तर त्यामुळें नित्याच्या काळोखाचें भयाण रूपच जास्त प्रत्ययाला येतें. म्हणून सामान्य लोकांमध्यें वरील गुणांचा उदय ज्यायोगें होईल, त्या गोष्टी करण्याकडेच विचारी माणसांचें लक्ष लागलें पाहिजे.

वरील उद्दिष्ट साध्य होण्यासाठीं आपल्याकडे सध्यां अनेक प्रकारचे प्रयत्न होत आहेत, ही गोष्ट भावी उदयाचें पूर्वचिन्ह आहे, यांत संशय नाहीं. अशा प्रकारच्या लोकशिक्षणासाठीं कादंबरी, काव्य, नाटक, इतिहास वगैरे वाङ्मयाचें प्रत्येक अंग अत्यंत उपयोगी आहे हें निर्विवाद आहे. आणि सुदैवानें मराठी वाङ्मयांत तसल्या प्रकारची भर पुष्कळ पडत आहे, हेंही खरें आहे. परंतु वर सांगितलेल्या कामीं चरित्रग्रंथांची उपयुक्तता कांहीं विशेष आहे. कुशल कादंबरीकार गुंतागुंतीच्या रचनाकौशल्यानें, आणि हृदयस्पर्शी प्रसंगांच्या यथातथ्य वर्णनानें, मनुष्यस्वभावाचे अनेकविध मासले वाचकासमोर मांडतो. हृदयांमध्यें प्रत्यहीं होणाऱ्या भावनांच्या कालवाकालवीचें उत्कृष्ट चित्र तो जगापुढें ठेवतो. सुष्ट दुष्ट माणसांकडून विलक्षण उदात्त किंवा भयानक कृत्यें करवून तो आपणाला हसवितो किंवा रडवितो. पण कादंबरी वाचतांना प्रत्येक वाचकाला अशी जाणीव असते कीं, हे सर्व कल्पनेचे खेळ आहेत. कादंबरी वाचतां वाचतां, वाचक गुंग होऊन जाईल किंवा तो देहभान विसरेल हें खरें, पण कादंबरी वाचून संपल्यानंतर नायकाच्या किंवा नायिकेच्या अलौकिक कृत्याबद्दल त्याला एकसारखें कौतुक वाटत राहणार नाहीं, किंवा या धकाधकीच्या मामल्यांत मनुष्याला मनुष्याविषयीं कांहीं कर्तव्य करावयाचें असतें याची जाणीवही उत्पन्न होणार नाहीं.

पण चरित्रवाचनाची गोष्ट तशी नाहीं. चरित्रग्रंथाचा नायक आपल्याचप्रमाणें ह्या दृश्य जगांत वावरणारा हाडामासाचा मनुष्य आहे, व आपल्याप्रमाणेंच

त्याच्याही मागें देहधर्म लागलेले आहेत, हें वाचक जाणतो, आणि म्हणूनच सामान्य माणसांच्या शक्तिबाहेरच्या गोष्टी जेव्हां तो नायक करितो तेव्हां त्याच्याविषयीं वाचकाच्या मनांत आदर उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. चरित्रनायकानें केलेलीं अलौकिक कृत्यें पाहून मानवी प्राण्याला अशक्य असें कांहीं नाहीं, हें तत्त्व वाचकाच्या मनावर उत्कृष्टपणें बिंबतें, आणि हळूहळू त्याच्या ठिकाणीं अनुकरणेच्छा प्रबल होत जाते. " Nothing shall be impossible unto you. " आणि "If Thou canst believe, all things are possible to him that believeth " या बायबलांतील उक्तीमध्यें भरलेला उपदेश चरित्रवाचनानें मनामध्यें फार उत्तम प्रकारें रुजतो व फलद्रूप होतो. याच कारणामुळें निराशेच्या गर्तेत खोल खोल रुतत जाणाऱ्या अभागी जीवांनासुद्धां थोर महात्म्यांच्या चरित्रावलोकनानें उत्पन्न झालेल्या आशातंतूवर जगतां येतें. म्हणून विद्यार्थी व सामान्य जनता यांच्या ठिकाणीं चरित्रवाचनाची आवड जाणत्यांनीं जास्त वृद्धिंगत केली पाहिजे.

आपल्या देशांतील धीरोदात्त पुरुषांच्या चरित्रांप्रमाणें इतर देशांतील थोरथोर राष्ट्रपुरुषांचीं चरित्रेंही आपल्या लोकांच्या हातीं यावयास पाहिजेत. कारण, एका व्यक्तीच्या अडचणी, किंवा एका राष्ट्रापुढें उभे असणारे प्रश्न, त्या व्यक्तीपुरते, किंवा त्या राष्ट्रापुरते मर्यादित असतात, असें थोडेंच आहे ? मनुष्यजात येथून तेथून सारखीच असल्यामुळें, एका व्यक्तीचे अनुभव किंवा एका देशाचा इतिहास दुसऱ्यांनाही उपयोगी पडत असतो. म्हणून शिक्षणाच्या क्षेत्रांत इतिहासाची एवढी मातब्बरी आहे. पण एका व्यक्तीचे एकत्रित केलेले सर्व अनुभव म्हणजे चरित्र होय, आणि राष्ट्राचे एकत्रित केलेले अनुभव म्हणजे त्या राष्ट्राचा इतिहास होय. एवढेंच नव्हे तर महापुरुषांचीं चरित्रें म्हणजेच एकद्या राष्ट्राचा किंबहुना सर्व जगाचा इतिहास होय, हें कार्लाईलचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. तो म्हणतो, " Universal history, the history of what man has accomplished in this world, is at bottom the History of the Great Men who have worked here. "

वरील गोष्ट ध्यानांत धरून अमेरिकेच्याच नव्हे तर सर्व जगाच्या इतिहासांत ज्यानें आपल्या कृतीनें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे, त्या हेन्री फोर्डचें चरित्र मराठींत लिहिण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. परिस्थितीप्रमाणें सामान्य माणसें बदलतात, पण कर्त्या पुरुषांपुढें परिस्थिति पालटते, ही गोष्ट हेन्री फोर्डच्या

चरित्रावरून सहज दिसून येणार आहे. अर्वाचीन काळांत मनुष्याच्या जीवनक्रमांत जे जे कल्पनातीत फरक घडून आलेले आहेत, त्यांचें बरेंचसें श्रेय थॉमस ॲडिसन व हेन्री फोर्ड या अमेरिकेच्या दोन महापुरुषांसच आहे. कारण त्यांनीं विद्युत् व यंत्रकला यांच्या जोरावर अभूतपूर्व असे चमत्कार करून सकल मनुष्यजातीची विनमोल सेवा केली आहे. तेव्हां अशा प्रकारें कर्मवीर म्हणून गाजलेल्या हेन्री फोर्डचें चरित्र आमच्या तरुणांना कार्यप्रवण करो एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

हें चरित्र मराठींत लिहिण्याच्या कामीं मुख्यतः मि. हॅमिल्टन यांनीं लिहिलेलें हेन्री फोर्डचें चरित्र, हेन्री फोर्डनें लिहिलेलें स्वतःचें आत्मचरित्र, ज्ञानकोश व इतर किरकोळ लेख ह्यांचीच मदत झाली आहे. पुस्तकप्रकाशनाची जवाबदारी पुण्याचे श्री. ए. पी. वापट यांनीं आपल्या शिरावर घेऊन आणि मुंबईच्या भारत-गौरव-ग्रंथमालेचे मालक श्री. मं. ना. कुळकर्णी यांनीं लिखाणाला मूर्तरूप देऊन आम्हांला उपकृत केलें आहे. तेव्हां पाश्चात्य ग्रंथकार व पौर्वात्य प्रकाशक यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

सर्वांचा नम्र,

**गो. वि. पेठे.**

अनंत चतुर्दशी, शके १८५१
अक्कलकोट.

# हेन्री फोर्ड.

## प्रकरण १ लें.

## कुलवृत्तांत व जन्म.

अमेरिका खंडांत मिचिगन या प्रांतांतील डियरबोर्न या गांवीं एक महान् कर्तृत्ववान पुरुष रहात असतो. त्याचें वर्तन व राहणी हीं अगदीं साधीं असलीं तरी त्याच्या कीर्तीचा डंका आज चारी खंडांत इतका दुमदुमत आहे कीं त्याचें नांव माहीत नाहीं असा एकही मनुष्य सांपडणें विरळा. मानवजातीच्या सुखांत फार मोठी भर टाकण्याची कामगिरी त्यानें केली आहे. प्राचीन काळीं त्याला 'जादुगार' ही संज्ञा प्राप्त झालीच असती, पण हल्लींच्या प्रगतिपर व विचारयुक्त जगाच्या इतिहासांतसुद्धां त्याला 'जादुगार' हें नामाभिधान देण्याला कांहीं हरकत आहे असें आम्हांला तरी वाटत नाहीं. फरक इतकाच कीं त्याच्याजवळ आपली करामत करून दाखविण्यासाठीं यक्षिणीची कांडी नाहीं किंवा अल्लादिनाचा दिवाही नाहीं. त्याची करामत त्याच्या उद्योगावर अवलंबून आहे. आपली अचाट बुद्धि, अपार कल्पनाशक्ति आणि प्रचंड उद्योग यांच्या जोरावर त्यानें अशीं अलौकिक कृत्यें केलीं आहेत कीं जगाला नटविण्याची कामगिरी ज्यांनीं आपल्या शिरावर घेतली आहे अशा थोर पुरुषांमध्यें त्याला आज अग्रपूजेचा मान मिळत आहे. या थोर पुरुषाचें नांव हेन्री फोर्ड.

आयर्लंडांतील क्रॅडन या गांवीं १८२७ या सालीं वुइल्यम फोर्ड याचा जन्म झाला. हा शेतीचा धंदा करी. परंतु आयर्लंडांत राहून शेतीच्या धंद्यांत आपली भरभराट होणार नाहीं असें वाटल्यावरून १८४७ त आपल्या हेन्री नांवाच्या भावाला घेऊन वुइल्यमनें अमेरिकेला प्रयाण केलें आणि शेवटीं डियरबोर्न येथें कायमची वसती केली.

हा पुरुष जबर महत्त्वाकांक्षी असल्याकारणानें आगगाड्यांचे लोखंडी रस्ते तयार करण्याच्या बाबतींत अत्यंत श्रमाचीं कामें त्यानें अंगावर घेतलीं. दुसरींही पुष्कळ अवघड कामें त्यानें केलीं; परंतु शेतकीचें काम त्याच्या आवडीचें असल्यामुळें आपल्या शेतावर काम करण्यास आपण कधीं जाऊं असें त्याला होऊन गेलें होतें. जरूरीपुरतें द्रव्य सांठवून त्यानें थोडक्याच दिवसांत चाळीस एकर जमीन खरेदी केली व पुढें तर १५१ एकर जमीन त्याच्या मालकीची झाली. आपल्या पूर्वीच्या शेतावर वृक्ष-राजींत त्यानें एक छोटेंसें दुमजली घर बांधलें; आणि १८६२ सालीं मेरी लिटिकोट नांवाच्या एका सुंदर तरुणीशीं लग्न करून तो आपल्या घरांत आनंदानें कालक्रमणा करूं लागला.

वुइल्यमची ही १९ वर्षांची पत्नी त्याला साजेशीच गृहिणी होती. शरीरसौंदर्य व मानसिक गुण यांचा तिच्या ठायीं उत्तम मिलाफ झाला होता. शांत, प्रेमळ, उत्साही, सुविचारी अशी ही वायको गृहकृत्यांत अत्यंत दक्ष असे. कुटुंबांतील माणसांकरितांच नव्हे तर शेतावर राबणाऱ्या मजुरांसाठीं सुद्धां तिला स्वैंपाक करावा लागे. गाईच्या धारा काढण्यापासून ताक करून लोणी काढण्यापर्यंत सर्व दूधदुभतें तिला करावयाचें असे. घरांत लागणारे सर्व कपडे ती स्वतः शिवी; इतकेंच नव्हे तर कित्येकदां सूत कांतून कापडही विणीत असे. अर्थात् मुलांबाळांची जोपासना करूनच तिला ह्या गोष्टी कराव्या लागत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

' पुरुषाचें काम सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चालतें पण स्त्रीचें काम कधींच सरत नाहीं ' असें जें म्हणतात तें सर्वथैव खरें आहे, असें या बाईच्या कामसु स्वभावावरून चांगलेंच प्रत्ययाला येतें. आपल्याला काम फार करावें लागतें म्हणून त्या बाईला कधीं वाईट वाटलें नाहीं. इतका तिचा स्वभाव आनंदी होता. हेन्रीच्या ठिकाणीं आढळून येणारी उद्योग-प्रियता ही आनुवंशीकच असली पाहिजे. कारण त्याच्या मातापितरां-प्रमाणेंच काम करीत रहाणें हाच स्वाभाविक धर्म आहे व सुख व संपत्ती यांचा लाभ करून घ्यायचा असेल तर प्रामाणिक उद्योगाचीच कास धरली पाहिजे असेंच हेन्रीचें देखील मत आहे. या स्वाभाविक धर्मा-पासून च्युत होणें म्हणजेच मानवी आपत्तींना आपल्या अंगावर ओढून घेणें होय, हें तो अद्यापपर्यंत जाणतो व प्रत्येक वेळीं ताज्या दमानें व उत्साहानें कर्तव्य-सागरांत उडी घेण्यास तो तयार असतो. असा हा प्रयत्नवादी पुरुष जन्माला यावयाचा होता म्हणूनच त्याच्या आईला उद्योगाचे डोहाळे होत होते. आणि म्हणूनच असें म्हणावेंसें वाटतें कीं, वुइल्यम फोर्ड व त्याची गृहिणी हीं उद्योगाच्या बळावर ऋद्धिसिद्धीला घरांत पाणी भरावयाला लावण्याची तपस्या करीत होतीं.

अशा या दांपत्याला ता. ३० जुलई १८६३ या दिवशीं एक मुलगा झाला व त्याचें नांव हेन्री असें ठेवण्यांत आलें. त्या सालीं अमेरिकेंत जीं मुलें जन्माला आलीं त्यांहून हा मुलगा कांहीं विलक्षण होता किंवा कांहीं अलौकिक चिन्हें त्याच्या शरीरावर होतीं असें मुळींच नाहीं. सर्व-साधारण मुलांसारखा परंतु बाळसेदार व हाडापेरानें मजबूत असा तो होता. सर्वसाधारण स्त्रियांप्रमाणें हेन्रीच्या मातेला मात्र आपल्याला मोठा भाग्यवान पुत्र झाला म्हणून आनंद झाला असेल व त्याच्या भाग्याच्या चढत्या श्रेणींत तो अमेरिकेचा प्रेसिडेंटही झालेला तिनें आपल्या अंत-

श्चक्षूनें अवलोकन केला असेल. एवढें मात्र खरें कीं जसजसा तो मोठा होऊं लागला तसतसा मुलाच्या जातीप्रमाणें तो खोड्या करूं लागला. त्याला पुढें जॉन, मार्गारेट, जेनी, वुइल्यम, व रॉबर्ट इतकीं भावंडें झालीं; त्यांतील जेनी व रॉबर्ट कालवश झालीं आणि बाकीचीं अद्याप हयात आहेत.

फोर्ड ज्या घरांत जन्म पावला तें घर कांहीं फारसें मोठें नव्हतें हें मागें आलेंच आहे. स्वैंपाकघर, माजघर वगैरे मिळून एकच खोली होती. थोडक्या दिवसांत स्वैंपाकघर पृथक् व प्रशस्त असें बांधण्यांत आलें. परंतु जुन्या स्वैंपाकघराचें ममत्व मात्र हेन्रीच्या मनांतून कधीं गेलें नाहीं. ह्याच घरांत आईच्या मागून तो दुडदुड फिरत असे.

ह्या घराच्या आजूबाजूला वनश्रीची शोभा तर अपूर्व होतीच पण वनदेवतेच्या प्रसन्नतेमुळें फलपुष्पादिकांचीही त्या ठिकाणीं समृद्धि होती. फळांचा हंगाम आला म्हणजे छोट्या हेन्रीचा आनंद गगनांत मावेनासा होई. सर्व दिवस त्याचे पाय आजूबाजूच्या राईंत स्वैर संचार करण्यांत व हात पक्क किंवा अर्धपक्क डाळिंबें वा इतर फळें तोडून पोटांत ढकलण्यांत गुंतलेले असत. त्यामुळें पोटदुखीसारखी व्यथा त्यावर वारंवार गुदरे. टरबुजें, कलिंगडें यांचें पीक तर उन्हाळ्यामध्यें बेसुमार यावयाचें ! आणि मुलांच्या या फळावर कोण उड्या पडतात हें लक्षांत आणलें म्हणजे हेन्रीनें काय केलें असल याची वाचकांना चांगलीच कल्पना येईल.

हेन्रीच्या घराच्या पश्चिमेकडील अंगाला रूज नांवाची एक लहान नदी वहात असे. या नदीची रुंदी वीस फूट व खोली कुठें दहा इंच तर कुठें दहा फूट याप्रमाणें कमीजास्त असे. याच्या बाजूला पाण्याचें एक लहानसें तळें होतें. त्याचप्रमाणें एक मोठें गायरानही होतें. थोडा मोठा झाल्या-नंतर हेन्रीला गाई वळवून परत घराकडे आणण्यासाठीं इकडेच जावें लागे. याव्यतिरिक्त असलेली दुसरी जागा उत्तम पिकाऊ असल्यानें वुइल्यम तींत

शेती करी. वुइल्यम हा उत्तम शेतकरी होता व दैवानें त्याच्या कपाळीं यशाही भरपूर लिहिलें होतें. त्याच्या मालकीच्या कोंबड्या तर पुष्कळ होत्याच; पण घोडे, गाई, मेंढ्या, डुकरें हींही पुष्कळ होतीं. त्यामुळें त्याचा डेअरीचा धंदा चांगल्या प्रकारें चाले. त्याच्या लोण्याचा खप फार होता. एकंदरींत वुइल्यमच्या शेतांवर कृषिदेवतेची बहाल मर्जी होती असें दिसतें. त्याच्या शेतांत विपुल धान्य उत्पन्न होई, फळफळावळीची रेलचेल असे व भाजीपाला तर बेसुमार पिके.

अशी धनधान्यादींची समृद्धी असलेल्या घरांत हेन्रीचा जन्म झाला ! प्रथम प्रथम बालस्वभावानुसार हेन्रीला कोंबड्यांच्या पिलांची फार गंमत वाटे. इतर मुलांप्रमाणें गवताच्या गंजीवरून घसरगुंडी खेळण्यांत त्याला फार आनंद वाटे. हळुहळु हेन्री घोड्यावरही बसूं लागला.

हेन्रीच्या घरासभोंवतालचा प्रदेश वनश्रीचें विलासस्थानच होतें कीं काय अशी शंका येते. कारण ऋतुपरत्वें भिन्नभिन्न व अभिनव पुष्पांचा पोषाख करून वनदेवता या ठिकाणीं क्रीडा करीत असे. वसंत ऋतु सुरू होतांच या वनश्रीच्या सौभाग्याला सीमाच उरत नसे. पण इतर ऋतूंतही तें विशेष खुलून दिसे हें आश्चर्य आहे. आसमंत प्रदेश कोकिलादि पक्ष्यांच्या मधुर ध्वनीनें दुमदुमून जाई. पक्ष्यांचे थवेच्या थवे आकाशांतून मंडलाकृति फिरत, तें पाहून हेन्रीला फार मौज वाटे. कांहीं वर्षें या निसर्गसुंदरीच्या अंकावर क्रीडा करण्यांत हेन्रीनें घालविलीं. पण हा आनंद फार दिवस टिकावयाचा नव्हता. त्याच्या वयाला बारावें वर्ष लागतें न लागतें तोंच त्याची आई निवर्तली. तिच्या मृत्यूनें सर्व कुटुंबाला फार दुःख झालें. हेन्री म्हणतो, ‘आमचें घर म्हणजे स्प्रिंगशिवाय असलेलें घड्याळ बनलें.’ हेन्रीची आई फार उच्च दर्जाची स्त्री होती. आपल्या मुलांच्या आचारविचारांना योग्य वळण देऊन त्यांचें शीलसंवर्धनही तिनें मोठ्या कुशलतेनें केलें

होतें. 'तिची आठवण म्हणजे आपल्या आयुष्यांतील आनंदाचा झराच होय' असें हेन्रीला वाटतें. तिच्या मृत्यूनंतर कांहीं दिवस मुलें संभाळण्याचा बोजा फ्लॅहर्टी या फोर्डच्या नात्याच्या स्त्रीवर पडला; पण कांहीं दिवसांनंतर मार्गारेटनें स्वैंपाकपाण्याची किंवा गृहकृत्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेतली.

---

## प्रकरण २ रें.

# शैशव व शिक्षण.

हेन्री फोर्ड याला अक्षराची ओळख जुजबी लिहिण्यावाचण्यापुरती घरीं झाली होतीच. ता. ११ जानेवारी १८७१ या दिवशीं त्याला प्रथम "स्कॉटिश वसाहत पाठशाळेंत" दाखल करण्यांत आलें. पण पुढें मिलर स्कूलमध्यें तो जाऊं लागला. ही शाळा फोर्डच्या शेतवाडीपासून अडीच मैल लांब होती.

दोन्ही शाळा सारख्या प्रकारच्याच शिक्षणाच्या किंवा सोयींच्या दृष्टीनें होत्या. एका खोलीची शाळा आणि त्या खोलीला देखील तांबडा रंग लावलेला असायचा! खोलींत ऊब रहावी म्हणून लाकडें जाळण्याची भट्टी पेटलेली असायची. एखाद्या वेळीं सकाळच्या प्रहरीं कडक थंडी पडली असली म्हणजे त्या भट्टीची धग इतकी लागे कीं जवळ बसणाऱ्याचें पोट भाजून निघे तर पाठ गारठून जाई. परंतु सामान्यतः दोन प्रहरीं तें शालागृह मोठें सुखाचें स्थान होई. रस्त्याच्या पलीकडल्या जागेंतून पाणी आणावें लागे व तें बालडींतून आणण्यासाठीं विद्यार्थीवर्गांत फार अहमहमिका असे. हेन्रीचा शिक्षक जॉन ब्रेनर्ड चापमन म्हणून एक गृहस्थ

होता. त्याच्या ठिकाणीं हेन्रीची फार भक्ति असे. त्या शिक्षकाचें एक छायाचित्र हेन्रीच्या संग्रहाला अद्यापही असलेलें सांपडतें. मधून मधून चापमनच्या बायकोला मोठ्या आनंदानें अजूनही तो भेटावयाला गेल्याशिवाय रहात नाहीं.

साधारणपणें हेन्रीचें व त्याच्या शिक्षकांचें सूत जमत असे, याचें मुख्य कारण म्हणजे हेन्री हा बांड मुलगा नव्हता हें होय. तो गरीब व सुस्वभावी असून आपलें काम वेळच्या वेळीं करी. गुरुजी किंवा पंतोजी म्हटला म्हणजे विद्यार्थ्यांना जो बाऊ वाटतो तो त्याला कधीं वाटला नाहीं. चाबकाचा चोप हा तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या, त्या काळीं तरी निदान, पांचवीला पूजलेला असे; पण हेन्रीला एकदांही तो मिळण्याचा प्रसंग आला नाहीं. या बालपणांतील त्याचे सांगण्यासारखे मित्र म्हणजे इडसेल रुडिमन, जेम्स रुडिमन, जॉन हॅगर्टी आणि रेनी फील्ड हे होत. पैकीं जेम्स रुडिमन व हेन्रीची बहीण मार्गारेट यांचें पुढें लग्न झालें.

या वेळचें शिक्षण म्हणजे लिहिणेंवाचणें व हिशेब करणें इतकेंच होतें. "ब्लूब्लॅक स्पेलर" म्हणून त्या वेळीं फार लोकप्रिय असलेलें एक पुस्तक शाळेंत शिकविलें जाई. यांत पुष्कळ म्हणी व उपदेशात्मक गोष्टी दिलेल्या असत. या पुस्तकाचा हेन्रीच्या मनावर झालेला परिणाम त्याच्या भाषणांत वारंवार दृग्गोचर होतो.

शाळेंत शिकत असतां सर्वसाधारण मुलालासुद्धां भांडण्याचे व मारामारीचे प्रसंग येतातच. अर्थात् हेन्री या नियमाला कांहीं अपवाद होता अशांतला भाग नाहीं. आपण होऊन तो मारामारी करीत नसे, पण मारामारींत जर तो गोंवला गेला तर मात्र कधीं मागें घेत नसे. तो अतिशय चपळ असल्यामुळें प्रतिस्पर्धी एकाद दुसरा गुद्दा चढवीपर्यंत हा त्याला चार पांच गुद्दे मारून पार होत असे. एकदां असें घडलें कीं

त्याच्या धाकट्या भावाचे कपडे तो पोहोत असतां एका बांड मुलानें गच्च आवळले तेव्हां हेन्रीनें त्या मुलाला चांगलाच झोडपून काढला आणि लहान मुलांच्या खोड्या करण्यानें काय बक्षीस मिळतें तें त्याला दाखविलें. एकदां एका लहान मुलाची खाण्याची टोपली एका मोठ्या मुलानें पळविली. पुष्कळ मुलांनीं हें कृत्य पाहिलें पण त्याच्या विरुद्ध बोलण्याचें कोणास धैर्य होईना. एका मुलीला मात्र तें सहन न होऊन तिनें खिडकींतून हेन्रीला मोठ्यानें हांक मारली व म्हटलें, "जर तूं त्या मुलाची कणीक तिंबली नाहींस तर मी तुझी तिंबीन." हें ऐकून हेन्री गप्प बसणेंच शक्य नव्हता. त्यानें तावडतोब तिच्या म्हणण्याप्रमाणें त्या मुलाला यथेच्छ तिंबून तिचें समाधान केलें.

हेन्री अनेक प्रकारचे खेळ आपल्या कल्पक डोक्यांतून शोधून काढी. एकदां मात्र या त्याच्या शोधकपणाबद्दल एक प्रकरण त्याच्या अंगाशींच आलें. त्याच्या शाळेजवळ एक लहानसा ओढा होता. त्या ओढ्याला धरण बांधून त्यावरच्या पाण्यावर पाणचक्की चालवावी ही कल्पना त्याच्या मित्रमंडळींत त्यानें बोलून दाखविली. मग काय विचारतां ? सर्वांनीं मोठ्या आनंदानें त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचें ठरविलें. झालें ! भराभर दगड, माती, रेती, कांटेकुटे, फांद्या इत्यादि साधनसामुग्री जुळवून त्या बालगोपालांनीं खरोखरीचा बांध त्या ओढ्याला घातला; आणि हेन्रीनें तयार केलेली लाकडी पाणचक्की नेऊन उभी केली. थोड्याच अवधींत पाणी चढूं लागून चक्की गरगर फिरूं लागली. त्या दृश्यानें सर्व मुलांना आणि विशेषत: हेन्रीला जो आनंद झाला तो काय वर्णन करावा ? पण सुख-दु:ख, आशानिराशा या द्वंद्वांप्रमाणें आनंदउद्वेग हें द्वंद्वही मनुष्यामागें लागलेंच आहे. हेन्रीच्या आनंदावरही थोड्याच वेळांत विरजण पडलें. त्या ओढ्याचें पाणी चढून बांधावरून वाहून जाऊं लागलें, व त्या पाण्याच्या

लोंढ्याबरोबर आसपासच्या जमिनींत उगवलेले बटाटे वगैरेंचें पीक खरडून वाहून गेलें! अर्थात् सर्व शेतकऱ्यांनीं मुलांच्या या खेळाला हरकत केली व त्यांच्या पंतोजीलाही तें धरण फोडून टाकण्याची परवानगी देणें भाग पडलें. यानंतर कांहीं दिवस तर तो पंतोजी मुलांना शाळेच्या बाहेरच सोडीत नसे.

सोळा वर्षांचा होईपर्यंत हेन्री स्प्रिंगवेल्स शाळेमध्येंच जात होता. तो जरी पुस्तकांतील किडा बनला नाहीं तरी चालीरीतींचें शिक्षण त्याचें त्या वेळीं झालें होतें. कादंबरीवाचनापेक्षां चरित्रवाचन त्याला फार आवडे. कारण खऱ्याखुऱ्या चालत्या बोलत्या माणसांनीं ज्या गोष्टी केल्या त्या समजून घेण्यांत त्याला फार आनंद वाटत असे. चापमन नांवाच्या गुरुजीनें त्याला साक्रेतिसाचें चरित्र दिलें व हें तुला समजायला फार कठीण आहे, असें तो म्हणाला. पण हेन्रीला त्याच्यांत इतकी गोडी लागली कीं त्यानें त्याचीं कित्येक पारायणें केलीं. त्यानें वाचलेल्या चरित्रग्रंथांपैकीं हेंच पहिलें पुस्तक होय. यानंतर त्यानें वॉशिंग्टन, लिंकन, ग्रँट इत्यादिकांचीं चरित्रें वाचलीं.

'पोटभर खावें आणि अंग मोडून काम करावें' या तत्वाप्रमाणें फोर्डच्या कुटुंबांतील प्रत्येक जण वागत असे. हेन्रीही आपल्या वयाप्रमाणें बारीकसारीक कामें करून वडील माणसांचें काम हलकें करीत असे. बारा वर्षांचा झाला तेव्हां तर तो नांगरसुद्धां धरूं लागला होता. रात्रीं नऊ वाजतां निजावें आणि दिवस उगवण्यापूर्वीं उठावें आणि दिवसभर काम करावें असा त्यांचा कार्यक्रम असे. हेन्री आपलें काम आनंदानें करी, पण शेतकी कामाबद्दल त्याला हौस अशी कधींच वाटली नाहीं. तेंच तें काम करण्यांत सारा वेळ खर्च होतो अशी त्याची तक्रार होती. पण यामुळें तो अंगचोरपणा करीत असे असें बिलकुल नाहीं. सर्व शेताला

पुरेल इतकें पाणी काढावयाचें आणि तेंसुद्धां बादलीनें. पुढें पंप लावण्यांत आला, पण तो किती तरी वेळ हलवावा लागे. त्यामुळें कित्येकदां कोपर निखळून पडण्याची वेळ येई. परंतु तो आपलें काम विनतक्रार करी. काम करण्याच्या पद्धतींत कांहीं सुधारणा व्हावी हीच त्याची इच्छा होती.

तो म्हणतो, "मनुष्य कामाला कुरकुरत नाहीं तर राबराबून मरेमरेतों कष्ट करणें त्याला जिवाजड होतें. तेव्हां आपल्या दररोजच्या कामाकाजांतून व्यर्थ शीण आणणाऱ्या कष्टांचें उच्चाटन केल्याशिवाय आपली खरी सुधारणा झाली असें म्हणतां येणार नाहीं. ही गोष्ट शास्त्रीय शोधामुळेंच हळूहळू साध्य होणार आहे."

जनावरांबद्दल त्याला कधीं फारसें ममत्व वाटलें नाहीं. गाईच्या धारा काढण्यांत श्रीगोपाळकृष्णाला जें एक काव्य आहेसें वाटे तें त्याला कधीं वाटलें नाहीं. उलट त्यांच्या शेपट्यांचे तडाखे खाणें त्याच्या जिवावर येई. गाईपेक्षां तो घोड्यांची चाकरी करण्याचें काम मोठ्या हौसेनें पतकरी.

पावसाळ्यांत पिकें उत्तम यावींत म्हणून वसंत ऋतूंत जमीन नांगरून साफ करावी लागे. पुढें पेरणी करणें, कुळव मारणें वगैरे कष्टाचीं कामें सुरू होत. यापेक्षांही त्रासदायक काम म्हणजे तण काढणें! अर्थात् हें काम करतांना कंबरडें मोडून जाई. इतर माणसाप्रमाणें हेन्रीलाही असें आश्चर्य वाटे कीं हरळी जशी आपोआप मोठ्या जोमानें उगवते त्याप्रमाणें धान्याच्या पिकाची वाढ कां होत नाहीं? पण हा प्रश्न हजार वर्षे गेलीं तरी जशाचा तसाच रहाणार, आणि पिकांच्या वाढीपेक्षां तणाची वाढ हां हां म्हणतां वाढत जाणार! यानंतर गवत वाळवून गंजी रचण्याचें काम सुरू होई. आणि हें काम हेन्रीला आवडे व अजूनही आवडतें. गवताच्या गंजी रचण्याचें काम होतें न होतें तोंच पिकाच्या कापणीचे दिवस यावयाचे. हें काम मोठ्या तांतडीनें व श्रमानें उरकून घ्यावें

लागे. त्याशिवाय गत्यंतर नसे. कारण हंगामाच्या चार आठ दिवसांत तें काम करण्याची टंगळमंगळ केली तर तयार झालेलें पीक पदरांत पडण्या-ऐवजीं नासून जाण्याची किंवा अकालीं जलवृष्टी झाली तर पीक जमीन-दोस्त होण्याची भीति असे.

शेतकऱ्याला कष्ट कसे करावे लागतात हें पहावयाचें असल्यास कापणी चालली असतां त्याची उडणारी तारांबळ पहावी. सर्व वर्षांत याच मोसमांत ऊन म्हणजे मी म्हणत असतें. खरोखर उन्हांत तापून निघणाऱ्या या कष्टाळू शेतकऱ्यांनाच शीतल जलाची खरी किंमत कळते. या दिवसांत श्रमामुळें दगडसुद्धां पचतील इतका जठराग्नि प्रदीप्त झालेला असतो. त्यामुळें जेवणाला जी रुची येते तशी इतर वेळीं क्वचितच येते. सुखाची शांत व गाढ झोंप लागते, ती या कापणीच्या हंगामांत काम करून दमलेल्या शेतकऱ्यांनाच होय ! पूर्वीं बडवून धान्याची मळणी करावी लागे. त्यामुळें मनुष्याला जे श्रम करावे लागत ते विचारूं नका. पुढें डियरबोर्न गांवीं हेन्रीच्या एका नातेवाईकानें मळणीचें यंत्र आणिलें व त्याचा उपयोग प्रत्येक शेतकऱ्यास एक एक दिवस करण्यासाठीं तें देण्याची व्यवस्था झाली. पण एका दिवसांत सर्व काम उरकायचें असल्यानें दहाबारा माणसें सारा वेळ त्या यंत्राशीं खपावीं लागत. परंतु यांत्रिक कामाबद्दल आवड असल्यामुळें हेन्रीला मात्र ती एक कौतुकाची गोष्ट होऊन बसली होती.

हिंवाळ्यामध्यें प्रत्यक्ष शेतावर काम कमी असे. पण कुऱ्हाडींना दांडे घालणें, नांगराची व इतर लाकडी हत्यारांची मोडतोड दुरुस्त करणें, घोड्याचे लगाम खोगीर वगैरे नीट करणें इत्यादि शेंकडों गोष्टी करायच्या असत. हेन्री आपल्या बाळपणांत या सर्व गोष्टी करण्यास आपल्या बापाला मदत करीत असे.

आतां तो मुळींच खेळत नसे असें थोडेंच आहे? मुलांच्या जाती-प्रमाणें खेळ वगैरे सर्व गोष्टींत तो असायचाच. त्याची रहाणी मात्र अगदीं साधीसुधी होती. उन्हाळ्यांत तो अनवाणी फिरे. छानछोकीचे कपडे करण्याचा त्याला भारी तिटकारा होता. गळोटी वापरणें म्हणजे एक जुलमी मूर्खपणाची चाल आहे अशी सामान्यपणें सर्व मुलांची समजूत असतेच. त्याला अनुसरूनच हेन्रीला गळोटीनें गळा आवळणें आवडत नसे. तथापि प्रत्येक रविवारीं शेजारच्या एपिस्कोपल चर्चमध्यें त्याच्या घरची मंडळी प्रार्थनेला जात तेव्हां त्यालाही सजून जाणें भाग पडे. परंतु कांहीं काल या बंधनकारक रूढीमुळें रविवाराचा त्याला फार राग येई.

कोठारांतील किंवा गोठ्यांतील वरच्या तुळयांना बांधलेल्या झोप्यावर बसून झोके घे, घोड्यावरून दौड कर, किंवा आणखी कांहीं मनाला रुचेल तें कर असें त्याचें चाले. तो मनाला लागेल तें करायचा खरा, पण त्याच्यामध्यें आज्ञाधारकपणाही होता. कधीं चोप खाण्याची त्याला पाळी आली नाहीं. एकाद्या चापटीची शिक्षा त्याला पुष्कळ होई.

डियरबोर्नपासून डिट्रॉटचा रस्ता फार खराब होता. पण कारणपरत्वें हेन्री आपल्या बापाबरोबर त्या गांवीं जाई. हेन्रीनें प्रथम सर्कस पाहिली ती याच गांवीं. पण तींत त्याला विशेषशी गंमत वाटली नाहीं आणि आजही तिचें त्याला फारसें स्मरण नाहीं.

हेन्री जेव्हां पोहावयाला शिकला तेव्हां त्याला गटंगळ्या खाव्या लागल्या; तरी पण त्यानें पोहण्याचें कमी केलें नाहीं. उन्हाळ्यांत तर तो प्रत्यहीं रूझ नदीवर पोहावयाला जाई व पाण्यामध्यें यथेच्छ डुंबे व जलयुद्ध करी. त्याचे कपडे आवळून त्याला बुडविण्याची खटपट इतर मुलें करीत व तोही तें जाणून असल्यामुळें त्यांना पुरून उरे. इतर मुलांप्रमाणें तो मासे पकडी. परंतु त्या भागांत चांगले मासे फार

नसतच. त्यानें आपल्या भावांच्या मदतीनें एक फळ्यांची नौका तयार केली होती व ती वल्हविण्यांत त्याला फार आनंद होई. अजूनही नौका-नयनांत त्याला विशेष मौज वाटते.

तो वैदूल खेळे. एकदां वैदुलांनीं खेळत असतां त्याच्या बोटांच्या पेराला जोराचा मार बसला. भोवरे फिरविणें, पतंग उडविणें वगैरे नित्याच्या मुलांच्या लीलाही तो करीत असे. शाळेंत असतांना तो नानाप्रकारच्या खेळांमध्यें भाग घ्यायचा. एका खेळाला घट्ट रबरी चेंडूची जरूरी असे. डियरबोर्नमध्यें तसले चेंडू क्वचितच असल्यामुळें या मुलांनीं आपल्या डोक्यांतून एक शक्कल काढली. रबरी बुटाच्या तीन टांचा काढून त्यांना खिळे मारून त्या त्यानें एके ठिकाणीं जोडल्या व एका धारेच्या सुरीनें त्याचीं टोकें कापून त्याला त्यांनीं चेंडूचा आकार दिला, आणि चेंडूच्या खेळांत त्याचा उपयोग होऊं लागला. पण तो चेंडू फार कठीण झाल्या-मुळें एकाद्याला लागला तर फार मार लागे. पण बालपणांत मुलें खेळ-ण्यांत रंगलीं म्हणजे लागल्याची त्यांना मुळींच शुद्ध नसते.

पुढील खेळांत या मुलांना मोठी मौज वाटे. दोन म्होरके सर्व गडी वाटून घेत व शाळेच्या दोन बाजूंस जाऊन ते उभे रहात. मग एक मुलगा आपल्या हातांतील चेंडू ‘ आला रे आला ’ म्हणून इमारतीच्या वरच्या बाजूनें दुसऱ्या अंगाला फेकी. तो चेंडू जमिनीवर पडण्यापूर्वीं जर दुसऱ्या बाजूच्या एकाद्या गड्यानें झेलला तर त्याला दुसऱ्या बाजूस पळत जाऊन जो सांपडेल त्याला शिवून आपल्या बाजूला कैदी म्हणून आण-ण्याचा हक्क असे. तशाच रीतीनें मग परत तो चेंडू फेकी व अशा रीतीनें एका बाजूकडील सर्व मंडळी जिंकली जाईपर्यंत हा खेळ चाले.

कठड्यावरून तोल संभाळून चालणें, उड्या मारणें, कुस्ती खेळणें वगैरे प्रकार होतेच. त्यांत उडी मारणें हेन्रीला आवडे व लांबपल्ल्याची

उडी किंवा उंच उडी मारणें या दोन्हीमध्येंही तो पारंगत झाला होता. परंतु तेच तेच खेळ खेळण्याचा त्याला कंटाळा येई. खेळांतही कांहीं तरी नाविन्य पाहिजे असें त्याला वाटे व तो काय क्लृप्ती काढतो इकडे सर्व मुलांचें लक्ष वेधून राही.

वुइल्यम फोर्डला जरी शिकारीचा नाद विशेष नव्हता तरी आपल्या मुलांना त्यानें त्या खेळाचीं साधनें आणून दिलीं होतीं. हेन्रीला एक बंदूक त्यानें दिली होती. आणि तोही नेम मारून ठरविलेला पक्षी हमखास पाडीत असे. प्रथम प्रथम हेन्रीला कुत्र्यांच्या भोंकण्यांत, मनुष्यांच्या आरोळ्यांत व जंगलांतील सावजें शोधण्यांत जरा गंमत वाटत असे. पण उत्तरोत्तर त्याची मृगयेची आवड मावळत चालली; आतां तर डियरबोर्न येथील प्रदेशांत बंदूकही उडवली जात नाहीं. सांपळे लाऊन जनावरें पकडणें हेंही हेन्रीला आवडत नसे. नाहीं म्हणावयाला एकादी खार पेटींत पकडून ती तो कांहीं दिवस पाळीत असे. त्याच्याजवळ 'वॉच' नांवाचा काळा कुत्रा होता, त्याच्यावर त्याचें फार प्रेम असे. उलट त्या कुत्र्याचीही आपल्या धन्याच्या ठायीं फार भक्ति असे. जंगलांत किंवा शेतावर कुठेंही हेन्री जावो 'वॉच' आपला त्याच्या मागोमाग ठेवलेलाच ! हेन्री परगांवीं गेला होता तेव्हां वॉच कोंबड्यांचीं अंडीं खाऊन टाकूं लागला व त्याच्यापासून शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्रास होऊं लागला त्यामुळें त्याला गोळी घालून मारण्यांत आलें. पण हेन्रीला त्याचें फार दुःख झालें आणि त्याची आठवण कांहीं केल्या नाहींशी होईना. पुढें साऱ्या जन्मांत हेन्रीनें कुत्रा म्हणून पाळला नाहीं.

हिंवाळ्यांतील हिमनर्तन फार मौजेचें असतें. हेन्रीही हिमनर्तनांत प्रवीण झाला; इतका कीं त्याला सर्व समाजांत जोड नव्हती. रूलो ओढ्यावर व डीट्रॉ नदीवर हा खेळ खेळत खेळत तो कित्येक मैल लांब

जात असे व फिरून परत येत असे. त्या काळीं हिमनर्तनाकरितां लागणारे पादफलक लाकडाचे केलेले असून पट्ट्यांनीं बोटांना बांधण्याची सोय केलेली असे. कित्येक बुटाच्या टाचेंत स्क्रूनेंही ते पादफलक घट्ट बसविलेले असत, व पुढें निमुळता भाग बोटावर येऊन आंत वाकडा झालेला असे. खरोखर अशा रीतीच्या पादफलकांची जोडी मिळाली असतां मुलांचा आनंद गगनांत मावेनासा होई.

ईस्टरच्या सणाप्रमाणेंच इतर सणही मोठ्या उत्साहानें साजरे केले जात. तारीख ४ जुलईला डिट्रोला दारूकाम सोडण्यांत येई. तें पहाण्यासाठीं सर्व मुलेंमाणसें जात. संक्रांतीला तिळगुळ वाटून झालेलीं भांडणें विसरून जाण्यासाठीं एकमेक "तिळगुळ घ्या गोड बोला" असें जसें आपल्याकडे म्हणतात त्याप्रमाणें त्यांचेकडे 'आभारप्रदर्शन दिन' म्हणून एक सणाचा दिवस आहे. त्या दिवशीं सर्व लोक एकमेकांकडे जेवावयाला जाऊन भांडणतंटा विसरून जातात.

फोर्डच्या शेतावर सर्व दर्जाचीं लहान थोर माणसें काम करीत. त्या काळीं कामाचा दिवस आठ तासांचा असणें कोणाच्या स्वप्नांतही नव्हतें! जवळ जवळ अठरा तास काम करावें लागे असें म्हटलें तरी त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं!

अशी एकंदर सामाजिक परिस्थिति होती खरी पण प्रत्येकाचे घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती असें थोडेंच आहे? जो तो खाऊन पिऊन सुखी होता. आजच्या दृष्टीनें विचार केला तर तो समाज निर्धन अतएव गरीब होता. पण असें असलें तरी पोटापाण्याची त्या लोकांना मुळींच ददात नव्हती. मुबलक जागा, स्वच्छ हवा, निर्मल पाचक पाणी व रुचकर अन्न इतकें असल्यावर दुसरें काय पाहिजे?

तो काळ असा होता कीं लोक एकमेकांच्या उपयोगीं पडल्याखेरीज रहात नसत. एकजुटीनें व गुण्यागोविंदानें रहाण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. एकाद्याची गाय मेली अगर उडाली तर त्याला त्याचा शेजारी दूध फुकट पुरवी. प्रसंगविशेषीं आपल्याला मदत करायला आपला शेजारीच येईल, अशी त्याची खात्री असे. अशा रीतीनें फोर्डच्या लहानपणीं लोक आनंदांत असत. फोर्डच्या घरची सर्व मंडळी वर्षांतून एकदां तरी वनभोजनास जावयाचीच. कधीं कधीं सर्व मंडळी जमून नाच करीत. प्रथम प्रथम हेन्रीला चांगलें नाचतां येत नसे. पण मोठा झाल्यावर नृत्यकलेंत तो प्रवीण झाला.

---

## प्रकरण ३ रें.

## जिवंत जिज्ञासा.

आपला मुलगा जात्याच शिल्पकार आहे असें हेन्रीची आई म्हणत असे. पण हेन्रीचें म्हणणें असें कीं शेतावर शारीरिक श्रमाचें काम मनस्वी होतें म्हणून आपण यंत्रकलेंत पडलों. जरा खोल दृष्टीनें विचार केला तर या दोन्ही म्हणण्यांत भेद नाहीं असेंच दिसेल. त्याची स्वाभाविक प्रवृत्ति जरी यंत्रकलेकडे असली तरी शेतावर हातांनीं तेंच तेंच काम करण्यांत आपल्या काळाचा व शक्तीचा विनाकारण अपव्यय होत आहे अशी जर त्याची वालंबाल खात्री झाली नसती तर तो शिल्पकार बनला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे. दुसरें यंत्ररचनाकुशल अशी अलौकिक बुद्धि जन्मतःच जर त्याच्या अंगीं नसती तर यंत्ररचनेंत सबंध आयुष्य घालवूनही त्याचें नांव आजच्या इतकें प्रख्यात झालें असतें किंवा नाहीं याचीही शंकाच आहे.

त्याचा हा स्वाभाविक कल तो पांच सहा वर्षांचा असतांनाच दिसून येऊं लागला. जॉन ब्लॅक नांवाचा त्याचा एक शेजारी त्याला म्हणे, "हेन्री, तूं मोठा जन्मसिद्ध यंत्रशास्त्रीच दिसतोस रे." लाकडाच्या पट्ट्या, लोखंडाच्या पट्ट्या, चाकें, सुऱ्या, स्प्रिंग वगैरे जें जें सटरफटर सामान सांपडेल तें तें जमा करण्याचा त्याला नादच होता. आणि अशा तऱ्हेच्या यःकश्चित दिसणाऱ्या सामानापासून तो एकादें हत्यार बनवी. तो म्हणतो, "त्या काळीं आमच्याजवळ आज मितीला दिसणाऱ्या खेळाच्या वस्तू नव्हत्या. आमच्या खेळांतील वस्तू आमच्या आम्ही घरींच करीत असूं.

त्याची जिज्ञासा इतकी तीव्र होती कीं कोणचीही गोष्ट कां व कशी तयार होते हें समजून घेण्यासाठीं तो हजारों प्रश्न विचारावयाचा. त्याच्या वडिलांना किंवा आईला या सगळ्याच प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक रीतीनें देतां येत नसल्यामुळें "मला माहीत नाहीं" असें उत्तर देणें त्यांस भाग पडे; पण त्याचा आपला "तुला कां माहीत नाहीं ?" हा त्यावर प्रतिप्रश्न असावयाचाच. "इतर मुलांप्रमाणें दिलेल्या उत्तरांनीं हेन्री गप्प बसत नसे तर वस्तुस्थिति खरोखरच तशी आहे कीं नाहीं याची तो छाननी करी."

या प्रवृत्तीमुळेंच तो लहान असतांनाच त्याला एक अद्दल घडली. स्वैंपाकघरांत आईच्या मागोमाग हिंडत असतां त्यानें पुष्कळ वेळां मोठ्या कौतुकानें चुलीवरच्या भांड्यांत सळसळणाऱ्या आधणाकडे पाहिलें होतें. स्वैंपाकघरांत आपण आपल्या हातांनीं कित्येक गोष्टी कराव्या म्हणून त्याची फार इच्छा असे. पण सर्व थोर माणसांप्रमाणेंच त्याची आई त्याला विस्तवाकडे जाऊं देत नसे. एकदां चहादाणीच्या नळींतून पांढरा ढग बाहेर पडून वर जातांना त्यानें पाहिला व वाफेमुळें चहादाणीचें झांकण उडलेलेंही त्यानें पाहिलें; त्यामुळें वाफेच्या शक्तीबद्दल त्याला फार

आश्चर्य वाटलें. वाफेमुळें हात भाजतो हें त्याला ठाऊक होतें पण वाफ कोंडली तर काय होईल याची त्याला कल्पना नव्हती. तेव्हां संधी सांपडली तर त्याचा परिणाम शोधून काढण्याचा त्यानें निश्चय केला, ही संधी अनायासें त्याला लौकरच प्राप्त झाली.

एकदां तो घरांत एकटाच असतां त्यानें एक चिनी मातीची बरणी घेऊन त्यांत पाणी भरून व तोंडावर कागदाची गुडदी मारून तिला दोरीनें बांधून टाकलें नंतर ती बरणी त्यानें चुलीवर ठेवली. अर्थातच थोड्यावेळानें पाण्याला आधण आलें, व पाणी सळसळूं लागलें आणि हांहां म्हणतां फाडकन आवाज होऊन ती बरणी फुटली. त्या आवाजाबरोबर सर्व घर दणाणलेंच, परंतु भिंती नसत्या तर चुलींतले कोळसे किती लांब उडून पडले असते कोणाला ठाऊक! खिडकीचीं तावदानें तर फुटलींच पण त्या बरणीचा एक तुकडा खुद्द हेन्रीच्या डोक्याला लागला व त्याचें तोंड वाफेनें पोळून गेलें. अजूनही तो तुकडा लागून जाहलेल्या जखमेचा वण शिल्लक आहे. त्याची आई तावडतोब घरांत आली आणि त्याच्या जखमा बांधून असें कां होतें तें सांगूं लागली. परंतु हेन्रीनें प्रत्यक्ष स्वानुभवानें त्याचें कारण शोधून काढलें होतें त्यामुळें त्याच्या सुखाला पारावार नव्हता. शिक्षणाचा राजमार्ग हाच. कोणतीही गोष्ट स्वतः करून तिच्यासंबंधींचा अनुभव मिळविला म्हणजे ती चित्तांत पुरी ठसते व तिच्या कार्यकारणमीमांसेवर स्वच्छ प्रकाश पडतो. इतकें झालें तरी हेन्रीच्या मनांत भीति उत्पन्न झाली नाहीं; उलट सावधपणानें प्रत्येक प्रयोग केल्यास अपयश येणार नाहीं असा त्याला आत्मविश्वास वाटूं लागला.

हेन्रीनें वापरलेलें अगदीं पहिलें हत्यार म्हणजे त्याचा चाकू. पण या चाकूनें त्याला फक्त लाकडी काम तेवढें करतां येई. लाकडी कामाची त्याला हौस नव्हती असें नाहीं पण धातुकामाची त्याला विशेष आवड

होती. त्याच्या आईच्या कशिद्याच्या सुईचे दोन तुकडे आरून त्यानें त्या-पैकीं एकाला धार लावली आणि तापवून लाल करून साबणाच्या वडींत खुपसून त्याला त्यानें पाणी दिलें. मग एका लाकडाच्या मुठींत तें हत्यार बसवून तो त्याचा उपयोग करूं लागला. हेंच त्यानें निर्माण केलेलें पहिलें हत्यार होय. हें अद्यापी त्याच्या संग्रहालयांत असून त्याबद्दल हेन्रीला फार ममत्व वाटतें !

डियरबोर्न येथील लोहाराची प्रत्येकाला गरज लागत असल्यामुळें त्याचें दुकान म्हणजे मंडळी जमण्याचा अड्डाच होऊन बसला होता. कोणी औतदुरुस्तीसाठीं तर कोणीं खुरपीं दुरस्त करण्यासाठीं, कोणी घोड्याला नाल मारण्यासाठीं तर कोणीं गाडीला धाव घालण्यासाठीं त्याच्या दुकानांत आले नाहींत असें व्हावयाचेंच नाहीं. अर्थात् त्या ठिकाणीं सर्व सामाजिक, राजकीय, धार्मिक बाबींचा खल व्हावयाचा आणि लोकमत तयार व्हावयाचें. तेथील लोहार आपल्या कामांत फारसा वाकबगार नव्हता, कारण त्यानें बनविलेलीं हत्यारें ताबडतोब मोडत; पण लोकांचा इलाजच नसल्यामुळें त्याच्याकडे जाणें त्यांना प्राप्त होतें. हेन्री मात्र कारण सांपडलें रे सांपडलें कीं त्याच्याकडे जावयाचा. त्याचा भाता हलीव, तापवून लाल करावयाचें हत्यार चिमट्यांत धरून शेगडींत धर, गाडीला धांव बसविली तर त्यावर पाणी घाल, अशा तऱ्हेचीं कामें करून तो त्याला मदत करीत असे, आणि याबद्दल त्याला बक्षिसहि मिळत असे. अजून लोहाराची लाल भट्टी पाहिली म्हणजे त्याला आनंद होतो.

प्रत्येक गोष्टीसाठीं त्याला लोहाराची पायरी चढावी लागत नसे. कारण त्याचा बाप सुतारकाम करीत असे. त्याचीं हत्यारें घेऊन हेन्रीसुद्धां कुऱ्हाडीचे दांडे वगैरे करीत असे. पुढें पुढें त्यानें आपल्या घरींच एक लहानसा कारखाना घातला. त्यानें एक लहानशी भट्टी तयार केली.

ऐरण, कातकाम करण्याचें यंत्र वगैरे सर्व चालचलाऊ सामान जमा केलें. फिरक्या, चक्क्या, वॉशर वगैरे हरएक लहानसहान वस्तू त्याच्या खिशांत भरलेल्या असत व आपल्या कारखान्यांत काम करितांना त्याला स्वर्गतुल्य आनंद होई; तो आपलें स्वतःचें भान विसरे, मग तहान भूक विसरे यांत नवल काय? आज प्रत्येक मुलाला तो जो अमूल्य उपदेश करितो तो त्या वेळीं स्वतः प्रत्यक्ष कृतींत आणीत असे. तो म्हणे, "आपण काय करीत आहों याकडे एक क्षणभर पूर्ण लक्ष देऊन सर्व मनोभावें करून जर प्रत्येक मुलगा आपलें काम करूं लागेल आणि अप्रिय असलेली गोष्ट हस्तगत करून टाकण्यासाठीं कष्ट करण्यास सिद्ध होईल तर तो एक कर्तृत्ववान पुरुष झाल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं." खरोखर बालपणांत हेन्री तंतोतंत असा वागत होता म्हणूनच तो आज एक कर्तृत्ववान पुरुष म्हणून गाजत आहे.

हेन्रीच्या परिचयाचीं जीं यंत्रें होतीं त्यांची रचना तेव्हांच त्याच्या ध्यानांत आली व तो तीं यंत्रें दुरुस्त करूनही देई. लोकांना ही गोष्ट हां हां म्हणतां समजली व ते त्याच्याकडे निरनिराळीं कामें घेऊन येऊं लागले. याबद्दल पैशाची विशेषशी पर्वा न करितां, आपल्या हौशीसाठीं व कौशल्यासाठीं तो तीं सर्व कामें करून देई.

हेन्री बारा वर्षांचा झाला तेव्हां त्याला एक घड्याळ मिळालें. तो म्हणतो आयुष्यांतील दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हीच. यापूर्वीं त्यानें एकदां घड्याळ दुरुस्त केलें होतें. एका रविवारीं तो देवळाकडे चालला असतां त्याचा मित्र फ्रँक हार्टचेंग्स हा त्याला भेटला आणि त्यानें पैदा केलेलें एक घड्याळ त्याचेपुढें करून तो म्हणाला. "हेन्री हें पाहिलेंस खरोखरचें घड्याळ? पण बेटें बंदच पडलें आहे!" तें कां बंद पडलें होतें तें हेन्रीला तरी कुठें माहित होतें? पण तो मोठ्या उत्साहानें उद्गारला,

"अं: त्यांत काय आहे. मी देतों नीट करून तें." फ्रँकला ती गोष्ट अशक्य वाटली व तो म्हणाला. "मी पैजेनें सांगतों कीं तुला तें दुरुस्त करतां येणारच नाहीं." हेन्री न बोलतां प्रत्यक्ष कामाला लागला.

हेन्रीनें एक खिळा घेतला व एका दगडावर घांसून घांसून त्याचा त्यानें एक लहानसा स्क्रूड्रायव्हर तयार केला व त्यानें तें घड्याळ उघडून पाहिलें. त्यानें असलें काम पूर्वी कधीं केलें होतें असें मुळींच नाहीं. परंतु जरा लक्षपूर्वक पहाण्याबरोबर तें स्वच्छ करण्यापलीकडे कांहीं करण्याची जरूरी नाहीं असें त्याला आढळून आलें. लगेच त्यानें ते सर्व भाग उकलून साफसूफ करून व पुन्हां ते जागच्याजागीं बसवून घड्याळ चालू केलें. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं तें चांगलें चालूं लागलें! हेन्री म्हणतो "अशा रीतीनें घड्याळें दुरुस्त करण्याच्या माझ्या धंद्यास सुरवात झाली" पण इतकें होईपर्यंत त्याला देवळास जाण्याची आठवणसुद्धां राहिली नाहीं. त्याचे रविवारीं वालावयाचे सुंदर कपडे पहाण्यासारखेच झाले होते! त्याबद्दल त्याची घरीं थोडीशी कानउघाडणीही झाली—पण आपण घड्याळ चालू केलें हें समाधान त्याला विशेष वाटलें.

त्याला स्वत:चें घड्याळ मिळालें हें वर सांगितलेंच आहे. ह्या घड्याळाचा तो मालक असल्यामुळें त्याची रचना पूर्णपणें ध्यानांत यावी म्हणून त्याचे सर्व भाग निरनिराळे करून पुन्हां जागच्याजागीं त्यानें बसविले. पुष्कळ वेळां असें केल्यानें घड्याळाची सर्व रचना त्याच्या परिचयाची झाली. तो मोडकीं घड्याळें दुरुस्त करूं लागला, आणि तेंही आपल्या ओबडधोबड हत्यारांच्या साहाय्यानें! तो पंधरा वर्षांचा असतांच घड्याळ दुरुस्त करणें म्हणजे त्याच्या हाताचा मळ होऊन बसला होता!

हेन्रीला एंजिनाची भीति तर कधींच वाटली नाहीं; उलट त्याचा आवाज ऐकण्यांत त्याला गंमत वाटे. आपण एंजिनियर व्हावें असें त्याला फार वाटे.

त्याच्या घरापासून एक मैल अंतरावर लांकडें कापण्याचा कारखाना होता. एका रविवारीं तो एकटाच फिरत फिरत तिकडे गेला. तेव्हां एंजिनाच्या बंबावरचें झांकण कोणीं काढून ठेविलेलें त्याला दिसलें. झालें! आंतला व्हॉल्व्ह कसा फिरतो हें पाहण्यासाठीं अस्तन्या चढवून हेन्रीनें आपला हात त्यांत घातला. " त्याबरोबर " हेन्री स्वतः लिहितो, " एंजिन थोडेंसें फिरलें आणि माझा हात पकडला गेला! आणि तें एंजिन परत फिरवून माझा हात सोडवून घेण्यासाठीं मला दीडतासपर्यंत लांकडाचा भुसा दुसऱ्या हातानें एकसारखा उसपावा लागला! परंतु व्हॉल्व्ह फिरतो कसा तें मात्र नीट समजलें. "

सुमारें तेरावें वर्ष लागलें तेव्हां एकदां हेन्री आपल्या बापाबरोबर गाडींत बसून डिट्रॉटला चालला होता. वुइल्यम फोर्डच्या गाडीचे घोडे बिचकूं नयेत म्हणून समोरून येणाऱ्या खडी दाबण्याच्या एंजिनवरील माणसानें तें एंजिन थांबविलें. हेन्रीला ही संधी मिळतांच तो गाडींतून उतरून एंजिनवर चढला व त्या एंजिनियरला हजारों प्रश्न विचारूं लागला. त्या एंजिनियरनेंही त्याला सर्व प्रश्नांचीं उत्तरें देऊन तें बॅटलक्रीक येथें ' निकोल्स शेपर्ड आणि कंपनी ' यांनीं बनविलेलें आहे असें सांगितलें. या एंजिनमध्यें विशेष हें होतें कीं मागच्या चाकांना जोडलेली अशी एक सांखळी होती. हेन्रीनें पहिली मोटार गाडी हीच पाहिली म्हटली तरी चालेल. त्यानें याचें एंजिन इतक्या सूक्ष्म रीतीनें पाहिलें कीं जणूं काय तें कालच पाहिलें याप्रमाणें त्याची स्मृती अद्यापि जागृत आहे.

ह्या एंजिनची सांखळी काढून पट्याच्या साह्यानें दुसरीं यंत्रें कशीं चालवितां येतात, मागील गाडीचा दुवा तोडून नुसतें एंजिन कसें चालूं शकतें वगैरे सर्व गोष्टी त्या एंजिनियरनें हेन्रीला स्पष्ट करून सांगितल्या. अर्थात् हेन्रीच्या मनांत ह्या एंजिनाची गोष्ट इतकी भरली कीं त्यानें

एंजिनांतील पाणी तापविण्याच्या टाकीशिवाय सर्व एंजिनाचा एक लाकडी नमुना तयार केला. आणि टांकीसाठीं पांच गॅलनची तेलाची टाकी बसवून दिली. पुढें याचा अनुभव घेऊन त्यानें लौकरच धातूचे पत्रे, पट्या वगैरे सामान जमवून एक एंजिन बनविलें आणि तें चालूंही लागलें.

या बाबतींत एक परद्वीपस्थ गृहस्थ म्हणतो, "एका अत्यंत उच्च तत्वाची हेन्रीच्या मनांत स्फूर्ती उत्पन्न झाली होती. तें तत्त्व म्हणजे 'मजुरांच्या पाठीवरचें ओझें काढून लोह व बाष्प यांच्या पाठीवर लादणें हें होय.' प्रथमतः हें तत्त्व व्यक्तिनिष्ठ होतें म्हणजे हेन्रीला शेतावरचें काम आवडत नसे, पण यांत्रिक गोष्टींची त्याला फार हौस होती."

इतर वाचनाचा नाद त्याला फारसा नव्हता; पण यांत्रिक कलाकौशल्याच्या माहितीनें भरलेलीं पुस्तकें, मासिकें वगैरे जें जें सांपडेल तें तें वाचून टाकल्याशिवाय तो रहात नसे. तो म्हणतो, "वस्तूची जोडमोड करूनही पुष्कळ शिकतां येतें; प्रत्येक गोष्ट कशी झाली आहे हें पुस्तकांतून शिकणें शक्य नाहीं. त्याला यंत्राशींच झुंजलें पाहिजे. लेखकाला पुस्तकांचा जो उपयोग तोच यंत्रांचा शिल्पशास्त्र्याला असतो. त्याला त्यांपासून कल्पना सुचतात. आतां त्यांचा उपयोग कसा करावयाचा तें त्याच्या बुद्धीवर अवलंबून असतें."

उत्तम शेतकरी होण्याचें भाग्य वुइल्यम फोर्डच्या वांट्याला आलें होतें. त्यामुळें आपल्या मुलानेंहि उत्तम शेतकरी व्हावें अशी त्याची इच्छा असणें स्वाभाविक; मुलें जशीं पक्ष्यांचीं अंडीं, गारगोट्या वगैरे जिन्नस जमा करतात त्याच प्रमाणें हेन्रीनें केलेल्या यांत्रिक घडामोडी ही बाळपणचीच हौस असेल असें त्याला वाटलें व शेतकऱ्याला यांत्रिक ज्ञान असलें तर दुधांत साखर पडल्यासारखेंच आहे, असें समजून वुइल्यमनें आपल्या मुलाच्या चळवळींत

प्रथम प्रथम खो घातला नाहीं. पण उत्तरोत्तर हेन्रीची यांत्रिक ज्ञानाची लालसा वाढूं लागली तसतसें वुइल्यमला जड जाऊं लागलें. आपल्या इच्छेविरुद्ध दिशा स्वीकारण्याची आपल्या मुलाची इच्छा इतकी जबरदस्त कां याची त्याला कल्पना होईना व तो त्याचा उत्साहभंग करण्याचा प्रयत्न करूं लागला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हेन्रीला आपल्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या दिव्य शक्तीची हांक ऐकणें भाग होतें. शेवटीं सतराव्या वर्षी शाळेला रामराम ठोकून डिट्रॉटला आपल्या अंतः-प्रेरणेप्रमाणें चालण्यास तो निघून गेला.

---

## प्रकरण ४ थें.

## ध्येयासक्ति आणि स्वावलंबन.

डिट्रॉट शहरांत लाखावर वस्ती असून १८८० सालीं तें मोठ्या भर-भराटीस आलेलें होतें. त्याच्यांत पुष्कळ कारखाने होते व यंत्रांचीं पुष्कळ दुकानेंहि होतीं. हेन्रीच्या घरापासून तें शहर फार लांबही नव्हतें व त्याच्या कलाप्रमाणें त्याला तेथें यांत्रिक शिक्षण मिळेल अशी बरीच आशा वाटत होती. डिट्रॉटला पोंहचल्याबरोबर आपल्या मनाजोगतें काम कोठें मिळतें कीं काय तें पहाण्यासाठीं तो हिंडूं लागला. स्वतःच्या करा-मतीवर पोट भरायचें असल्यामुळें त्याला आपलें कसें होईल काय होईल अशी काळजी लागली असेल अशी कोणाची समजूत होईल पण ती चुकीची आहे. काळजी, शंका, वगैरे गोष्टी त्याला ठाऊकच नव्हत्या. तो म्हणतो, “ मला जें पाहिजे होतें तें मिळतच गेलें; शंका कुशंका, काळजी यांच्या जाळ्यांत अडकल्याचें मला कधींच आठवत नाहीं. ”

जेम्स फावलर आणि कंपनी या नांवाचें डिट्रॉटमध्यें एक यंत्राचें मोठें दुकान होतें. ही मंडळी वाफेचीं यंत्रें तयार करीत. हेन्री त्या कारखान्यांतील एका

कामगाराला भेटला. त्या कारखान्यांत नोकर पुरेसे नव्हतेच त्यामुळें हेन्रीला दर आठवड्यास अडीच डालरवर लावण्याचें त्यानें कबूल केलें व दुसरे दिवशीं सकाळीं येण्यास सांगितलें. आपल्या कल्पनेबाहेर काम झालें याबद्दल हेन्रीला आनंद झाला ! आतां राहायला किंवा झोंपायला जागा शोधायची हें काम राहिलें. परंतु त्याच्या पगारांत चांगली जागा मिळणें अशक्य झालें. त्याच्याजवळ पांच डॉलर्स शिल्लक होते परंतु आपल्याला आपल्या पगारांतच गुजरण केली पाहिजे हें तो जाणून होता. त्यानें ताबडतोब असा विचार केला कीं, काटकसरीनें आणि साधेपणानें राहिलें तरी चांगल्या जागेंत नीट नेटकें राहावें हें उत्तम. मग जादा काम करून भाड्यासाठीं पैसे कमवावे लागले तरी हरकत नाहीं. तेव्हां दर आठवड्याला राहत्या खोलीचें भाडें व जेवणखर्च मिळून त्याला साडेतीन डॉलर खर्च आला तरी तितका करण्यास तो तयार झाला. लगेच पहिल्या आठवड्याचे पैसे त्यानें आगाऊ भरले व दर आठवड्याला आणखी एक डॉलर कसा पैदा होईल याचा तो विचार करूं लागला. परंतु त्याला त्याबद्दल मोठीशी काळजी वाटली नाहीं. 'चांगला मनुष्य कधींहि फुकट जायचा नाहीं' या म्हणीवर त्याचा पूर्ण विश्वास होता.

दुसरे दिवशीं सकाळीं सात वाजतां तो आपल्या कामावर रुजू झाला. सर्व तऱ्हेचें बारीकसारीक काम त्याला सांगण्यांत आलें. वास्तवीक उमेदवाराचें काम फार जिकिरीचें व कंटाळवाणें असतें; पण इतर उमेदवारांप्रमाणें हेन्री नव्हता. कांहींतरी श्रमाचें काम मिळविण्याच्याच तो उद्योगांत होता. तेव्हां अशा कामापासून दरक्षणीं त्याला दुःख तर झालें नाहींच पण उलट आनंद होऊं लागला. एवढेंच नव्हे तर कारखान्यांतील हवा सुगंधी असल्याबद्दल त्याचें घ्राणेंद्रिय त्याला ग्वाही देऊं लागलें. राजवाड्यांत राजाला जें सुख होत नाहीं तें हेन्रीला या कारखान्यांत होत असे.

मनुष्याचें मन असें आहे! इच्छित गोष्ट मिळाली कीं त्याच्या सुखाला पारावार असत नाहीं. जें ज कोणीं काम देईल तें तें हा चटूदिशीं करून टाकूं लागला. अंगीकृत कर्तव्याचा बोजा त्याला कधीं वाटला नाहीं. त्याच-प्रमाणें काम म्हणजे खेळ नव्हे ही गोष्टही तो ओळखून होता. कामाकडे पहाण्याची त्याची दृष्टी निराळी होती. काम करीत राहणें हें तो फार महत्वाचें गणी. काम करण्याची आवड उत्पन्न झाल्याकारणानें सात आठ तास काम करणें त्याला कांहींच वाटत नसे.

त्याला दर आठवड्याला आणखी एक डॉलर मिळविणें प्राप्त होतें; म्हणून पहिल्या दिवशीं रात्रीं भोजन झाल्यावरोबर तो वाहेर पडला व व घड्याळ दुरुस्त करणाऱ्या एका दुकानाशीं येऊन थडकला. कारण त्याला ठाऊक होतें कीं जर आपल्या अंगीं कांहीं करामत असेल तर ती याच धंद्यांत ! मॅक्गील नांवाच्या एका घड्याळजीनें रात्रीं चार तास नोकरी करण्याच्या अटीवर त्याला आठवड्यास दोन डॉलर देण्याचें कबूल करून नोकरीस ठेविलें. रात्रीं भोजन करून तो दररोज सात वाजेपासून अकरा वाजेपर्यंत काम करी ! खरोखर पाहिलें तर सर्व दिवस राबून काम केल्यानंतर पुन्हां चार तास काम करावयाचें म्हणजे कोण त्रासदायक ! पण कामाचा कंटाळा त्याला कधीं आलाच नाहीं. तो म्हणतो, "काम करणें हाच मनुष्याचा स्वाभाविक धर्म आहे. प्रत्येकानें हेंच लक्षांत वागविलें पाहिजे कीं अंतःकरणपूर्वक केलेल्या प्रयत्नांपासूनच त्याला सौख्य आणि सुस्थिती हीं लाभणार आहेत. या स्वाभाविक धर्मापासून म्हणजे कर्तव्यसातत्यापासून परावृत्त होण्यानेंच सर्व मानवी दुःखांची उत्पत्ती होते." पुढें एके ठिकाणीं तो म्हणतो, "श्रम करणें हा मनुष्याचा हक्क आहे. आणि हा हक्क बजाऊनच मनुष्यानें पृथ्वीला फलप्रदत्व मिळवून दिलेलें आहे." पण घड्याळाची कारागिरी समजून घेण्याची उत्सुकता

इतकी तीव्र होती कीं हेन्रीला ह्या वेळींही कंटाळा आला नाहीं ! तनमनधन खर्च करून यंत्रकला हस्तगत करण्याचा निश्चय झालेला ! मग त्याला करमणुकीची किंवा खेळाची इच्छा तरी कशी होणार ? त्याला खेळण्याची जरूरही भासली नाहीं आणि त्याला वेळही नव्हता. तो म्हणतो, " मला लागणारी करमणुक किंवा विश्रांति मला माझ्या कामांतूनच मिळवितां येते."

कांहीं दिवस गेल्यानंतर त्याचा बाप मुलाची चौकशी करण्यासाठीं डिट्रॉटला आला आणि दुकानामागून दुकान शोधतां शोधतां, मोठ्या आनंदानें एका दुकानांत चिरंजिवांची स्वारी काम करीत असलेली त्याला आढळली. घरीं येऊन पुन्हां मुलानें शेतकीच्या धंद्यांत लक्ष घालावें म्हणून त्यानें जंग जंग पछाडलें. पण राम शिवा गोविंदा !! आपण जें करीत आहोंत त्यांतच आपलें हित आहे व तेंच करीत राहिलें तरच आपल्याला सुख होईल असें त्यानें आपल्या बापाला स्वच्छ सांगितलें. त्याचा बापहि पण समजूतदार होता. त्यानें फारसें ओढून न धरतां त्याच्या मर्जीप्रमाणें करण्याची त्याला परवानगी दिली. पण मन बदललें किंवा घरीं यावेंसें वाटलें तर घरीं येण्यास चुकूं नको म्हणून बजावून तो पुनश्च आपल्या शेतीकडे निघून गेला. परंतु एवढी मोठी शेती घरची असतां ती टाकून आपल्या थोरल्या मुलानें कामकरी बनावें याबद्दल त्याला अतोनात वाईट वाटलें. त्याच्या दृष्टीनें कारागिरीचा धंदा शेतकीच्या धंद्यापेक्षां हलक्या प्रतीचा असल्यामुळें तो आपल्या मुलानें पतकरावयाला नको होता !

नऊ महिनेपर्यंत हेन्रीनें दररोज पंधरा तास काम करण्याचा सपाटा ठेविला होता ! इतक्या अवधींत उत्तम यंत्रें आणि हत्यारें कशीं वापरावीं हें तो शिकला. यंत्रकलेचीं मूलभूत तत्त्वें काय व धातुकामाच्या पद्धती

कोणत्या याचा त्यानें अभ्यास केला. मासिकांतून व इतर नियत-कालिकांतून जी माहिती मिळेल तिचें मननही त्यानें लक्षपूर्वक केलें. होतां होतां काम करण्याच्या सर्व पद्धतींत तो पूर्ण तरबेज झाला. पण त्याबरोबरच त्या पद्धतींचा त्याला कंटाळाहि आला. त्या वेळीं माल तयार करण्याच्या पद्धतींत ठरींवपणा आला नव्हता किंवा आज ज्याला आपण औद्योगिक श्रेष्ठत्व म्हणूं तें त्या काळीं कोणाला माहीत नव्हतें. पद्धतशीरपणें वेळेची किंवा श्रमाची बचत करण्याची कल्पना कोणासही ठाऊक नव्हती. खरें म्हटलें तर मालाचीही नासधूस पुष्कळ होई. 'तोड मोड, काप आणि जोड' या पद्धतीनें यंत्रें तयार केलीं जात. एकादा भाग जुळता होण्यासाठीं घासून किंवा किसून तयार करण्यांत जो दीर्घ काल व्यर्थ जाई त्याची तर गणतीच नाहीं. बरें माणसांची या कामावरून त्या कामावर वारंवार बदली होत असल्यामुळें कोणतेंच काम कोणाला उत्तम प्रकारें करितां येत नसे. मग त्यांत कौशल्य संपादन करण्याची गोष्ट कशाला ? हेन्रीला याबद्दल अत्यंत चीड येई. या कामाच्या पद्धतींत सुधारणा झालीच पाहिजे असें त्याला एकसारखें वाटे.

हेन्रीला आतां दर आठवड्याला साडेतीन डॉलर पगार मिळूं लागला होता पण त्यानें आपल्या नोकरीचा राजिनामा दिला व ड्राय डॉक एंजिन कंपनी मध्यें पुन्हां अडीच डॉलर पगारावर त्यानें नोकरी धरली. हें वाचून वाचकांना आश्चर्य वाटेल. पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. ह्या कंपनींत मरीन ( सागर यंत्रें ) एंजिनें करीत. या ठिकाणीं नवीन शिकण्यासारखें पुष्कळ असल्यामुळें कमी पगार पतकरूनही हेन्री तेथें राहिला. फावलर कंपनीपेक्षां या कंपनींत नोकरांची संख्या दुपटीपेक्षांही अधिक असल्यामुळें हेन्रीसारखे पुष्कळ तरुण लोक कामावर होते. त्यांचा स्वभाव थट्टेखोर व आनंदी असल्यामुळें हेन्रीला त्यांच्यांत मिसळायला मुळींच वेळ लागला

नाहीं. हसणें, खेळणें, मौज करणें यांमुळें सर्वांचा तो अगदीं आवडता झाला; पण एका गोष्टीपासून तो अगदीं अलिप्त राहिला. त्याच्या बरोबरचे इतर लोक दारु पिणें, ख्यालीखुशाली करणें, जुगार खळणें वगैरे गोष्टी मनसोक्त करीत; पण या बाबतींत त्यांचें व हेन्रीचें कधीं पटलें नाहीं. तो कोणाला उपदेश करावयाला जात नसे, पण आपलें स्वतःचें वर्तन मात्र पायाशुद्ध राखण्यासाठीं तो अगदीं डोळ्यांत तेल घालून जपे. तो दारूला शिवला नाहीं एवढेंच नव्हे तर तंबाकू सुद्धां त्यानें ओढली नाहीं. आपणा स्वतःला याबद्दल तो ढुङ्घाचार्य समजत नसे. त्याचें म्हणणें इतकेंच कीं आपलें वर्तन कसें असावें हें ठरविण्याचा हक्क ज्याचा त्याचा आहे. इतरांना दारू पिणें आवडतें तर आपणाला आवडत नाहीं; आपण त्यांच्या आड येत नाहीं तर लोकांनींही आपल्या इच्छेच्या आड येऊं नये. या त्याच्या तत्त्वाबद्दल त्याच्या मित्रांना उलट त्याच्याबद्दल आदरच वाटे. ते बिचारे चाललेली घटका आपली असें मानून सुखोपभोगांत दंग झाले होते तर हेन्रीची दृष्टी भविष्यकाळाकडे लागली होती !

या गडबड्या लोकांच्या संगतीचा एक सुपरिणाम हेन्रीवर झाला. हेन्री जर त्यांच्यांत न मिसळता तर आपल्या कामामध्यें चूर होऊन एकलकोंडा बनला असता; पण वरील लोकांच्या संगतीमुळें तो माणुसघाण्या न बनतां चार मंडळींत मिळून मिसळून वागण्याची त्याची प्रवृत्ती वाढली.

दोन वर्षांच्या अवधींत तो यंत्रकलेंत पूर्ण निष्णात झाला. वास्तविक उमेद्वारीची मर्यादा तीन वर्षांची होती तरी तो दोन वर्षांतच उमेद्वारीच्या दर्जीतून बाहेर पडला; व त्याला दर आठवड्याला पांच डॉलर मिळूं लागले. यानंतर त्यानें मॅक्गिलची नोकरी सोडून दिली.

या वेळीं एक कल्पना त्याच्या डोक्यांत रात्रंदिवस घोळूं लागली होती. घड्याळाची रचना त्याला पूर्ण अवगत झाली होती; तेव्हां घड्याळाचे सर्व भाग यंत्रसाह्यानें जर पुष्कळ मोठ्या प्रमाणावर तयार केले तर कामचलाऊ घड्याळ तीस सेंटांस पडायला कांहीं हरकत नाहीं असा त्याला विश्वास वाटूं लागला. या कल्पनेनें तो अगदीं मोहित होऊन गेला. तो म्हणे, " प्रत्येकाला घड्याळ पाहिजेच. मी दररोज दोन हजार घडयाळें तयार करीन म्हणजे मला ५० सेंटांस घड्याळ विकतां येईल."

त्यानें लगेच जरूर त्या यंत्रांचें चित्ररेखन केलें व कांहीं भागांचे शिक्केही तयार केले. त्याच्या ओळखीचा एक जवाहिऱ्या होता. तोही तरुणच असल्यामुळें त्याला ही कल्पना आवडली व भांडवल जमवून उद्योगाला लागायचें असें त्यांनीं ठरविलें. पण लवकरच त्यांनीं हा बेत रद्द केला. कारण घड्याळ ही अगदीं जीवनाच्या जरुरीची गोष्ट नसल्यामुळें इतक्या मोठ्या प्रमाणावर जर ती निर्माण केली तर ती खपणार कशी अशी त्यांना भीति पडली ! खरोखर म्हटलें तर ही भीति निष्कारण होती. कारण पुढें प्रतिवर्षीं लाखों मोटारी काढूनसुद्धां जगाच्या मागणीचा पुरवठा करतां येत नाहींसा झाला. परंतु झाली गोष्ट तीही एका अर्थानें बरीच झाली असें म्हटलें पाहिजे.

ड्रायडॉक कंपनींत दोन वर्षें नोकरी करून तेथील गुरुकिल्ली हस्तगत झाल्यावर हेन्रीनें ती नोकरी सोडून दिली व जॉन चीनीकडे 'वीथिकुशल' (रोड एंजिनियर) म्हणून नोकरीस राहिला. जॉन चीनी हे वेस्टिंग हाऊस कंपनी'चे एंजिनांचे अडते होते. यामुळें नवीन एंजिनें घेणाऱ्या गिऱ्हाईकांस माहिती देण्यास किंवा नादुरुस्त यंत्रें दुरुस्त करून चालू करून देण्यास हेन्रीला जावें लागे. या नोकरीवर हेन्री सरासरी एक वर्ष राहिला व नंतर ती सोडून तो आपल्या बापाला शेतीमध्यें कांहीं काळ मदत

करण्यासाठीं गेला. यावेळीं तो बापाकडे गेला तो त्याला शेतीबद्दल मोठा कळवळा आला म्हणून नव्हे तर त्याला स्वतःला कांहीं प्रयोग करून बघावयाचे होते म्हणून !

आतां त्याच्या घरच्या कारखान्यांत पुष्कळ सुधारणा झाली होती. उत्तम भट्टी, उत्तम हत्यारें, (लेथ) पायानें फिरविण्याचें कातकामाचें यंत्र, वगैरे भरपूर साधनसामुग्री त्याच्या जवळ तयार होती. तो म्हणतो, "लहानपणाच्या खेळांतील जिनसांच्या कारखान्याजागीं आतां पहिल्या प्रतीचा कारखाना उत्पन्न झाला होता." पूर्वींच्या व आतांच्या कारखान्यांत जसा फरक पडला होता, त्याचप्रमाणें पूर्वींच्या व आतांच्या हेन्रीमध्येंही विलक्षण फरक पडला होता. लहानपणीं हेन्री आपल्या नैसर्गिक बुद्धीनें हत्यारें वापरी त्या वेळीं त्याला शिक्षणही मिळालेलें नव्हतें किंवा त्याच्या ठिकाणीं कुशलताही उत्पन्न झाली नव्हती. आतां तो एक लोकोत्तर कुमार म्हणून आपल्या बुद्धिबलावर वाटेल तें यंत्र आपल्या कारखान्यांत लहानप्रमाणावर बनविण्यास पात्र झाला होता व आपल्या अचाट कल्पनांना मूर्तरूप देण्याच्या खटपटींत तो होता.

---

प्रकरण ५ वें.

## गृहस्थाश्रमांत प्रवेश.

बापाकडे परत आल्यावर आपल्या नेहेमींच्या उत्साहानें शेतीचीं कामें हेन्री करूं लागला खरा, पण पहाटें उठावयाचें व गाईचा गोठा झाडावयाचा व घोड्यांचा खरारा करावयाचा या गोष्टी त्याच्या जिवावर येत. शेतकीचीं कामें देखील कष्टप्रद व कालापव्यय करणारीं असल्यामुळें त्याला आवडत नसत; पण जोंपर्यंत सुकर अशा अन्य पद्धतीचा आयश्र करणें त्याच्या

आंवाक्यावाहेर होतें तोंपर्यंत तो पूर्वपद्धतीप्रमाणेंच आपलीं कामें उरकून टाकी.

याच सुमारास त्याची मार्गारेट नांवाची वहीण मोठी झाली होती व पुष्कळांचें तिच्यावर प्रेम होतें. तिच्यामुळें पुष्कळ तरुण मुलगे हेन्रीच्या घरीं येत व फराळ, मेजवान्या, वनभोजन, घोड्यावरून रपेट करणें वगैरे अनेक मौजेचे प्रकार चालत. मुलांच्या वरोवर अनेक मुलीही येत; पण हेन्रीला मुलींच्यावद्दल इतकासा जिव्हाळा वाटला नाहीं. परंतु एकदां उन्हाळ्यांत सर्व काम संपून सुगीच्या मेजवानीसाठीं पुष्कळ मंडळी जमली होती. त्यांत एक सुंदर मुलगी त्याच्या नजरेला पडली तेव्हांपासून मात्र तिच्यावद्दल त्याच्या मनांत एक कोमल भाव उत्पन्न झाला आणि इत:पर कोठेंही जेवणावळ असली किंवा मंडळी जमायची असली म्हणजे हेन्री आपला त्या ठिकाणीं हजर राहूं लागला.

ज्या मुलीनें एवढा परिणाम हेन्रीच्या चित्तावर करून त्याचें मन आकर्षून घेतलें तिचें नांव क्लाराब्रँट होतें. हेन्रीच्या घरापासून कांहीं मैल अंतरावर ती रहात असे. हेन्री ज्या शाळेंत जात असे त्या शाळेंत ती जात नसल्यानें तिची व त्याची पूर्वीं गांठ पडून ओळख झालेली नव्हती. ही मुलगी देखणी व उपवर असल्यामुळें पुष्कळ तरुण मुलांचा ओढा तिच्याकडे लागला होता. जो तो तिची मनधरणी करण्यांत चूर असे. अर्थात् हेन्रीलाही तिची मनधरणी करणें प्राप्त होतें. पण त्याचे मार्ग भिन्न असल्यामुळें त्याच्याकडे त्या मुलीचें प्रथम प्रथम इतकेंसें लक्ष गेलें नाहीं. हेन्री डिट्रॉट शहरांत राहिलेला असला तरी त्यामुळें त्याला अलौकिकपणा आला होता असें थोडेंच आहे ? तिची बरदास्त राखण्यासाठीं वरेच युवक एका पायावर तयार असल्यामुळें ती त्यांच्या पैकींच कोणाशीं तरी नाचे व सहजच हेन्रीकडे तिचें दुर्लक्ष होई. पण हेन्रीला तिच्याकडे

दुर्लक्ष करून कसें भागणार ? त्याला नाचायला येत नव्हतें पण तो लगेच नाचायला शिकला. तो त्या क्लाराच्या अगदीं पुरा भजनीं लागला व तिलाही तें आढळून आलें. या प्रेमसंबंधामुळें शेतकी करण्यांतच गंमत आहे अशी त्याची कांहीं काळ समजूत झाली ! वर्फवृष्टी झाल्यावर पडलेलें चांदणें त्याला मनोहर वाटूं लागलें ! ताऱ्यांचा प्रकाशसुद्धां मोठा चित्ताकर्षक असतो असें त्याला वाटूं लागलें. याप्रमाणें त्याचें प्रियाराधन चाललें होतें खरें पण इतर मंडळीही कांहीं स्वस्थ बसली नव्हती. हेन्री कांहीं मुलांमुलींना आपल्या गाडींतून मेजवान्यांना न्यायचा तर दुसरा एक तरुण प्रत्यक्ष क्लारालाच गाडींतून हिंडवी. परंतु हेन्रीच्या मनाची शांतता कधीं ढळली नाहीं.

यापूर्वी कांहीं दिवस ( Standard time ) 'नियमित वेळ' जिकडे तिकडे सुरू करण्यांत आली होती. डियरबोर्नमध्यें 'सूर्यकालमापन' पद्धतीच सुरू होती. ह्या दोन वेळांचा हेन्रीला फार त्रास वाटे म्हणून दोन्ही वेळा समजतील अशा प्रकारचें घड्याळ तयार करण्याचें स्वारीनें ठरविलें व तें अमलांत आणिलें. त्याला दोन तबकड्या आणि दोन काट्यांचे जोड असल्यामुळें तें दिसायला जरा विचित्र दिसे. एके दिवशीं रात्रीं क्लारा हेन्रीच्या घरीं आली असतां त्यानें तें घड्याळ तिला दाखविलें आणि तेव्हांपासून तिचें हेन्रीकडे जरा जास्त लक्ष वेधूं लागलें.

इतर तरुण मुलांप्रमाणें याला फक्त प्रियाराधनच करावयाचें नव्हतें. शेतकीचीं कामें तो करीत असेच, शिवाय गुरांची खरेदीविक्री सुद्धां करण्यांत तो चांगला नफा मिळवीत असे. तेव्हां तेंहि काम त्याला पहावें लागे.

दिवसामागून दिवस जाऊं लागले तरी त्या मुलीच्या प्रकरणाचा कांहींच निकाल लागेना; तेव्हां हेन्रीनें आपल्या बापाजवळ ती गोष्ट काढली व बापालाही ती गोष्ट ऐकून मोठा आनंद झाला; कारण आपल्या मुलानें

यंत्रकलेच्या नादीं न लागतां उत्तम शेतकरी बनून जमीनदार व्हावें ही त्याची इच्छा. तेव्हां एका शेतकऱ्याच्या सुस्वरूप मुलीवर हेन्रीचें प्रेम जडलेलें पाहून त्याच्या मनांत प्रेमाचें भरतें आलें व त्यानें चाळीस एकर जमीन हेन्रीला देऊं केली. त्या जमिनीपैकीं कांहीं भाग लागवडीचा होता; व बाकीच्या भागांत इमारतीच्या लांकडांचीं झाडें होतीं. त्यांतील कांहीं झाडें कापून हेन्रीनें आपलें घर बांधावें व इतर झाडें कापून, कांतून, व इमारतीचीं लांकडें करून तीं विकावीं व पैसे करावे असें त्याच्या बापानें सुचविलें. हेन्रीनें तावडतोब त्याचें म्हणणें मान्य केलें व त्यामुळें बुइल्यमचा आनंदही गगनांत मावेनासा झाला.

इतक्या अवकाशांत हेन्रीचें प्रियाराधन पुरें होऊन त्याला यश आलें. क्लारानें आपली संमति दिली व १८८८ सालीं त्याचें व क्लाराब्रँटचें लग्न झालें. हेन्रीनें कांहीं वृक्ष निवडून काढून, ते कापून त्यांचीं इमारतीचीं लांकडें बनविलीं. आपल्या बायकोच्या साहाय्यानें त्यानें आपल्या नूतन गृहाचा नमुना आंखला व त्याप्रमाणें स्वतः बांधावयाला सुरवात केली; केवळ एका मजुराच्या मदतीनें आपल्याला हवें तसें सुखावह घर त्यानें तयार केलें. त्या घरांत एकतीस चौरस फूट जागा असून वरतीं थोडा माळा होता. जरूरीच्या जिनसा घेऊन हें नवपरिणित दांपत्य आपल्या नूतन गृहांत राहावयास गेलें. या पतिपत्नींचा संसार मोठ्या सुखाचा, प्रेमाचा व मित्रत्वाचा होता. कधीं भांडण नाहीं कीं तंटा नाहीं! एकमेकांच्या विचारानें एकमेकांचें काम करून हें जोडपें या ठिकाणीं मोठ्या आनंदानें काल-क्रमणा करूं लागलें.

शेतकऱ्याचा जीवनक्रम जरी हेन्रीच्या आवडीचा नव्हता तरी एकदां त्यांत पडल्यावर त्यानें आपली शेती मोठ्या कौशल्यानें करण्यास सुरवात केली. शक्य तितका यंत्रांचा उपयोग करून तो पीक काढूं लागला. वेळ,

श्रम व पैसा यांची जितकी बचत करतां येईल तितकी करण्याचा त्यानें एकसारखा उद्योग चालविला. नोकरीस राहिलेल्या माणसाचें व त्याचें भांडण होत नसे! आपल्या गरजा काय आहेत हें पाहूनच त्यानें आपलें वर्तन ठेविल्यामुळें त्याचें व त्याच्या नोकरांचें चांगलें जमत असे.

त्याचप्रमाणें गुरें खरेदी करणें व विकर्णे हा धंदा चालूच होता. त्यांतच 'बक आय हार्वेस्टर कंपनी'मध्यें इंजिनें बसविण्याच्या व दुरुस्त करण्याच्या नोकरीचाहि त्यानें स्वीकार केला. यामुळें त्याच्या इंजिनाच्या ज्ञानांत आणखी भर पडली. या विषयावरील मासिकें व इतर पुस्तकें यांचें वाचन चालूच होतें.

वर सांगितलेला धंदा करतांना इतर व्यापाऱ्यांशीं व गिऱ्हाइकांशीं आणि नोकरांचाकरांशीं कसें वागावें लागतें हें त्याला कळूं लागलें. उत्तम व मोकळ्या हवापाण्याचा लाभ मिळाल्यामुळें त्याची प्रकृतीहि खणखणीत झाली. परंतु शेतीची त्याला आवडच नसल्यानें त्याला चैन पडेनासें झालें. शेवटीं डिट्रोटला जावें ही गोष्ट त्यानें आपल्या बायकोजवळ बोलून दाखविली. तिला ही गोष्ट ऐकून प्रथम जबरदस्त धक्काच बसला! कारण तिला घर सोडून बाहेर जाणें कधींच आवडत नसे. हेन्री जरी मोठा श्रीमान नव्हता तरी त्याची बायको मोठी समाधानी असून आपला संसार मोठ्या टापटिपीनें चालवी तिचा आपल्या नवऱ्याच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास होता, म्हणून फारसे आढेवेढे न घेतां डिट्रोटला जाण्याचें तिनें कबूल केलें. बाकीच्या मंडळीला मात्र त्याचें हें करणें मूर्खपणाचें आहे असें वाटलें. शेजारीपाजारी कींव करूं लागले, क्षणांत येथें तर क्षणांत तेथें ही विहंगवृत्ति सोडून कोठें तरी कायमचें वास्तव्य करणें यासारखी दुसरी समंजसपणाची गोष्ट नाहीं असेंच सर्वांचें मत पडलें. आपली शेतवाडी सोडून स्थलांतर करावें यासारखी

घोडचूक हेन्रीनें करूं नये म्हणून त्याच्या बापानेंही भगीरथ प्रयत्न केला; पण फुकट! शेवटीं शेत खंडानें देऊन तो आपल्या पत्नीसह डिट्रॉटला गेला व 'डिट्रॉट इलेक्ट्रिक कंपनीमध्यें' इंजिनीयर व यंत्रशास्त्री म्हणून पंचेचाळीस डॉलरवर नोकरीस राहिला.

त्याला शेतीचें जें उत्पन्न येत होतें त्यापेक्षां आतां त्याला जास्त पगार मिळूं लागला खरा, परंतु यासाठीं त्यानें शेतकीचा त्याग केला असें नव्हे. तो शेतकीला कंटाळला होता ही गोष्ट जरी खरी असली तरी शेतकी सोडून देण्याचें मुख्य कारण हें नव्हतें. सर्व संशोधकांप्रमाणें तो एका उच्च ध्येयाच्या मागें लागला होता. कोणाला द्रव्यार्जनाची महत्वाकांक्षा असते; कोणाला स्वातंत्र्याची तळमळ लागलेली असते; कोणाला कीर्तीची हांव असते, तर कित्येकांना साम्राज्यतृष्णा असते! पण हेन्री फोर्डला लोकसेवा करून जगाचें कल्याण करण्याची हांव होती. आणि ही लोकसेवा करतांना द्रव्यार्जनासाठीं रात्रंदिवस धडपडणाऱ्या कोणाहि लक्ष्मीसेवकाच्या स्वप्नांतहि न येईल इतकी संपत्ति त्याच्या पायीं लोळण घेत येण्याचा योग त्याच्या कपाळीं लिहिला होता! आपल्याबरोबर इतरांनाहि एक मौजेचें स्वातंत्र्य त्यानें मिळवून दिलें! जगांतील अत्यंत कीर्तिमान पुरुषांमध्यें त्याची गणना होऊं लागली! आणि त्याच्या ध्येयपूर्तीमुळेंच त्याला विलक्षण सत्ता संपादन करितां आली!

---

## प्रकरण ६ वें.

# रात्रंदिवस श्रम करणारा वेडा पीर!

हेन्रीनें आपल्यापुढें जें ध्येय ठेविलें होतें तें अगदींच नवें होतें अशांतला भाग नाहीं. स्वतःसिद्ध गतीचें यंत्र शोधून काढण्याची खटपट हेन्रीपूर्वीं

पुष्कळ लोकांनीं केली होती. वाफेचीं यंत्रें निघाल्यापासून तर या कल्पनेला जोर आला होता. १६८६ त सर् ऐझाक न्यूटन, त्याचप्रमाणें १७६७ त निकोलस जोसेफ कगनॉट, १७८४ त मॅर्डोक, १७९० त नाथन रीड, १८०२ त रिचर्ड ट्रीव्हथिक वगैरे शोधकांनीं या नाहीं त्या प्रकारचीं वाष्पयंत्रें तयार केलीं होतीं. पुढें वॉल्टर हॅंकॉक यानेंही चार दोन एंजिनें तयार केलीं. परंतु १८४० च्या सुमारास इंग्लंडमध्यें सर्व एंजिनें लुप्तप्राय झालीं होतीं. रस्ते फार बिघडतात या सबबीवर लोकमत फार प्रक्षुब्ध होऊन त्यांची हकालपट्टी करण्यांत आली होती. त्यांच्यावर जबरदस्त कर बसविण्यांत आले होते व कायद्यानें असलें एंजिन चालवावयाला तीन माणसें असलीं पाहिजेत, पुढें एकजण तांबडें निशाण घेऊन चालला पाहिजे अशी अट घातली होती. वाफ सोडण्याची सुद्धां बंदी केली होती. कायद्याच्या ह्या बंधनामुळें ह्या बाबतींत कांहीं प्रगति होईल अशी आशाच वाटत नव्हती पण १८६० नंतर रस्त्यावरील बाष्पयंत्रें पुष्कळ बांधण्यांत आलीं व शेवटीं तीं अमेरिकेंतहि येऊन पोहोंचलीं.

यापुढें काय प्रगती होते याकडे सर्वांचे डोळे लागले होते. 'अश्वहीन रथ' निर्माण होतील अशी भविष्यवाणी ऐकायला येऊं लागली त्यामुळें 'अश्वहीन रथ' तयार करण्याच्या खटपटी जिकडे तिकडे जारीनें सुरू झाल्या. हेन्रीला याची वार्ताही नव्हती. शेतकीच्या कामाला घोड्याचा तादृश उपयोग होत नाहीं अशी त्याची समजूत झाली होती. कारण त्यांना पोसण्याकरितां फार खर्च येतो व ज्या वेळीं काम नसतें त्या वेळीं त्यांना रिकामें पोसणें भाग पडतें. म्हणून 'घोडा हें अगदीं ओबडधोबड यंत्र'च असलें तरी त्यापेक्षां पुष्कळ काम देणारें यंत्र माणसानें उपयोगांत आणिलें पाहिजे असें तो अजूनहि प्रतिपादन करितो. हेन्रीच्या मनांत अश्वहीन रथ तयार करण्याची कल्पना प्रथम आली नाहीं;

तर अश्वांच्या मदतीशिवाय जमीन नांगरतां कशी येईल इकडे त्याचें लक्ष लागलें होतें म्हणून ट्रॅक्टर (कृषियंत्र) बनविण्याचें त्यानें ठरविलें.

रस्त्यावर चालणारीं वाष्पयंत्रें डियरबोर्न येथें कोणाला ठाऊक नव्हतीं असें नाहीं. पण तीं फार अवजड असून फार किंमतीचीं असत. सामान्य शेतकऱ्याला त्यांचा उपयोग करितां येणें शक्य नव्हतें. तेव्हां अशा शेतकऱ्याच्या आवाक्यांतील यंत्राची रचना करण्याचें हेन्रीच्या मनांत घोळत होतें. चाकावरचीं वाष्पयंत्रें करणें हेन्रीच्या हातचा मळ होता पण तीं अगदीं हलकीं व किंमतींत स्वस्त कशीं होतील हा प्रश्न त्याला सोडवावयाचा होता. शेतकीच्या कष्टांचें ओझें मानवी प्राण्याच्या पाठीवरून काढून लोहपुरुषावर लादायचा त्याचा मानस होता.

परंतु हेन्रीला हा आपला विचार कांहीं दिवस सोडून देणें भाग पडलें. कारण असल्या नव्या यंत्राचे प्रयोग करून पहाण्याची लोकांची तयारी नव्हती. कोणत्याही देशांतील लोकांना जुन्या गोष्टीचा त्याग करून नूतन गोष्टींचा स्वीकार करतांना जडच जातें. खरें पाहिलें तर काल हाच खरा सुधारक व क्रांतिकारक होय. त्याच्या परिवर्तनामुळें कांहीं कांहीं गोष्टी सहज अमलांत येतात. पणं त्याच एकाद्या कट्टया सुधारकाला आपल्या पंचप्राणाची आहुती देऊन सुद्धां अमलांत आणतां येत नाहींत. म्हणून शेतकीमध्यें क्रांती करून टाकणारा ट्रॅक्टर ( कृषियंत्र ) निर्माण करण्याची कल्पना तूर्त बाजूस ठेऊन अश्वहीन रथ तयार करण्याच्या उद्योगासच लागण्याचें त्यानें ठरविलें.

यासाठीं तो आपल्या कारखान्यांत प्रयोग करी व केव्हां केव्हां तर सर्व करमणुकीला फांटा देऊन व मोठ्या मनोनिग्रहानें त्याला आपणाला कामाला जुंपून घ्यावें लागे. एकाद्या पिशाच्चानें पछाडावें त्याप्रमाणें वरील कल्पनेनें त्याला पछाडलें होतें. तो फावलरवर कंपनींत होता त्या वेळीं त्याच्या

एका मित्राजवळील ‘ शास्त्रीय जगत्’ या मासिकांत त्यानें ‘ निःशब्द वायुयंत्राची हकीकत वाचली होती व त्याचीं चित्रें व आकृत्याहि त्यानें पाहिल्या होत्या. त्यांना ओटे एंजिनें असें नांव असून तीं प्रकाशदायी वायूनें चालत व त्याच्यांत एकच दंडगोल असे. ‘ ईगल आयर्न वर्क्स ’नें एक ओटे एंजिन आणिलें होतें पण पहिल्या दिवशींच त्याला विश्रांति घ्यावी अशी बुद्धि होऊन तें बंद पडलें. त्या दुकानांतील एकालासुद्धां त्या एंजिनाची दुरुस्ती करितां येत नव्हती. इतक्यांत हेन्री फोर्ड हा ‘वायुयंत्रांतला’ दर्दी आहे असें कोणसें बोलून गेलें. अर्थात् त्याला तें यंत्र दुरुस्त करण्याची विनंती करण्यांत आली. आपल्याला सर्व समजतें ही लोकांची खोटी कल्पना खरी नव्हे असें म्हणून प्रयत्न करून पाहण्याचें त्यानें कबूल केलें. त्याच्या वाचनाचा या वेळीं फायदा होऊन यंत्रांतील कोणता भाग बिघडला आहे याचा त्यानें तात्काळ छडा लावला व तो दुरुस्त करून त्यानें एंजिन पुन्हां चालू केलें. या प्रयोगानें त्याला वायुयंत्राचा नीट अभ्यास करतां आला. आपल्या यंत्रासाठींहि त्यानें वायूचा उपयोग करण्याचें ठरविलें.

वायुयंत्राची कल्पनाहि नवीन नव्हती. १८७८ त लिनॉरनें पॅरिसमध्यें असें एक यंत्र प्रदर्शनांत मांडलें होतें. १८८४ सालीं डेम्लरनें धावत्या चाकाचें व एका दंडगोलाचें वायुयंत्र निर्माण केलें होतें. १८८६ सालीं कार्ल बेन्स यानें अशाच प्रकारचें एक यंत्र करून चाकांच्या गाडीवर त्याची उभारणी केली होती. फोर्डचें लक्ष या कामाकडे वेधण्याच्या कालापर्यंत फ्रेंच लोक या कामासाठीं पाण्यासारखा पैसा ओतीत होते पण रथ चालवायला त्या वायूचा उपयोग होईल अशी कोणालाही कल्पना झाली नव्हती.

लगेच फोर्डनें कामाला नेटानें लागून १८८७ सालीं ओटोच्या धर्तीवर एक वायुयंत्र निर्माण केलें. त्यांत त्यानें गॅसोलिनचा उपयोग केला

होता. या यंत्राच्या साह्यानें जबरदस्त शक्ती निर्माण झाली नाहीं हें खरें, पण जीं वायुरूपयंत्रें बाजारांत विकलीं जात होतीं, त्यांच्यापेक्षां तें निःसंशय फार हलकें बनलें होतें. या शास्त्रावर लिहिलेलें जें जें म्हणून सांपडे तें तें वाचल्याशिवाय तो सोडीत नसे. कांहीं कांहीं वेळां तो मध्यरात्रीपर्यंत जागून काम करी. १८९० सालीं द्विदंडगोल यंत्र करण्याचें त्यानें ठरविलें. कारण एकदंडगोल यंत्रामध्यें गतिचक्र फार वजनदार असल्यामुळें वाहन म्हणून त्याचा उपयोग होण्यासारखा नव्हता. तेंच द्विदंडगोल यंत्रामध्यें एका दंडगोळांत वाफ निर्माण करून दुसऱ्यांत तिचा व्यय करतां येत असल्यानें हलकें गतियंत्र बसवितां येणें शक्य होतें. तरीसुद्धां एंजिन, गॅसोलिनची टाकी ह्या सर्व वस्तू ( दुचाकी ) सायकलवर बसवितां येत नव्हत्या त्या नव्हत्याच.

हेन्रीचे असे प्रयोग चालले असतां लोक त्याला नांव ठेवीत. त्यांच्या-मतें हेन्री आपला कालापव्यय करीत होता. तो चंचल बुद्धीचा असून त्याला वेड लागलें अशी त्या बिचाऱ्यांची समजूत ! या बाबतींत एक व्यक्ती मात्र अपवाद होती. ती म्हणजे त्याची गृहिणी. तो जें जें करी तें तें तिला दाखवीत असे किंवा तें तें तिला ‘ विकून टाकीत ’ असे हेंच जास्त खरें. त्यानें आपल्या पहिल्या रथाची आकृती काढली तीसुद्धां तिनें पद लिहिलेल्या एका कागदावर ! आपल्या पतीला यश येईल असा तिचा पूर्ण विश्वास होता. फोर्ड आपल्या आत्मचरित्रांत म्हणतो, “ माझ्यापेक्षां माझ्या पत्नीलाच जास्त विश्वास वाटे ही मोठी विशेष गोष्ट आहे.” तिची मनोवृत्ति नेहमींच तशी असल्यानें त्यानें ‘ श्रद्धावती ’ असें तिला नांव दिलें होतें.

हेन्रीवर अनेक लोक अनेक प्रकारची टीका करीत, पण त्याचा कांहीं परिणाम त्याच्या मनावर होत नसे व अंगीकृत कार्यापासून तो कधींही

च्युत होत नसे. ज्याप्रमाणें कितीही भयंकर वादळ झालें तरी पर्वत गंभीर व निश्चळ राहतो त्याचप्रमाणें विरोधी टीकेचे कोणी कितीहि आघात केले तरी हेन्रीची मनःशांति ढळत नसे. एकादी गोष्ट करतां येणें अशक्य आहे असें कोणी कधीं म्हणालें कीं ती गोष्ट करून दाखविण्याचें त्याला स्फुरण चढावयाचें. रणशिंग फुंकलें कीं घोड्याला जसें अवसान येतें, तसेंच अमुक एक गोष्ट पार पाडणें मनुष्याला अशक्य आहे असें कोणी म्हटलें कीं त्याच्या अंगांत अभिनिवेश उत्पन्न होई. टीकेसंबंधानें तो म्हणतो, " टीका ही एक बहुमोल वस्तू आहे. प्रत्येकानें आपल्यावर होणारी टीका ऐकून घेऊन तिचा शांतपणें विचार केला पाहिजे. मात्र टीकेला भिऊन गडबडून जातां उपयोगी नाहीं. नाहीं तर कोणाही तरुणाला आपल्या कार्यांत झपाट्यानें प्रगति करून दाखवितां येणार नाहीं. मला ही गुरुकिल्ली कधींच कळली होती " म्हणूनच रात्रं-दिवस श्रम करणारा तो एक वेडापीर आहे असें म्हणून लोक त्याचा उपहास करीत; पण त्यानें उद्योगाची कास कधींच सोडली नाहीं !

---

प्रकरण ७ वें.

## 'असाध्य तें साध्य करितां सायास'

'एडिसन इलेक्ट्रिक कंपनी' या नांवाची एक संस्था होती, तिचीं दोन तीन ठाणीं होतीं. डिट्रॉटला प्रकाश पुरविण्याचें काम त्या संस्थेनें आपल्या अंगावर घेतलें होतें. गिल्बर्ट नांवाचा एक कर्तबगार पुरुष त्या संस्थेचा व्यवस्थापक होता. पण या वेळीं त्या संस्थेंत काम करणाऱ्या लोकांचा तुटवडा होता व एकदोन ठिकाणचीं दोन एंजिनेंहि मोडलीं होतीं. अशा अगदीं आणीबाणीच्या वेळीं हेन्री गिल्बर्टकडे नोकरी मागण्यास गेला. तो

आल्याची बातमी ऐकून कोणी तरी फिरस्ता एंजिनिअर आला असावा असें गिल्बर्टला वाटलें. हेन्रीची शरीरयष्टी सडपातळ असल्यामुळें तो पोरसवदा दिसे. परंतु त्याच्या पाणिदार डोळ्यांवरून तो बुद्धिमान व चलाख असावा असें त्यानें ताडलें व त्यानें त्याला " तुला वाष्पयंत्राची कांहीं माहिती आहे काय ? " असें विचारलें. हेन्रीनें " होय " असें उत्तर दिलें.

" बरें तर, दुसऱ्या ठाण्यावर जाऊन, त्या ठिकाणच्या दोन यंत्रांना काय झालें आहे तें पहा. " असें सांगून गिल्बर्टनें त्याला पाठवून दिलें. हें बोलणें सकाळीं होऊन हेन्री त्या ठाण्याकडे गेला व संध्याकाळच्या आंत सर्व यंत्रें चालू झाल्याचा निरोप त्यानें गिल्बर्टला पाठवून दिला. नंतर गिल्बर्ट तिकडे जाऊन पहातो तों सर्व यंत्रें सुरळीत चाललेलीं ! हेन्रीला कांहीं फारशी दगदग पडली नव्हतीच, पण या संधीमुळें त्याच्या व्यवस्थापकाचें लक्ष मात्र त्याच्याकडे वेधलें. आणि महिन्याला ४५ डॉलरवर एंजिनियर म्हणून त्याची नेमणूक करून त्यानें त्याला रात्रपाळीवर रहाण्यास सांगितलें.

हेन्रीच्या जागीं दुसरा एकादा मनुष्य असता तर तो रात्रपाळीला कंटाळून गेला असता. कारण संध्याकाळच्या सहा वाजल्यापासून सकाळच्या सहा वाजेपर्यंत कामाला जुंपलेलें राहणें कांहीं सामान्य काम नव्हतें ! पण हेन्रीला त्याचें मुळींच कांहीं वाटलें नाहीं ! तो पूर्ण सुखांत होता ! यंत्रांच्या संगीतांत पुनश्च कांहीं तरी नवें शिकण्याची संधी त्याला मिळाली होती व तिचा तो पूर्ण फायदा घेत होता. या वेळीं त्याला पगार जरी अल्प होता तरी त्याचें व त्याच्या बायकोचें तेवढ्यांत पोट भरे. पैशांची फाजील हांव त्याला नव्हती. तो म्हणतो, " द्रव्यासाठीं मी कधींच त्रास करून घेतला नाहीं. अन्नवस्त्राला पुरेसा पैसा मला मिळत होता मग

जास्तीची आशा मी कशाला करूं? पैशाची काळजी पैसे करितात. अंगीकृत कार्यासाठीं मनुष्याला श्रम करून देह झिजविणें भाग आहे आणि असा देह झिजला म्हणजे लक्ष्मी आपोआप हात जोडून त्याच्या मागून येते. पण द्रव्याचीच जर मनुष्य काळजी करूं लागला तर सर्व आटोपतें व त्याचें चित्त कामावर लागत नाहीं ! "

याप्रमाणें उद्यांची काळजी न करितां आपल्या ध्येयपूर्तीसाठीं तो विद्युद्-ज्ञान पैदा करीत होता. स्पंज पाणी शोपून घेतो त्याप्रमाणें त्या कार-खान्यांत जें जें ज्ञान मिळणें शक्य होतें त्या त्या ज्ञानाचा त्यानें आपल्या डोक्यांत संग्रहच करण्यास सुरवात केली. त्याच्या कारखान्याच्या मुख्य शाखेंतील यंत्रें एकदां मोडलीं व गिल्बर्टनें हेन्रीला बोलावणें पाठविलें. हेन्रीनें तीं यंत्रें दुरुस्त करून चालू केलीं. त्यामुळें गिल्बर्टच्या मनावर विशेषच परिणाम झाला. हेन्रीच्या अंगीं दांडगें कर्तृत्व आहे, अशी त्याची खात्री होऊन त्यानें त्याचा पगार दर महिना ७५ डॉलर केला. आठ नऊ महिने झाल्यावर त्याला वढती देऊन तो १०० डॉलर केला व मुख्य एंजिनियरची जागा दिली. या नंतर लगेच १२५ डॉलरची म्हणजे सर्वांत जास्त पगाराची जागा त्याला देण्यांत आली.

आतां पैशाची त्याला ददात नव्हती. दुसरा एकादा असता तर त्यानें आपलें आयुष्य यापुढें चैनींत घालविलें असतें; पण हेन्री कांहीं सामान्य माणसापैकीं नव्हता. त्याचें ध्येय त्याच्या डोळ्यांपुढें एकसारखें नाचत होतें. व त्यासाठीं तो रात्रंदिवस खटपटही करीत होता. त्यानें वरील कार-खान्यांत आठ वर्षें नोकरी केली. त्यामुळें मजुरांची स्थिति कशी असते याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव आला होता. त्यांच्या समजुती, त्यांचे विचार व त्यांचा दृष्टीकोण यांचें त्याला पूर्ण ज्ञान असल्यामुळें मजुरांच्या प्रश्नाचा त्यानें बराच विचार केला होता. ' मुख्य यांत्रिका 'ची जागा मिळाल्यामुळें

त्याच्या मालकाचे विचारहि काय आहेत हें त्याला समजलें होतें. त्यामुळें भांडवल व मजुरी यांच्या लढ्याचें त्याला जितकें सोपपत्तिक ज्ञान होतें तितकें कोणालाच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. भांडवलवाले व मजूर यांच्या या अभ्यासाचा त्याच्या भविष्यकाळच्या व्यापारविषयक धोरणावर वराच परिणाम झाला. पोटाला चिमटा घेण्यापेक्षां हात धरून काम करून घेण्याची तो तयारी करीत होता.

मुख्य यांत्रिकाच्या जागेवर असतांना त्याला आपल्या कांहीं कल्पना अमलांत आणण्याची सवड सांपडली. कारखान्याच्या पटावर चाळीस माणसें होतीं व चार पांच माणसें जादा कामावर होतीं. परंतु वरींच माणसें आजारी वगैरे पडल्यामुळें काम अडे. त्यामुळें कामाची पद्धतीच सदोष आहे असें हेन्रीला वाटून त्यानें त्यांत सुधारणा करावयाचें ठरविलें. वारा वारा तास काम करण्यानें हें सर्व बिघडतें असें त्याचें मत झालें. यंत्रें सारखीं चालू रहात व तीं अव्यवस्थित रीतीनें वापरलीं जात त्यामुळें मोडत. तो म्हणतो "कोणाही यंत्रशाल्याला यंत्राची सर्व शक्ती खर्च करून फार वेळ तें चालवितां येणें शक्य नाहीं. त्यामुळें यंत्र खराब होतें. मनोविकाराला वळी पडून यंत्राची काळजी घेणें इष्ट आहे असें कोणी म्हणत नाहीं, तर सारासार विचाराच्या दृष्टीनें व कार्याच्या दृष्टीनेंहि यंत्रांची व माणसांची काळजी घेणें इष्ट आहे."

त्यानें कारखान्याच्या कामांत सुधारणा करण्याचा निश्चय केला खरा, पण त्यामुळें खर्च वाढत असल्यामुळें कारखान्याचे मालक तसला फरक करण्याला कबूल होतील असें वाटत नव्हतें. तेव्हां त्यानें प्रथम एका 'तेलदाराला' (Oilman) शिकवून यांत्रिक बनविलें, दुसऱ्या एकाला यांत्रिकाचें शिक्षण दिलें व कांहीं जुजबी फरक करून त्यानें कामाची रचना बदलून टाकली. कारखानदारांना या गोष्टी कशा आवडणार? परंतु

त्यानें त्यांची समजूत इतक्या कुशलतेनें केली कीं त्यांनीं त्याचें म्हणणें शेवटीं कबूल केलें व दोन पाळ्यांच्या ऐवजीं तीन पाळ्या करून आठ तासांचा दिवस त्यानें मुक्रर केला. कांहीं दिवस लोटल्यावर कामाच्या प्रकारांत विलक्षण फरक पडला आहे असें त्यांना आढळून आलें.

एडिसन कंपनींत शिरल्यापासून कांहीं महिनेपर्यंत हेन्रीला हातांत हत्यार धरायला फुरसतच मिळाली नाहीं. पण मुख्य एंजिनियरची जागा मिळाल्यापासून दिवसा जरी त्याला एंजिनच्या खोलींत असावें लागत असे तरी रात्रीं त्याला आपले प्रयोग करण्यास सवड सांपडे. डिट्रॉटला आल्यावर त्यानें आपला स्वतःचा कारखाना देखील डिट्रॉटला आणला होता आणि एका विटांच्या घरांत तो सजवून कामाला सुरवात केली होती. या ठिकाणीं दर रात्रीं जेवण झाल्यावर तो चार तास काम करी व शनिवारीं मात्र रात्रभर जागून काम करी. तो इतका राबे तरी आपण मोठें काम करीत आहों असें त्याला कधींच वाटत नसे. कारण सर्व लक्ष त्याच कामाकडे लागल्यानें त्याला त्यांतच आनंद होई. तो म्हणतो, “ ज्या कामांत मनुष्याला आपलेपणा वाटतो तें काम दगदगीचें व कंटाळवाणें असें त्याला वाटतच नाहीं. त्यामुळें काम कसून होतें व त्याचें फलही चांगलें मिळतें.”

आपल्याच सारखे दुसरे उद्योगी पुरुष याच कल्पनेच्या मागें आहेत ही जाणीव त्याला होती, परंतु त्यांच्या कामाची दिशा काय हें त्याला मुळींच ठाऊक नव्हतें. अचल वायुयंत्राची रचना त्याला माहीत होती, पण वाहनोपयोगी वायुयंत्र तयार करणें हें अगदींच भिन्न होतें. दोन गोष्टी त्याच्या पुढें होत्या. अग्निस्फुलिंग निर्माण करून तो नष्ट कसा करायचा व यंत्राचें वजन कमी कसें करायचें ? पुष्कळ विचार करून त्यानें एक

गाडी बांधण्याचें ठरविलें; पण त्याला पाहिजे असलेला माल मिळण्याची पंचाईत पडली. सांगाडा व बैठक याला लागणारें लोखंड त्यानें विकत घेतलें. दुसरें, आयते तयार भाग मिळणें दुरापास्त होतें. प्रत्येक गोष्ट त्याला करावी लागत होती. ठिणगीची गुडदी ( Spark-plug ) नव्हती किंवा चाकेंही पाहिजेत त्या प्रकारचीं नव्हतीं. तेव्हां सायकलचीं चार चाकें त्यानें उपयोगांत आणलीं. एंजिन मात्र त्याला स्वतःच तयार करावें लागलें.

काम जसजसें तयार होऊं लागलें तसतशा त्यांत पुष्कळ भानगडी उत्पन्न होऊं लागल्या व प्रत्येक वेळीं झालेलें काम पुन्हां विस्कळित करून फिरून नव्यानें रचना करणें भाग पडूं लागलें. प्रथम हेन्रीनें गत्यु-त्पादक शक्ती पुढच्या चाकांना देण्याची योजना केली होती. पण त्यामुळें मागचीं चाकें दिशा वदलण्यास किंवा वळण घेण्यास तितकींशीं उपयोगी पडेनात. तेव्हां त्याला आपला वेत वदलावा लागला व गत्युत्पादक शक्ति मागच्या चाकांना देऊन पुढच्या चाकांनीं वळण घेण्याचें काम करावें अशी योजना करावी लागली. त्याकरितां त्याला एक सुकाणुंचक्र करावें लागलें.

सांगाड्यावर यंत्र वसविणें व त्याची शक्ति पाहिजे तिकडे नेणें या गोष्टी आतां शिल्लक राहिल्या. याकरितां त्यानें आणखी एक चाक केलें. त्यायोगें वळतांना मागच्या दोन्ही चाकांना त्याला गती देतां येऊं लागली. एका पट्टयाच्या साह्यानें यंत्रनिर्मित शक्ति एका दांड्यावर घेऊन तेथून एका सांखळीनें ती चाकाप्रत पोहोंचविण्याची तजवीज त्यानें केली होती. या प्रमाणें हेन्री आपल्या कार्यसिद्धीसाठीं एकसारखा झटत होता. त्याची प्रकृति धडधाकट होती पण तोही झाला तरी मनुष्यच! त्यालाहि कंटाळा येई व इतर मित्रांवरोवर करमणूक करावी असेंही त्याच्या मनांत हजारदां

येई; पण हा मोह जिंकून त्यानें काम करण्याचा सपाटा सुरू ठेवला आहे, अशक्यतेला शक्यतेचें रूप देण्यासाठीं हा वेडा पीर कशाला उगाच आयुष्याचें मातेरें करीत आहे असें म्हणून त्याचे मित्र त्याची चेष्टा करीत. हेन्रीला अशा चेष्टेचें कांहीं वाटत नसे. पण त्याच्या बायकोला मात्र त्यामुळें मोठें दु:ख होई. आपल्या नवऱ्याच्या कर्तृत्वावर तिची अढळ श्रद्धा होती पण लोक नांवें ठेवीत व चेष्टा करीत तें तिच्या कानावर येई व तिला दु:ख होई. लोकांनीं आपल्या नवऱ्याला नाक मुरडलेलें तिला बिलकुल खपत नसे. भीति किंवा अपयश याची कल्पनाही हेन्रीला शिवली नाहीं. हेन्रीला त्याचा आत्मविश्वास दांडगा होता. तो म्हणे, "काम करण्याची विलक्षण शक्ति व बुद्धि या दोन गोष्टी ज्या माणसाजवळ आहेत त्याला यश मिळालेंच पाहिजे." त्याचप्रमाणें आणखी एके ठिकाणीं तो म्हणतो, "मनुष्याला अंगीकृत कार्यांत अनेक थपडा बसतात, परंतु याचा अर्थ त्याला अपयश येतें असें मुळींच नाहीं. आत्मविश्वास हा आत्म्याचा गुण आहे तर भीति ही शारीरिक बाब आहे. एकदां ठोकर बसली कीं मनुष्य अधीर बनतो व हातचें काम सोडून देतो. हातीं घेतलेली बाब सिद्धीस न्यायला शहाणपणा, पैसा, बुद्धि किंवा धडाडी यांचीहि इतकीशी जरूर नाहीं; पण जर कांहीं पाहिजे असेल तर ती चिकाटी. आज जगांत जे जे उद्योग फलद्रूप झालेले दिसतात, त्या सर्वांची गुरुकिल्ली 'चिकाटी'च होय. कारण अपयश पदरीं घ्यायला श्रम लागत नाहींत. ती गोष्ट फार सोपी आहे. यश हेंच कठीण आहे, आणि तें साध्य करण्यासाठीं मनुष्याला आपल्या सर्व शक्ति खर्च कराव्या लागतात."

शेवटीं १८९२ मध्यें गाडी तयार झाली. ती लहानशा बगीप्रमाणें होती. दुचाकीच्या चार चाकांवर एक लहानसा सांगाडा बसवून त्यावर दोन माणसांना पुरेल एवढी बैठक तयार केली होती. या हलक्या गाडीचें

गाडी सुमारें २५० शेर होतें. ती चालविण्यासाठीं एक तरफ तयार केली पन्ती व दुसऱ्या एका पक्कडीच्या तरफेनें हांकणाराला गतींत फरक करितां येत होता. तो दांडा पुढें ढकलला म्हणजे जोराचा वेग उत्पन्न होई व मागें खेंचला म्हणजे वेग कमी होई. तो सरळ असला म्हणजे गती थांवत असे. सर्वांत जास्त वेग दरताशीं २० मैल असे तर कमींतकमी वेग १० मैल होई. उलटी गती देण्याची योजना अजून तयार झाली नव्हती.

मागच्या कण्यावर हेन्रीनें यंत्र वसविलें होतें. त्यांत दोन दंडगोल होते. त्यांना दीड इंचाचें भोंक असून सहा इंचाची आघात सळई होती. तीन गॅलनच्या एका टाकींत गॅसोलिन भरून वैठकीच्या खालीं ठेवण्याची तज-वीज केली होती. तेथून तें एका नळीवाटे यंत्रांत सोडलें होतें व विद्युद्-स्फुल्लिंगानें तें पेटवितां येत होतें. तो प्रवाह वंद करायला एक गळचेपी केली होती. पहिल्या गाडींत यंत्र थंड करण्याचा कांहीं उपाय ठेविला नव्हता, पण यंत्र फार लवकर तापतें असें दिसून आल्यावर पाण्याच्या टाकीला जोडूनच एक जलकवच वसविण्यांत आलें.

अशा रीतीनें त्यानें आपला अश्वहीन रथ तयार केला खरा, पण कांहीं ना कांहीं विघडून तो चालण्याचा वंद होई. पुष्कळ वेळां हेन्री हा रथ रस्त्यावर नेऊन उभा करी. शेजारी पाजारी ती गंमत पहाण्यासाठीं जमा होत, पण रथ चाळूंच नये ! असें झालें म्हणजे हेन्रीनें तो रथ पुन्हां आपल्या कारखान्यांत लोटून आणावा व कामाला लागावें व जें जें मोडलें असेल तें तें दुरुस्त करीत बसावें. शेवटीं शेवटीं कोणालाच त्यांत गंमत वाटेना व कोणीहि पहायला उभें राहीना. " छे हो, असा कोठें घोड्याशिवाय रथ चालला आहे काय ? हेन्री आहे वेडा पीर ! लागला आहे कांहीं तरी नादाला झालें ! " असें म्हणून जो तो निघून जाई.

'याला एवढ्या मोठ्या पगाराची नोकरी आहे, घरीं शेतीवाडी आहे, खावें प्यावें, चैन करावी तें सोडून हा कसल्या वेडाच्या नादीं लागला आहे!' असें सर्व शेजारीपाजारी म्हणत. हेन्री मात्र आपला पोटापाण्याचा खर्च करून जें उरे तें यांत घाली. याबद्दल तो कोणाच्या एका कपर्दिकेचाही ओशाळा नव्हता किंवा आपल्या प्रयोगाच्या स्वार्थी विचारानें तो नोकरींतही कधीं अंगचुकारपणा करीत नसे.

शेवटीं हेन्रीनें आपल्या पत्नीस कळविलें कीं, आपण आपलें अश्वहीन यंत्र चालवून पहाणार! आतां आपला रथ खास चालणार अशी त्याच्या मनाची पक्की खातरी झाली होती. १८९३ सालीं एप्रिल महिन्यांत एके दिवशीं सकाळीं हेन्रीनें आपला रथ कारखान्यांतून बाहेर काढून रस्त्यावर आणला. त्या वेळीं पाऊस म्हणजे मी म्हणत होता. तरी त्याची बायको कपडे करून व छत्री घेऊन त्या ठिकाणीं आली! हेन्रीनें मूठ फिरविली त्याबरोबर यंत्र गुरगुरूं लागलें, खोकूं लागलें, शिंकूं लागलें आणि थुंकूं लागलें. लगेच हेन्री बैठकीवर चढून बसला व त्यानें अश्वहीनरथ पळवीत नेला. त्याची बायको मात्र पावसांत छत्री घेऊन पार्श्वपथावरून पळत होती! शेवटीं यशस्वितेनें हेन्रीच्या गळ्यांत माळ घातली व त्याला आनंद वाटला.

खरोखर या वेळीं त्याच्या मनोवृत्ती कशा असतील याचा तर्कानेंच विचार केला पाहिजे. आनंद व अभिमान यांच्याबरोबर अनेक भावनांचें मिश्रण त्याच्या चेहऱ्यावर प्रगट झालें असेल; नवशिक्याची भीतिही थोडी बहुत असेल. या त्याच्या भावनांत त्याची सहधर्मचारिणी देखील वांटेकरी होती हें निःसंशय; कारण 'हें होणार' असा तिला पूर्ण भरंवसा होता.

---

## प्रकरण ८ वें.

## '९९९' ची शर्यत.

हेन्रीचा अश्वहीन रथ चालूं लागला. पहिल्या वेळेस तो चांगलाच चालला. पण कांहीं अंतरावर वांकण होतें म्हणून तेथून हेन्रीला परत फिरावें लागलें. त्यानें तो रथ आपल्या कारखान्यांतील तबेल्यांत आणून ठेवला व घरांत जाऊन, थोडेंसें कढत दूध पिऊन तो झोपीं गेला. तो सर्व दिवसभर गाढ झोपेंत होता. कित्येक वर्षांत त्याला अशी गाढ सुखाची झोंप लागली नव्हती.

आपल्या कार्यांत सिद्धि मिळाल्याबद्दल तो गर्वानें फुगून गेला नाहीं किंवा आपली कीर्ति व्हावी म्हणून त्यानें खटपट केली नाहीं. हे रथ पुष्कळ प्रमाणांत तयार करून बाजारांत विक्रीला पाठविण्यासाठीं तो भांडवल जमविण्याच्याही उद्योगाला लागला नाहीं. त्याच्या शोधक बुद्धीला अजूनही बरेच दोष आढळत व ते नाहींसे करण्याकडेच त्याचें लक्ष होतें. आतां हें खरें आहे कीं हेन्रीला आपल्या अश्वहीन रथांत वसून फिरण्यानें मोठा आनंद होई. त्याची बायकोही त्याच्या बरोबर जाई येई. आतां मात्र सर्व शेजारीपाजारी व मित्र मंडळी तो चमत्कार पहाण्यासाठीं गोळा होत व आश्चर्यचकित होऊन धन्योद्गार काढीत. आपोआप चालणारी गाडी हीच प्रथम डिट्रोटमध्यें उत्पन्न झाल्यानें प्रत्येकाला ती पहाण्याची मोठी इच्छा होती.

नवीन शोधाबरोबर विरोधही उत्पन्न झाला! घोड्यांच्या मालकांना असूया उत्पन्न झाली व ते नसत्या भीतीचा बाऊ दाखवूं लागले. घोडे उधळूं लागले. या नूतन रथाचें उग्ररूप, चमत्कारिक वास व भयंकर शब्द ऐकून घोडे बुजून उधळूं लागले यांत नवल काय? कारण जणूं

काय हें यंत्र 'अश्वांचा अवतार संपला, अश्वयुग लयाला गेलें' असेंच आपल्या राक्षसी आवाजामें जगांत दवंडी पिटीत आहे असें वाटे. त्यामुळें घोडे बाळगणांऱ्या लोकांना फोर्डच्या या रथाचा उपद्रव झाला असेल व ते त्याचा द्वेष करावयाला लागले असतील हें सहाजिक आहे.

सामान्य रस्त्यावर किंवा गर्दीतून चालवितां येण्यासारखी ही गाडी नव्हती. लोकांच्याही ती परिचयाची झाली नव्हती. एकदां तर एक गंमत घडली. एक दुचाकीबहादर ही गाडी पाहून इतका स्तिमित झाला कीं तो या रथाच्या चाकाखालींच आला. फोर्डला वाटलें कीं त्या मनुष्याला मोठी इजा झाली असेल पण गाडी थांबवून उचलून बाजूला काढतांक्षणीं तो मनुष्य आपोआप उठला व त्याला कुठें लागलें नव्हतें. तें पाहून जमलेली मंडळी पोट धरधरून हंसूं लागली. फोर्डचें लक्ष मात्र त्यावेळीं मौजेकडे वेधलें नाहीं. दुसऱ्याही पुष्कळ भानगडी उत्पन्न होत. लोकांना आतां त्यांत इतकी मौज वाटावयाला लागली होती कीं फोर्ड आपली गाडी घेऊन येऊन कोठें थांबला कीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी तेथें जमत व पुन्हां गाडी चालू करायची म्हटली तर लोकांची गर्दी मोडायला शिपायांचीच मदत घ्यावी लागे. कांहीं विक्षिप्त मंडळी त्या गाडीवर चढत व माकडचेष्टा करीत. अशानें एकादा अनर्थ ओढवेल म्हणून फोर्ड आपल्या बरोबर कुलूप व सांखळी आणून गाडी सोडून जातेवेळीं ती एकाद्या झाडाला नाहींतर दीपस्तंभाला बांधून ठेवी.

कित्येक वेळां शिपायांशीं हुजत घालण्याचा प्रसंग येई. कारण या रथामुळें गाड्या बुजतात, दळणवळणाला अडथळा येतो अशी त्यांची समजूत होई. शेवटीं डिट्रॉटच्या नगरपतीकडून हेन्रीला एक परवाना काढून ठेवावा लागला. अमेरिकेंत अश्वहीनरथ हांकण्यासाठीं दिलेला पहिला पर-

वाना हाच होय. त्या वेळीं त्यांत वेगाची मर्यादा घालण्यांत आली नव्हती किंवा रथाचा अनुक्रमांकही नमूद केला नव्हता.

फोर्ड आपला हा रथ सर्व रस्त्यांत व खेड्यापाड्यांत, मैदानांतून आणि उतारावर व चढावर चालवून पाही. दर वेळेस त्याला कांहीं तरी दोष दिसत व ते दोष घालविण्यासाठीं तो रात्रंदिवस काम करी; व नवीन नवीन सुधारणा करी. पुढल्या तीन वर्षांत जवळजवळ हजार मैलांची रपेट त्या रथानें केल्यावर फोर्डनें तो रथ चार्ली अन्स्लीला २०० डॉलरला विकून टाकला. पुढें त्यानें तोच रथ १०० डॉलर देऊन परत आणला व आपल्या संग्रहाला ठेऊन दिला.

जे लोक हेन्रीचा रथ चालणारच नाहीं म्हणून छातीठोक बोलत होते ते आतां म्हणूं लागले "रथ चालतो खरा, पण काय उपयोग? एक रथ तयार करायचा तर त्याला पैशाचा पाऊस पाडावा लागतो. तो चालवायलासुद्धां कांहीं थोडा खर्च येत नाहीं! बरें इतकें करून एकादा लक्ष्मीपुत्र शोकाखातर एकादा रथ विकत घेणार! मग हेन्रीला त्यांत काय मिळणार?" हेन्री म्हणे "मी रथ इतका स्वस्त करणार आहें कीं तो प्रत्येकाला घेतां यावा." पण हें त्याचें बोलणें कोणाला पटूं नये व पुन्हां त्यांनीं त्याला वेड्यांत काढावें असा प्रकार चालला होता. हेन्रीच्या मनांत दुसरा रथ तयार करण्याचें जरी होतें तरी त्यानें घाई केली नाहीं. कारण तो म्हणतो, "घाई केल्यानें आपलें काम होणार नाहीं." शेवटीं १८९६ सालीं पहिल्यानें जरा हलका रथ त्यानें जोडून तयार केला व तो चांगला चालूं लागला. यापासूनही त्याला पुष्कळ गोष्टींचा बोध झाला. यानंतर त्यानें तिसरा रथ बांधला व तोही चांगला चालूं लागला.

या सुमारास गॅसोलिन व विद्युत् यांच्या साह्यानें चालणाऱ्या गाड्या निर्माण होत होत्या, व लोकांचें लक्ष या प्रकरणाकडे बरेंच वेधलें होतें. विंटन, डुर्या, हेनी याच गाड्या सर्वांत प्रमुख होत्या. परंतु ह्या सर्व फार खर्चाच्या असून श्रीमंत माणसाच्या चैनीचा पदार्थ किंवा खेळ इतक्याच दृष्टीनें लोक त्यांच्याकडे बघत. त्यांच्याबद्दल व्यापारी दृष्टी कोणालाच आली नव्हती. कारण लोकमत त्यांच्या विरुद्ध होतें. " हे अश्वहीन रथ मोठे घातक असून त्यामुळें घोडे बुजतात, गाई दूध देत नाहींत, कोंबड्या अंडीं घालीत नाहींत व रस्ते खराब होतात " अशी कुरकुर जिकडे तिकडे चाले आणि लोहमार्ग, बाष्पनौका, दुचाकी वगैरे वस्तूंच्या प्रथम दर्शनीं अशीच कुरकुर झालीही. एवढेंच काय विमानाचें अस्तित्व सिद्ध झाल्या-वरही लोक असेच कुरकुरले !

बेंझ गाडी पहाण्यासाठीं हेन्री फोर्ड १८९५ सालीं न्यूयॉर्कला गेला होता. परंतु तिच्यापासून त्याला घेण्यासारखें असें कांहीं दिसलें नाहीं. आतांपर्यंत एडिसन इलेक्ट्रिक कंपनींत तो नोकरीस होता हें सांगितलें आहे. त्या कंपनीच्या लोकांना हेन्री फोर्ड वायुयंत्रावर आपली बुद्धि व शक्ति विनाकारण खर्च करतो असें वाटलें. जर गाडी बांधायचीच असली तर विजेच्या सहाय्यानें चालणारी बांधावी असें त्यांचें म्हणणें पडलें. फोर्डला तें व्यवहार्य दिसेना. तेव्हां फोर्डनें आपला नाद सोडावा म्हणून आपल्या कंपनींतील सर्वांवर देखरेख करणाऱ्याची जागा त्याला देऊं केली; पण फोर्डनें ती नाकारून ता. १५ आगस्ट १८९९ ला आपल्या नोक-रीचा राजिनामा दिला. अर्थात् ही गोष्ट मोठ्या धैर्याची होती; कारण त्याच्याजवळ पैसा मुळींच नव्हता, आणि जो कांहीं थोडा बहुत होता तो त्यानें आपल्या प्रयोगांत खर्च करून टाकला होता. यानंतर कांहीं धाडसी मंडळींनीं शेवटीं डिट्रॉट ओटोमोबाईल कंपनी ५०००० हजार डॉलरचें

भांडवल संकलित करून स्थापन केली व त्यापैकीं फोर्डच्या रथाचा प्रसार करण्यासाठीं दहा हजार जमविण्यांत आले. त्यांनीं हेन्री फोर्डला १०० डॉलरवर व्यवस्थापक व मुख्य इंजिनियर म्हणून नेमलें.

पुढील तीन वर्षांच्या अवधींत या मंडळीनें सुमारें वीस वायुवाहनें किंवा अश्वहीन रथ बांधले. फोर्डची दृष्टी सामान्य जनतेला उपयोगी पडतील अशा गाड्या तयार कशा होतील इकडे होती, तर इतर भागीदारांची पैशाकडे होती ! आपल्या नफ्याचा आंकडा भराभर कसा फुगेल इकडेच त्यांचें लक्ष ! जो कोणी जास्त पैसे देईल त्याला ते गाडी तयार करून देत ! त्यामुळें हेन्रीचें व इतर भागीदारांचें न पटून १९०२ च्या मार्च महिन्यांत त्यानें फिरून राजिनामा दिला. पुढें ती कंपनी 'कॅडिलॅक कंपनी' म्हणून बऱ्याच नांवालौकिकाला आली.

एक वर्षपर्यंत हेन्री पदरमोड करूनच होता. पैसा मिळविणें जरूर आहे हें तो जाणून होता, पण केवळ पैसा पैसा करून पैसा मिळविणें हें त्याला पसंत नव्हतें. लोकोपयोगी वस्तूवर मनुष्य आपली बुद्धि व शक्ति खर्च करून उद्योग करील तर नफा किंवा पैसा मिळविण्याची काळजी करण्याचें त्याला कारण पडणार नाहीं. कोणताही धंदा लहान प्रमाणावर सुरू होऊन त्याच्या उत्पन्नांतूनच त्याची वाढ होत राहिली पाहिजे असें त्याचें म्हणणें असे. परंतु त्या वेळीं तरी लोकांनीं त्याला व्यवहारशून्यांत काढलें.

सर्व देशांत लोकांचें लक्ष शर्यतीकडे लागलें होतें. क्लीव्हलंड येथील अलेक्झांडर विंटननें आपल्या 'बुलेट' नांवाच्या रथाच्या साह्यानें संयुक्त संस्थानच्या शर्यतींत अग्रेसरत्वाचा मान पटकाविला होता. फोर्डच्याही मनांत लोकांचें लक्ष वेधण्याचें येऊन सर्वांत जलद धावणारा रथ तयार करण्याचें त्यानें ठरविलें; व एक दोन दंडगोलांचें यंत्र करून त्याचा रथ

केला, आणि तो वायुगतीनें धांऊं लागला, तेव्हां त्यानें विंटनला शर्यतीचें आव्हान दिलें व त्यानें मान्य केल्यावर, १९०२ डिसेंबर ता. १ हा दिवस शर्यतीसाठीं मुक्रर करण्यांत आला.

सर्व लोकांना विंटन माहीत होता. त्याची गाडी दिसायला सुंदर होती. फोर्डची कोणाला फारशी माहितीही नव्हती व त्याची गाडीही ओबडधोबड होती. तेव्हां विंटन शर्यत जिंकणार असाच लोकांचा ग्रह झाला. पण प्रत्यक्ष शर्यतींत फोर्डनें त्याचा पराभव केला हें पाहून लोकांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें.

फोर्डचें नांव त्यामुळें सर्वत्र प्रसिद्ध झालें. परंतु आपल्या मताप्रमाणें लोकांनीं भांडवल देण्यास तयार होण्यासाठीं आणखी शर्यत जिंकणें जरूर होतें. टॉम कूपर नांवाचा एक दुचाकीबहाद्दर होता. त्यानें व फोर्डनें केवळ वेगांत वरचढ अशा दोन गाड्या बांधल्या. एकीचें '९९९' व दुसरीचें 'बाण' अशीं नांवें ठेवण्यांत आलीं. प्रत्येकांत ४ दंडगोल होते व त्यामुळें ८० अश्वांची शक्ती निर्माण होई. त्यांचा आवाज इतका भयंकर होई कीं बोलायची सोय नाहीं. प्रत्येकावर एक माणूस बसण्याचीच सोय केलेली होती. त्यांची गती फोर्डच्या कल्पनेपेक्षांही जास्त होती. फोर्ड व कूपर यांनीं त्या पूर्ण वेगांत सोडून चालवून पाहिल्या. फोर्ड म्हणे, "यांतून फिरलेल्या माणसाला नायगाराच्या धबधब्यावरून जाणेंही मोठें मौजेचें वाटेल!"

शर्यतीसाठीं '९९९' ही गाडीच पसंत केली गेली; पण कूपर किंवा फोर्ड यांपैकीं त्या गाडीवर बसून शर्यत खेळण्यास कोणीच तयार होईना. तेव्हां बार्नें ओल्डफील्ड नांवाचा एक फार धाडशी दुचाकीबहाद्दर सॉल्ट-लेक शहरीं होता त्याला तारेनें विचारलें. त्यानें कबूल केलें व तो डिट्रोटला आला. तो आजपर्यंत अशा रथावर कधींच बसला नव्हता.

पण आठवड्याच्या आंत त्याला बसतां येऊं लागलें, आणि ग्रोसपॉइंटवर तीन मैलांची शर्यत करण्याचें ठरलें.

शर्यतींत सहा रथांनीं भाग घेतला होता. पण ओल्डफील्डनें सर्वांना मागें टाकलें व शर्यत संपण्याच्या वेळीं तर त्याच्या मागच्या रथांत व त्याच्या रथांत सुमारें अर्धा मैल अंतर पडलें. या प्रसंगानें ओल्डफील्डचा सर्वत्र बोलबाला झाला. त्यानें त्या उन्हाळ्यांत कित्येक शर्यतींत '९९९' रथाचा उपयोग केला होता आणि कित्येकदां तर ५५$\frac{४}{५}$ सेकंदांत एक मैल अंतर तोडलें होतें!

---

प्रकरण ९ वें.

## फोर्ड मोटार कंपनी.

मागील प्रकरणांत उल्लेखिलेल्या शर्यतीनंतर पुष्कळांचें लक्ष फोर्डकडे वेधलें. विशेषतः मालकमसन म्हणून एक कोळशाचा व्यापारी होता त्यानें व इतर कांहीं मंडळींनीं एक लाख डॉलरच्या संकल्पित भांडवलावर फोर्ड मोटार कंपनीची स्थापना ता. १७ जून १९०३ या दिवशीं केली. त्या पैकीं १८००० डॉलर जमा केले. फोर्डचा रथ हेंच त्याचें स्वतःचें भांडवल होतें. त्याबद्दल त्याला २५५ भाग किंवा उत्पन्नाचे २५$\frac{१}{२}$ टक्के देण्याचें ठरविलें. मालकमसन यानें ७००० डॉलर घातल्यामुळें त्यालाही तो हिस्सा मिळाला. या मंडळींत जे लोक सामील झाले होते, त्यांत पुढें प्रसिद्धीस आलेले डॉझ बंधुही होते.

मालकमसन हा प्रत्यक्ष कामांत उपयोगाला येत नसे म्हणून तो अध्यक्ष झाला. फोर्ड उपाध्यक्ष झाला व त्याचबरोबर सर्व गोष्टी करणें, देखरेख करणें, व्यवस्था पाहणें वगैरे सर्व काम त्यालाच करावें लागे. त्याचा दर्जा मुख्य

इंजिनिअरचा असून त्याला त्याबद्दल दर महिना २०० डॉलर पगार मिळे. प्रथम दोन कारागीर कामावर घेऊन कामाला सुरवात झाली. पहिली फोर्डगाडी जूनमध्यें तयार झाली व जुलईमध्यें ती विकली गेली. नंतर मागणी अशी जोराची येऊं लागली कीं रथ तयार होण्यापूर्वींच तो विकला जात असे.

पण सर्व भाग तयार करण्याचीं यंत्रें खरेदी करण्यास पुरेसा पैसा नव्हता म्हणून फोर्डच्या नकलेबरहुकूम सुटे भाग तयार करून देण्याबद्दल पुष्कळ कारखानदारांना मक्ते देण्यांत येत. शेवटीं फोर्डच्या कारखान्यांत सर्व भागांची जुळणी होई व रथ तयार होई. हेन्रीफोर्डला ही पद्धत फार आवडे, पण त्याला लागणारे सर्व सुटे भाग एकाच मोजमापाचे व व्यवस्थित केलेले मिळण्याची पंचाईत पडूं लागली. तेव्हां कंपनीला स्वतः भाग तयार करणें भाग पडलें. असें झालें तरी ज्यांना मक्ते दिले होते त्यांच्याकडून फोर्ड सुटे भाग विकत घेत होताच.

पहिल्या वर्षीं १७०८ गाड्या फोर्ड कंपनीनें विकल्या. मागणी पुरी पाडण्यासाठीं कारखान्यांत माणसें वाढविणें भाग पडलें व वर्षाच्या आंतच ४० माणसें कामावर नेमलीं गेलीं. फोर्ड स्वतः उजाडल्यापासून जो कामाला लागे तो रात्र पडली तरी काम लवकर पुरे करीत नसे. त्याचा उत्साह सांसर्गिकच होता असें वाटतें; कारण त्याचें उदाहरण पाहून इतर लोकही तसेंच करीत. कांहींही वाया जाऊं द्यावयाचें नाहीं इकडे लक्ष असल्यामुळें रथाची किंमत कमी करणें शक्य होऊं लागलें. शेवटीं ९०० डॉलरला रथ विकतां येऊन कांहीं नफाही उरूं लागला.

तरी पैशाची ओढही होतीच. शर्यतीकडे लोकांचें लक्ष फार असतें असें पाहून हेन्रीनें सर्व जगांत प्रसिद्ध असणाऱ्या एका मैलाच्या वेगलेखनालाही हाणून पाडायचा विचार केला; व यूकेअरच्या हिमाच्छादित

मैदानावर खेळ करण्याचें त्यानें जाहीर केलें. यासाठीं मागें तयार केलेला 'बाण' नांवाचा रथ त्यानें बाहेर काढला व त्याच्या यंत्रांत सुधारणा वगैरे करून तो उत्तम रीतीनें सिद्ध केला. पण 'सटवीच्या लग्नाला सतराशें साठ विघ्नें' येतात त्याप्रमाणें शर्यतीच्या मार्गांत एक एक विघ्न उपस्थित होऊं लागलें. ज्या मैदानावर खेळ करावयाचा असें ठरलेलें होतें त्यावरचें बर्फ फाटून पुष्कळ भेगा पडल्या होत्या; परंतु आतां खेळ रद्द करणें घातकीपणाचें आहे असें पाहून त्यानें गाडी सोडली. त्या दिवशीं थंडी फार कडक पडली असून वाराही जबरदस्त होता, तरी हेन्रीचा रथ उड्यामारीत, धाडधाड करीत चालला ! अशा स्थितींत सुकाणुं फिरविणेंसुद्धां कठीण होतें. कित्येक वेळां हेन्री उलथून पडतो कीं काय अशी लोकांना भीति वाटली. पण त्यानें वेग म्हणून कमी केला नाहीं. याप्रमाणें ३९½ सेकंदांत त्यानें एक मैल अंतर तोडलें ! सर्व मंडळी आश्चर्यकित झाली; कारण जगाच्या वेळालेखनापेक्षांही त्याला सात सेकंदें कमीच वेळ लागला.

फोर्डरथाचा खप वाढूं लागला पण त्याबरोबर फोर्डला एका भयंकर विघ्नाशीं झुंजावें लागलें. न्यूयॉर्कमधील रॉचेस्टर गांवीं सेल्डन या नांवाचा एक गृहस्थ होता. त्यानें १८७९ सालीं वाहनें चालविण्यासाठीं उपयोगिलेल्या ज्वलनयंत्राचा **अधिकार** ( patent ) मिळण्याविषयीं अर्ज केला होता. या मागणींत जे उद्देश नमूद केले होते त्यांची अतिव्याप्ती होत असून गॅसोलिन यंत्राला सुद्धां ते लागू होत होते. सेल्डन यानें कांहीं विशिष्ट कल्पनेला मूर्तरूप दिलें होतें असें मुळींच नाहीं. तरी पण १८९५ सालीं त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्याला अधिकारसनद मिळाली.

'इलेक्ट्रिक व्हेइकल कंपनी'मधील जॉर्ज डे नांवाच्या माणसाच्या लक्षांत त्यांतील मर्म आलें व त्यानें ती अधिकारसनद विकत घेतली. पुढें त्यानें यांत्रिक गाड्या तयार करणाऱ्या कारखान्यांना ती कल्पना विकावयाला

सुरवात केली व जो कोणी त्या कल्पनेचा उपयोग करण्यासाठीं पैसे भरणार नाहीं त्याच्यावर तो फिर्याद करूं लागला. १९०३ सालीं असल्या दहा कंपन्यांची एक मध्यवर्ती संस्था तयार झाली व याउप्पर कोणाही संस्थेला या संस्थेचे सभासद करून घेऊं नये असें ठरविण्यांत आलें. पुष्कळ स्वतंत्र वाण्याच्या संस्थांनीं त्या अधिकारसनदेला मान्यता देण्याचें नाकारलें होतें. फोर्डलाही तोच मार्ग पतकरणें भाग पडलें. अर्थात् यंत्रशास्त्राच्या दृष्टीनें फोर्डनें या प्रकरणाचा सांगोपांग विचार केल्यामुळें सेल्डनच्या कल्पनेप्रमाणें अधिकारसनद देतां येणार नाहीं अशी त्याची ठाम समजूत झाली होती. त्याच्या रथाची रचना सर्वांशीं भिन्न असल्यामुळें अधिकारसनदेबद्दल संघाला **मालकीहिस्सा** (Royalty) देण्याचें त्यानें साफ नाकारलें.

याचा परिणाम असा झाला कीं इतरांच्या बरोबर फोर्ड मोटार कंपनीवरही फिर्याद लागली. १९०४ ते १९०८ पर्यंतचीं चार वर्षें साक्षी पुरावे घेण्यांत खर्च झालीं व शेवटीं १९०९ सालीं त्या फिर्यादीचा निकाल लागून सेल्डन अधिकारसनदेला मान्यता दिलीच पाहिजे असें ठरलें. इतर सर्वांची पूर्ण निराशा झाली व निकालाप्रमाणें वागण्याचें त्यांनीं ठरविलें. फोर्ड कांहीं लेचापेचा गृहस्थ नव्हता. नुकसानभरपाईदाखल जबर रकम भरावी लागेल म्हणून त्याला भीति दाखविण्यांत येत होती आणि फोर्ड मोटार घेणाऱ्यावरही फिर्यादी होण्याचा संभव होता. पण तोटा न होऊं देण्याबद्दलची हमी देऊन व करारनामा लिहून देऊनही फोर्ड आपल्या गाड्या विकूंच लागला. ही एक चांगलीच जाहिरात झाली व त्या सालीं १८०० गाड्या विकल्या गेल्या. त्यानें वरच्या कोर्टांत अपील केलेंच होतें. त्याचा निकाल १९११ सालीं होऊन सेल्डन अधिकारपत्राला मान्यता देण्याची गरज नाहीं असें जाहीर झालें. यामुळें फोर्डला

तर मोठा विजय मिळालाच, पण त्याबरोबर सर्व लोकांनाच हा विजय मिळाला असें म्हटलें तरी चालेल.

फोर्ड गाडीची किंमत यानंतर आणखी उतरविण्यांत आली. काट-कसरीनें माल खरेदी करून व चोख व्यवस्था ठेऊन फोर्डला ही गोष्ट करतां आली. त्यामुळें मागणी एकसारखी वाढूं लागली. कारखान्यांत माणसें वाढूं लागलींच होतीं त्यामुळें जागाही लहान पडूं लागली होती; तेव्हां १९०६ सालीं दुसरीकडे तीन मजली इमारत बांधून कारखाना तिकडे नेण्यांत आला. तेवढ्यानेंही भागेना, तेव्हां १९१० सालीं हायलंड पार्क येथें ६० एकर जमीन विकत घेऊन त्या ठिकाणीं कारखान्याची उभारणी केली. कांहीं काळानंतर त्यानें २०० एकर जमिनीची जोड वरील कारखान्याला दिली.

कारखान्याच्या धोरणाचा प्रश्न फोर्डला पुन्हां त्रास देऊं लागला. त्याची कल्पना त्याच्या भागीदारांना कांहीं तितकीशी रुचत नव्हती. ते म्हणत कीं भारी किंमतीच्या गाड्या तयार करण्यानें फायदा जास्त होईल. हेन्रीचें म्हणणें सामान्य माणसाला सुद्धां गाडी घेतां येईल इतकी ती स्वस्त करतां आली पाहिजे व पुष्कळ पटीनें त्या निर्माण केल्यास फायदा झालाच पाहिजे. यामुळें नोकरींत राहून आपल्या कल्पना अमलांत आणणें कठीण असें त्याला पक्कें आढळून आलें. शेवटीं १९०६ सालीं कांहीं भाग खरेदी करून फोर्ड स्वतःच ५१ टक्यांचा मालक झाला. पुढें कांहीं भागास सातपट पैसे देऊनही त्यानें आपला भाग ५८½ टक्यांचा केला.

यायोगानें कंपनीवरचा त्याचा ताबा वाढत चालला खरा पण भांडणें कमी होइनात. जे भागीदार पूर्वीं त्याच्या बाजूचे होते त्यांना आतां असें वाटूं लागलें कीं न जाणो प्रसंग पाहून फोर्ड दिवाळेंही काढील ! दर-रोज १०० गाड्या बांधून तयार होऊं लागलेल्या दिसतांच त्यांच्यापैकीं

कित्येकांनीं कारखाना यापेक्षां जास्त वाढवूं नये म्हणून सूचनाही केल्या ! फोर्ड म्हणे रोज शंभरच काय, एक हजार गाड्या तयार झाल्या पाहिजेत. हें ऐकून ते घाबरून गेले व न्यायदरबारामार्फत त्याच्या महत्वाकांक्षेला आळा घालण्याचें त्यांनीं ठरविलें. शेवटीं १९१९ सालीं फोर्डच्या एड-सील नांवाच्या मुलानें राहिलेले भाग खरेदी करून टाकले व प्रत्येक भागाला १२५०० डॉलर देऊन म्हणजे एकूण ७५००००० डॉलर देऊन भागीदारांच्या जाचांतून फोर्ड मुक्त झाला.

प्रथम प्रथम फोर्डरथाची ६०० ते २००० डालरपर्यंत किंमत असे; व विक्रींतही चढउतार होई; पण १९०७ पासून विक्री वाढतच चालली आणि तीही रोख; तेव्हां फायदा उरूं लागला. फोर्डची विक्री अमेरिकेपुरतीच मर्यादित नव्हती; इंग्लंडमध्यें सुद्धां थोडी बहुत विक्री होई; पण १९०५ सालीं ' स्कॉटलंडच्या टिकाऊ शर्यतींत फोर्डचा दर्जा फारच वरचा लाग-ल्यानें त्याच्या गाड्यांची विक्री वाढत चालली. यानंतर फोर्डनें क्लीव्हलंड व शिकॅगो येथें **अडती** ( Agency ) दिल्या.

कांहीं लोकांच्या मनांत दरवर्षी नव्या नव्या रचनेची गाडी तयार केली तर जास्त खपेल असें होतें. पण फोर्डची दृष्टी लोकांच्या उपयुक्ततेकडे विशेष होती. एक सर्वसामान्य असा नमुना करावा व त्याला लागणारे सर्व भाग सुटे विकत घेऊन आपल्या गाडीची दुरुस्ती करून तिला उत्तम स्थितींत गिऱ्हाईकाला ठेवतां यावें हाच फोर्डचा उद्देश होता.

या बाबतींत पुढील गोष्ट मोठी उद्बोधक आहे. एक बाई कपडे शिवण्याच्या यंत्रावर शिवत बसली होती. त्या बाईकडे बोट दाखवून तो आपल्या आडतेदारांना म्हणाला, " अगदीं अलीकडल्या यंत्राची किंमत तुम्हांला ठाऊक आहे काय ?" 'नाहीं' असें एकानें उत्तर दिलें. तेव्हां तो म्हणाला, "याची किंमत ९ डॉलरपेक्षां कमीच आहे. सामान्य हत्यारांनीं

मी असें यंत्र तयार करूं लागलों तर मला १०० डॉलर खर्च येईल. पण या यंत्राची इतकी कमी किंमत असण्याचें कारण सर्व सुटे भाग एक सांच्याचे व घालतां काढतां येण्याजोगे करणें हेंच होय." तो पुढें म्हणतो, "पूर्वीची 'तोड मोड जोड' ही पद्धत आतां मुळींच उपयोगी पडणार नाहीं. प्रत्येक नोकराला गाडी घेतां येण्याइतकी ती स्वस्त पाहिजे. तिचे सुटे भाग सर्वत्र मिळाले पाहिजेत. ती वजनानें हलकी असून टिकाऊ पाहिजे. लक्ष्मीपुत्रांचे चोचले आम्हांला पुरवायचे नसून सामान्य माणसाची गरज भागवायची आहे. तेव्हां इतकी स्वस्त गाडी तयार करणें व जगांतील कोणत्याही कारखान्यांत तयार होणाऱ्या गाड्यांपेक्षां संख्येनें अधिक तयार करणें हीच माझी महत्वाकांक्षा आहे."

थोड्याच दिवसांत चार दंडगोलांची गाडी बाजारांत ६०० डॉलरला विकण्यासाठीं आपण तयार करणार आहोंत व त्यापैकीं न्यूयॉर्क येथील प्रदर्शनांत एक मांडणार आहोंत अशी फोर्डनें जाहिरात दिली. तेव्हां प्रसिद्धी व्हावी म्हणून फोर्ड वाटेल त्या गप्पा मारतो असें लोकांनीं उठविलें. प्रदर्शन उघडलें त्या वेळीं फोर्डचा रथ आला नव्हता हें खरें, पण तो दुसरेच दिवशीं आला व तो पहाण्यासाठीं लोकांची गर्दी जमून मागणीही जोराची आली.

फोर्डचा रथ इतरांच्या रथांपेक्षां जरी हलका होता तरी त्याचें वजन आणखी कमी करण्याचें त्यानें ठरविलें; पुष्कळांची अशी समजूत होती व असते कीं यंत्र जितकें जड तितकें ते मजबूतीला चांगलें. पण मजबुतीचा व जडपणाचा कांहीं संबंध नसतो हें त्याला सिद्ध करावयाचें होतें; पण त्याला पाहिजे होती तशी हलकी धातु सांपडेना. परंतु त्याचें लक्ष चोहींकडे अगदीं बारीक असल्यानें एकदा सहजासहजीं त्याला हवी होती ती वस्तु मिळाली. १९०५ सालीं 'पाम सागरतीरावर' होणाऱ्या

शर्यतींत त्याची गाडी वापरली जाणार होती म्हणून तोही गेला होता. त्या ठिकाणीं एक फ्रेंच मोटर मोडून पडली. सहाजिकच फोर्ड काय झालें तें पहाण्यास गेला. तेव्हां जवळच पडलेल्या एका धातुच्या तुकड्याकडे त्याचें लक्ष गेलें. तें एक प्रकारचें पांढरें कमाविलेलें पोलाद होतें. अशा रीतीच्या पोलादाला ३००० डिग्री ( फॅरेनहीट ) ची उष्णता जरूर असल्यामुळें अमेरिकेंत वनविलें जात नसे. कारण इतकी उष्णता उत्पन्न होईल एवढी भट्टीच अमेरिकेंत नव्हती. तेव्हां इंग्लंडहून त्यांतील तज्ज्ञ असा एक माणूस फोर्डनें आणला व ओहिओ येथें भट्टी बांधून तसल्या प्रकारचें पोलाद फोर्ड निर्माण करूं लागला. यामुळें मजबुतीच्या दृष्टीनें हा फायदाच झाला. कारण पूर्वीं वापरलें जाणारें पोलाद ६० ते ७० कसाचें होतें तर हें नवें पोलाद १७० कसाचें निघूं लागलें. या पोलादाचा उपयोग पुष्कळसा करूं लागल्यामुळें वजनाचा प्रश्न आपोआप सुटला.

आतां गुणानें उत्तम, साधी, शक्तिमान, मजबूत, हलकी व हाकण्याला सोपी, व खर्चाला कमी अशी गाडी तयार करावी, असें फोर्डला वाटूं लागलें. शेवटीं त्यानें 'टी' नांवाचा नमुना तयार केला. ह्या रथाचें वजन फक्त ६०० शेर असून २२ अश्वशक्ती त्यांत निर्माण होई. १९०८–९ सालीं हा नमुना बाजारांत प्रथम विक्रीस काढला व दुसऱ्या सालीं बाकीचे सर्व नमुने अस्त पावले. परंतु आतां सुधारणेकडे तो दुर्लक्ष करूं लागला असें मुळींच नाहीं. लोकसेवा करण्याची कल्पना मुख्य असली तरी नफ्याबद्दल तो निष्काळजी होता असें थोडेंच आहे? सेवेच्या योगानें फायदा होईलच होईल अशी त्याची खात्री होती. "सर्व जगांत हाताशीं असलेला पैसाच कायतो पैसा अशा समजूतीनें त्याला चिकटून बसण्यासारखा दुसरा कोणताच वेडेपणा नाहीं" असें त्याला वाटत असल्यामुळें चटकन् श्रीमंत होण्याची कल्पना त्याला पसंत नव्हती.

त्याच्या पहिल्या जाहिरातीवरून त्याची लोकसेवेची कल्पना चांगली समजते.

"आमचा असा उद्देश आहे कीं दररोज होणारी झीज, फूट, तूट यांना पुरून उरेल, अशा रीतीचा रथ तयार करून विक्रीस काढावा व तो व्यापारी, धंदेवाले व कुटुंबी माणसें यांना उपयुक्त होऊन वेगही सामान्यतः चांगला असावा, आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना तो आवडावा व विशेष गोष्ट ही कीं आज रथाला कल्पनातीत किंमत पडते म्हणून ज्यांना घेतां येत नाहीं अशा हजारों माणसांना अल्प किंमतींत तो सहज घेतां यावा."

प्रतिवर्षी दहा हजार अश्वहीन रथ बांधणार म्हणून फोर्डनें जेव्हां जाहीर केलें, त्या वेळीं इतर कारखानदारांनीं तर त्याचा उपहास केलाच, पण त्याचे भागीदारसुद्धां 'उचलली जीभ लावली टाळ्याला' म्हणून त्याला हंसले. परंतु फोर्डच्या मतें अशक्य गोष्टच संभवत नाहीं. तो म्हणतो, "जें कसें करायचें तें आपल्याला आज ठाऊक नाहीं त्याला आपण अशक्य म्हणतों. अशक्यतेला शक्यतेचें रूप द्यायचें म्हणजे कामाला हात घालून हळूहळू तें करीत राहणें होय." शेवटीं १९०९ सालीं फोर्डचा शब्द खरा ठरल्याचें दिसून आलें. दुसऱ्या वर्षीं तो आंकडा दुप्पट झाला. १९१६ सालीं ५ लक्ष रथ निर्माण करण्यांत आले. १९२१ सालीं १० लक्षांवर ती संख्या जाऊन बसली व १९२२, १८ मेला ५० लक्षांचा निदर्शक म्हणून 'टी' हा नमुना तयार केला गेला. या वेळीं फोर्डकारखान्यांत दररोज पांच हजारांवर रथ तयार होत असत !

इतकी अवाढव्य प्रगति होण्याचें मुख्य कारण फोर्डनें आपल्या आरंभाची जी हकीकत दिली आहे त्यांतच सांपडते. "आरंभीं आम्हांला अनुकूल अशी एकही गोष्ट नव्हती, व सुरवातीला आमच्याजवळ

कांहींच नव्हतें. जें कांहीं आम्ही मिळविलें तें अविश्रांत श्रम केल्यानें व तत्वावर अढळ निष्ठा ठेविल्यानेंच मिळविलें आणि म्हणून जी चैन म्हणून समजली जाई तिला जरूरीचें रूप देण्याचें कार्य आम्हीं केलें. "

आणि यामुळच जगात अभूतपूर्व असा विजय फोर्डला मिळाला. १९१९ सालीं २० लाख डॉलरच्या भांडवलावर 'फोर्ड मोटार कंपनीची' फिरून उभारणी झाली. या वेळीं ६२ कोटी ५० लक्ष डॉलर त्या कंपनीची किंमत झाली, आणि आजमितीला २ अब्ज डॉलरवर ती किंमत गेली आहे. आज ३ अब्ज डॉलर बँकेंत शिल्लक आहेत. खरोखर हेन्री फोर्डला 'मितव्ययाचा कोणताही कायदा' धाब्यावर बसवितां आला असता.

'लिंकन मोटार कंपनी'ची कोर्टमार्फत १९२२ सालीं विक्री झाली तेव्हां फोर्डनें ती कंपनीही विकत घेतली. लिंकन गाडी तयार करणें अत्यंत खर्चाचें जरी होतें तरी फोर्डनें आपली सुव्यवस्था अमलांत आणल्यापासून त्या कंपनीचीही स्थिती सुधारली व अमेरिकेंत तयार होणाऱ्या गाड्यांत लिंकन गाडी उत्तमांपैकीं गणली जाऊं लागली.

अशी भरभराट चालू होती तरी फोर्डवर आलेलीं संकटेंही कांहीं लहान सहान नव्हतीं. १९२० सालीं मालाची उठावणी झाली नाहीं. ७५ कोटी डॉलर देणें झालें होतें. याच्या उलट ९३ हजार गाड्या व २० कोटी डॉलर एवढी शिल्लक होती व सामानसुमान बरेंच होतें. तेव्हां दोन्ही तोडें मिळविण्याची पंचाईत पडूं लागली. एक दिवस एक पेढीवाला मोटारींत बसून फोर्डच्या घरीं आला. आधीं भेटीची सूचना वगैरे कांहीं एक नव्हती तरी त्या मनुष्याच्या कामाबद्दल संशय येऊनच फोर्डनें त्याची भेट घेण्याचें ठरविलें. त्या माणसानें लगेच मुद्याचीच गोष्ट काढली व कांहीं 'आकर्षक' अटींवर आपल्याला लागणारा पैसा जमवून देतों म्हणून

बोलणें लावलें ! मात्र त्या मदतीबरोबरच कंपनीचा ताबाही पण त्याच्याकडेच जावयाचा होता. तेव्हां फोर्ड म्हणाला, " पण आम्हाला कर्ज मुळींच काढावयाचें नाहीं." तो मनुष्य म्हणाला, "वा ! तीन महिन्यांत ७५ कोटी देणें तुम्ही कसें फेडणार ? " तो काय काय बोलतो हें पहाण्याच्या इराद्यानें फोर्ड स्तब्ध बसला. तेव्हां तो गृहस्थ पुढें म्हणाला, "हें पहा, तुमच्या तिजोरींत पैसा नाहीं. अशा वेळीं पैशाची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेणारा असा एक खजिनदार आम्हीं गांठला आहे, नव्हे ठरविला आहे !" हें ऐकून फोर्डला आश्चर्य तर वाटलेंच, पण तसें कांहीं आपल्या चेहऱ्यावर दिसूं न देतां त्यानें घंटा वाजवून नोकराला बोलाविलें, व संथपणानें " या गृहस्थाला बाहेरचा रस्ता दाखीव " असें सांगितलें !

अर्थात् तो गृहस्थ अगदीं लाल होऊनच निघून गेला व फोर्ड मोटार कंपनीचें दिवाळें केव्हां निघतें तो सुदीन येण्याची वाट पहात बसला. त्याच्या सारख्या इतर पेढीवाल्यांना सुद्धां फोर्डची इतिश्री झालेली केव्हां ऐकायला सांपडेल असें झालें होतें. परंतु पुन्हां एकदां फोर्डनें सर्वांची निराशा केली. कंपनी न बुडवितां व व्यवस्थेनें एक पैचेंही कर्ज न काढतां, त्यानें स्वत: तो प्रश्न सोडविला. फोर्ड म्हणतो, "धंद्याच्या प्रगतीकरितां कर्ज काढावें, पण धंदा आंतबट्ट्याचा होऊं लागला म्हणून कर्ज काढून बाजू सावरण्याच्या भानगडींत पडूं नये. धंद्याची अंतर्गत व्यवस्थाच चोख राखून धंदा बचावला पाहिजे."

या सुमारास दर महिना ५० कोटींचा माल कंपनी खरेदी करीत असे. माल देणारे किंमतींत मुळींच फरक करीनात. महायुद्धाच्या किंमती कांहीं प्रमाणानें तरी उतरल्या पाहिजेत असें फोर्डचें म्हणणें होतें; म्हणून नवीन कच्चा माल व इतर सामानसुमान खरेदी करण्याचें त्यानें बंद केलें. त्याचप्रमाणें अडतेदारांनाही त्यानें तारेनें कळविलें कीं "कसेंही करून

गाड्या विकल्याच पाहिजेत; व कंपनीकडून आजपर्यंत भरपूर नफा मिळविला असल्यानें आतां कंपनीला त्यांनीं मदत केली पाहिजे; आणि जर गाड्या विकल्या जाणार नसतील तर दुसरे अडते नेमणें भाग पडणार आहे." याचा परिणाम इष्ट होऊन १९२१ च्या जानेवारींत ६० हजार गाड्यांची विक्री झाली; व एप्रिलपर्यंत विक्रीचेच २५ कोटी डॉलर मिळाले. अशा रीतीनें त्यानें पाहिजे त्यापेक्षां जास्त पैसा गोळा केला !

याशिवाय गाड्यांची विक्री चालूच असल्यामुळें त्याला कच्चा माल-ही स्वस्त भावानें मिळूं लागला. या आकस्मिक संकटामुळें दुसरा एक फायदा झाला तो असा. महायुद्धामुळें कांहीं फाजील जागा निर्माण केलेल्या होत्या, त्या काढून टाकल्या व प्रत्येक ठिकाणीं काटकसर करून त्यानें पुष्कळ रक्कम शिल्लक पाडली. एवढेंच नव्हेतर कच्चा माल खरेदी करण्या-पासून गाडी तयार होईपर्यंत २२ दिवस खर्च होत. त्याऐवजीं आतां १४ दिवसांत तें सर्व काम होऊं लागलें. हे सर्व फरक होण्यापूर्वी कच्च्या मालाच्या किंमतीशिवाय प्रत्येक गाडीला १४६ डॉलर खर्च येत असे तो आतां फक्त ९३ डॉलर येऊं लागला. एवंच या आर्थिक संकटामुळें फोर्डचा फायदाच झाला !

फोर्ड मोटार कंपनीची वरील हकीकत वाचून कोणाला असें दिसेल कीं 'ही कंपनी म्हणजे जगाच्या उद्योगधंद्यांतील एक अजब चमत्कार आहे.' खरें म्हटलें तर एका माणसाच्या कर्तृत्वाचाच हा सारा पसारा आहे. फोर्डशीं सहकार्य करणारा एक कझन्स नांवाचा गृहस्थ म्हणतो कीं "कंपनीचीं मूलभूत तत्त्वें फोर्डशिवाय दुसऱ्या कोणाचींच नाहींत; फोर्ड इतका शाहाणा व दूरदर्शी मनुष्य कल्पनासृष्टींतही मिळणार नाहीं. त्याला कोणचीही गोष्ट अशक्य अशी वाटतच नाहीं ! त्यानें प्रथमपासून तज्ज्ञ मुळींच नेमले नाहींत; याचें कारण तज्ज्ञ नेहमीं "हें होणार

नाहीं, तें होणें शक्य नाहीं" असेंच सांगणार. कारण त्याच्या मतें तज्ज्ञ म्हणजे "काम संपेपर्यंत परवां काय झालें ह्याचीं वर्णनें करणारा एक सद्गृहस्थ" होय.

फोर्डच्या आर्थिक यशाची गुरुकिल्ली म्हणजे रोख खरेदी व रोख विक्री हें तत्त्व होय. "हत्याराची धार हाच हत्याराचा खरा भाव आहे" या म्हणीवरच त्याच्या कारखान्याचें यश अवलंबून आहे. याचा अर्थ असा कीं मनुष्य हत्यार घेऊन काम करण्यांत चूर असला तरच तें काम व तो धंदा. मनुष्यांची फिरवाफिरव केल्यानें बरेंच काम होतें असें त्याचें म्हणणें आहे. त्याच्या मतें त्याच्या कंपनीची उभारणी पुढील अढळ तत्वां-वर झालेली आहे.

( १ ) भविष्यकाळाचा बागुलबुवा न वाटणें किंवा गतकालाबद्दल आदर न बाळगणें. कारण ज्याला अपयशाबद्दल भीति वाटते त्यालाच भविष्यकाळाचीही भीति वाटते, आणि पहिलें अपयश येतांक्षणींच तो आपला उद्योग थांबवितो. म्हणून अपयशाला माणसानें भितां कामा नये. अपयश म्हणजे नव्या उत्साहानें व जास्त काळजीनें पुनश्च हरिः ॐ करण्याची मिळालेली संधीच होय. तेव्हां अशा संधीचा शहाण्यानें फायदा करून घेण्यास चुकूं नये. प्रामाणिकपणानें उद्योग करीत असतां अप-यश आलें तर त्यांत अपकीर्ति थोडीच आहे ? खरी अपकीर्ति अपयशाला भिऊन हातचें काम सोडून देण्यांतच आहे. म्हणून भूतकालाबद्दल फारशी पर्वा न करितां त्यापासून बोध घेऊन शहाण्यानें आपलें पाऊल एकसारखें पुढें टाकीत चाललें पाहिजे.

( २ ) चढाओढीकडे दुर्लक्ष करणें.

ज्याला जी गोष्ट उत्तम रीतीनें करितां येते त्यानेंच ती केली पाहिजे. चढाओढीनें दुसऱ्याचा धंदा बुडविणें हें भयंकर पाप होय. मात्र लोकांनीं आपल्याशीं चढाओढ केली तर आपण घाबरून जातां कामा नये.

( ३ ) नफ्याकडे आधीं दृष्टी न ठेवतां सेवाभावानें काम करीत रहाणें.

( ४ ) स्वस्त घेणें व महाग विकणें यापेक्षां मालाची उत्पत्ती करणें; हींच तीं तत्वें होत.

या कंपनीला ज्या एका गोष्टीमुळें महत्व आलें आहे ती ही कीं मनुष्यमात्राला सुखानें, वेगानें व थोडक्या खर्चांत सर्वत्र संचार करतां येण्याजोगी एक वस्तु तिनें निर्माण केली. मजुरीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटल्यामुळें हा चमत्कार झाला ही गोष्ट खरी, तरी पण फोर्डची दिव्य दृष्टीही त्याला कारण आहे.

पी. डब्ल्यू. विल्सन म्हणतो, "सर्वांत मोठी व महत्वाची गोष्ट म्हणजे हेन्री फोर्डच होय. त्याची मनोवृत्ती, त्याचा समजूतदारपणा, शिक्षण-संस्थेबद्दल अनादर, त्याचा प्रामाणिकपणा व जगाला सुखी करण्याची इच्छा वगैरे गोष्टींनीं युक्त अशी फोर्डची मूर्ति म्हणजेच अर्वाचीन जगांतील उद्योगधंद्यांमध्यें घडून आलेला अलौकिक चमत्कार होय!"

---

प्रकरण दहावें.

## कारखान्यांतील व्यवस्था.

'अर्ध्या मिनिटाला अश्वहीन रथ तयार करणें व ९ कोटी डॉलरचे रथ एका वर्षांत खपविणें ही कांहीं थट्टेची गोष्ट नाहीं' अशा तऱ्हेचे उद्गार अर्नोल्डनें १९१४ सालीं काढले. त्या सालीं तें जरी अलौकिक असें कृत्य वाटलें तरी आतां ती एक सामान्य गोष्ट होऊन बसली आहे. १९२३ सालीं २० लक्ष गाड्या तयार होऊन ८ अब्ज डॉलरपेक्षां

जास्त किंमतीच्या गाड्या विकल्या गेल्या ! तरी मागणीचा पुरवठा होत नाहीं तो नाहींच. हल्लीं एका वर्षांत इतके रथ तयार होतात कीं पृथ्वीच्या विषुववृत्तावर ते ओळीनें उभे करायचे म्हटले तरीसुद्धां ते पुरून उरतील.

फोर्ड मोटार कंपनीच्या ६२ संस्था अमेरिकेंत असून २९ बाहेर देशीं आहेत. कॅनडा, मेक्सिको, चिली, डेन्मार्क, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी स्पेन, इटली, जपान, चीन, हिंदुस्थान वगैरे ठिकाणीं फोर्ड संस्था पसरल्या आहेत. त्यांत मँचेस्टर येथील संस्था बरीच मोठी आहे. अर्थात् सर्वांत मोठ्या संस्था हायलंडपार्क व रिव्हररूज येथें आहेत हें सांगायला नकोच.

मध्यवर्ति संस्था हायलंड पार्क येथें आहे व ३०० एकर जमिनीवर वसलेलें तें एक मोठें शहरच आहे असें म्हटलें तरी चालेल. त्या ठिकाणीं अग्निशाळा, तारायंत्र, टेलीफोन, दवाखाने, सिनेमा, व्यायामशाळा, शिक्षणशाळा वगैरे कित्येक गोष्टी आहेत. मध्यभागीं यंत्रबल निर्माण करण्यासाठीं यंत्रशाळा बांधलेली आहे. ती ४०० फूट लांब असून तींत स्वच्छ पांढऱ्या कौलाची फरशी केलेली आहे. त्या शाळेंत नऊ यंत्रें बसविलेलीं असून तीं इतकीं स्वच्छ ठेविलेलीं असतात कीं त्यांची मोठी शोभा दिसते. प्रत्येक यंत्राची ६००० अश्वशक्ति आहे. या ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या बलावर केवळ यंत्रेंच चालतात असें नसून, त्यामुळें प्रकाश, आधणाचें किंवा गार पाणी, घण ठोकण्यास लागणारी वाफ, वायू, गार हवा, बर्फ वगैर सर्व गोष्टींची तरतूद होते. या ठिकाणीं प्रत्येक गोष्टीचा उपयोग फार काटकसरीनें होऊन कोणतीही गोष्ट फारशी फुकट जाऊं दिली जात नाहीं. थंड करण्याचें पाणी, किंवा यंत्राचें तेल पुन्हां पुन्हां उपयोगांत आणलें जातें. यंत्रांतून फुकट गेलेली उष्णता कारखान्याला ऊब देण्याला उपयोगी पडते. शेंकडा ६० टक्के उष्णतेचा

उपयोग केला जातो हें विशेष आहे. कोळसा कारखान्यांत आल्यापासून त्याची राख होऊन बाहेर पडेपर्यंत त्याला हात म्हणून लागत नाहीं! कोळसा वाहणें, फोडणें, वजन करणें वगैरे सर्व कामें यंत्रसहाय्यानें होतात.

कामांतील सौकर्य व आरोग्य या दोन बाबींसंबंधानें ही संस्था सर्वांग-परिपूर्ण आहे. भिंतीसुद्धां जाड कांचेच्या केल्या असून पोलादानें त्या पक्क्या केल्या आहेत. त्यामुळें सर्वत्र नमुनेदार स्वच्छता पहावयास मिळून हवेचा व प्रकाशाचा भरपूर पुरवठा होतो. स्वच्छता राखण्यासाठीं एक मोठें खातें काम करीत असतें व दर आठवड्यास आधणाच्या पाण्यानें जमीन धुऊन स्वच्छ केली जाते. या संस्थेंतील सर्व बारीक सारीक सुधारणासुद्धां फोर्डच्या बुद्धीमुळेंच झालेल्या आहेत.

प्रथमपासून कामगाराला होणारी व्यर्थ दगदग कमी करण्याकडे फोर्डचें लक्ष असल्यामुळें त्यानें कामाच्या पद्धतींत अनेक सुधारणा केल्या. सामानासाठीं प्रत्येक कामगाराला आपली जागा सोडून निरनिराळ्या मेजावर किंवा बांकावर जावें लागत नाहीं, तर निरनिराळीं बांकें त्याच्यापुढें सरकत सरकत येत असतात. सामानाच्या गाड्या यंत्रबलानें सामान घेऊन इकडून तिकडे तिकडून इकडे फिरत असतात, व कामगारांच्या प्रत्येक संघापुढें येऊन थांबतात.

कारखान्याचे निरनिराळे भाग असून प्रत्येक भागांत एक एक सुटा भागच तयार करण्यांत येतो; व कामाची वेळ इतकी बांधलेली आहे कीं अमूक वेळांत अमूक भाग झालेच पाहिजेत. नाहींतर सगळाच घोटाळा उडाला असता. या कारखान्याच्या आसमंतांत मालाची ने आण करण्याकरितां आगगाड्या सारख्या भरधांव पळत असतात. शिवाय फोर्डच्या गाड्याही सुमारें सव्वा लाखावर दरवर्षीं उपयोगांत येतात त्या निराळ्याच!

आग विझविण्याचें एक भलें मोठें खातें असून शास्त्रीय साधनांनीं तें जय्यत तयार असतें. भयसूचक ध्वनी होतांच ३०० ठिकाणीं विद्युत् घंटा ( alarm ) आपोआप वाजूं लागतात व सर्वांना इशारत मिळते. या बाबतींत सर्व जगांतील अत्यंत परिणामकारक पद्धती या ठिकाणीं अस्तित्वांत आहे. अपघात होऊं नयेत म्हणून या ठिकाणीं जितकी काळजी घेण्यांत येते तितकी दुसरीकडे क्वचितच घेतली जात असेल. फार काय सांगावें ! कारखान्यांत घेतली जाणारी हवासुद्धां शुद्ध करून घेतली जाते ! आणि भट्ट्यांजवळ किंवा वितळलेल्या धातूजवळ काम करणाऱ्या माणसांना ती हवा नळ्यांतून पुरविली जाते. इतकी काळजी घेतली जाते तरी इतर कारखान्याप्रमाणें फोर्डच्या कारखान्यांतसुद्धां अपघात होतातच. पण तेवढयासाठीं एक मोठा दवाखानाही फोर्डच्या संस्थेंत चालविला जातो. आधीं कारखान्याच्या प्रत्येक भागांत कोपऱ्या कोपऱ्यामध्यें एका पेटींत प्राथमिक ( First Aid ) उपचारांचें सामान ठेविलेलें असतें. व प्राथमिक उपचारांचें ज्ञान असणाराच मनुष्य हजेरी घेण्याच्या (Time-keeper) जागेवर नेमलेला असतो. मोठ्या दवाखान्यांत शस्त्रक्रियेची खोली, ‘क्ष’ किरणखातें, दंतखातें, औषधी खातें वगैरे सर्व खातीं शास्त्रीय उपकरणांनीं जय्यत असतात व या कामावर प्रत्येक खात्यांतील निष्णात असे वैद्य, शस्त्रपंडित, परिचारिका मिळून शें सव्वाशें लोक काम करीत असतात. अपघातांत सांपडलेल्या माणसाप्रमाणेंच आजारी लोकांचीही व्यवस्था लावून त्यांना औषधपाणी देण्यांत येतें. प्रत्येक कामगाराची शारीरिक तपासणी होऊन त्याच्या प्रकृतीला मानवेल असेंच काम त्याला सांगण्यांत येतें, व फोर्ड वर्तमानपत्रांतही शैक्षणिक विषयाबरोबर आयुरारोग्याचीहि माहिती दिली जाते.

‘प्रथम सेवा व नंतर मोल’ याच तत्वावर फोर्डनें २० एकर जमिनीवर एक अत्यंत भव्य व सर्व साधनसामुग्रीनें युक्त असें रुग्णालय

स्थापन केलें आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं, "केवळ श्रीमंतांकरितां बरींच रुग्णालयें आहेत. त्याचप्रमाणें अगदीं गरीबांकरितांही बरींच रुग्णालयें मोफत चालविलीं जात आहेत. पण ज्यांना थोडाबहुत पैसा खर्च करण्याची इच्छा आहे, पण दुसऱ्याच्या परोपकाराचें ओझें घेणें जिवावर येतें त्या लोकांसाठीं रुग्णालय नाहीं." तेव्हां रुग्णालयाचा खर्च भागण्यापुरतेंच द्रव्य घेऊन लोकसेवा करण्याच्या उद्देशानेंच त्यानें हें रुग्णालय स्थापन केलें आहे. या रुग्णालयांत दाखल होणाऱ्या प्रत्येक रोग्याची शारीरिक तपासणी चार पांच डॉक्टरांकडून करविली जाते. कारण कित्येक वेळां असें आढळून येतें कीं ज्या रोगाकरितां रोगी दवाखान्यांत येतो त्या व्यतिरिक्त दुसऱ्या रोगांनींही त्याचें शरीर जर्जरित झालेलें असतें. अशा रीतीनें एकदां रोगाचें निदान ठरलें म्हणजे मग त्याला औषध देऊन शुश्रूषा केली जाते. इतर दवाखान्यांत सेविकां( नर्स )चा पुष्कळसा वेळ इकडे तिकडे फिरण्यांत जातो, कारण जरूर त्या वस्तू हाताशीं नसतात. या दवाखान्यांत प्रत्येक मजला सर्व साधनसामुग्रीनें जय्यत तयार ठेविलेला असतो; त्यामुळें व्यर्थ फिरणें वांचतें. कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाच्या किंमतीचा जसा चढउतार होतो, त्याप्रमाणें रोग्यावर बसविण्यांत येणाऱ्या आकारांत सुद्धां फेरबदल होतो. कारण नुसता खर्च भागला म्हणजे पुरे असतें.

कामावरच्या लोकांना खाण्यासाठीं सुट्टी देण्यांत येते. प्रथम ज्याचा तो आपलें फराळाचें आणीत असे; परंतु त्यांच्या सुखासाठीं व आरोग्यासाठीं कंपनीनेंच ताजें अन्न देण्याची सुरवात केली. कॉफी, फळें, दूध, रोटी, सांभारें, यांच्या गाड्यांच्या गाड्या कारखान्याच्या प्रत्येक शाखेंत जाऊन लोकांची क्षुधा शमन करितात. सर्व पदार्थ वैद्यकीय खात्याच्या देखरेखीखालीं शास्त्रीय पद्धतीनें तयार करून, ऊन ऊन मिळाल्यामुळें सुपरिणाम होतो. हें अन्न तयार करण्याच्या कामावरच मुळीं दोनशेंवर

नोकर आहेत ! यावरून किती अन्न खपत असेल याची कल्पना वाचकांना सहजच येईल.

याशिवाय फोर्ड–संग्रहालयांतून नेहमीं लागणारे सर्व जिन्नस, कापड चोपड, बूट, कोळसे व इतर सर्व व्यवहारोपयोगी पदार्थ मूळ किंमतीला कारखान्यांतील कामकऱ्यांना विकण्याची तजवीज ठेवलेली असते. त्यामुळें कामकऱ्याचा पुष्कळच फायदा होतो.

फोर्डच्या कामाच्या पद्धतीनें इतर पहातां फॅक्टरींत काम करणें म्हणजे उद्यांचें मरण आज ओढून आणण्याप्रमाणेंच आहे. पण फोर्डच्या कारखान्यांतील लोक खाऊन पिऊन सुखी असून, शरीरानें मजबूत दिसतात व संतुष्ट आणि आनंदी असतात याचें कारण म्हणजे त्यांना भरपूर पगार मिळतो हें होय. याशिवाय त्यांना कामही थोडे तास करावें लागतें आणि समाजामध्यें उत्तम दर्जा असतो हेंही होय. संप करण्याकडे त्यांची प्रवृत्तीच असत नाहीं. देखरेख करणारा असो अगर नसो ते होऊनच आपलें काम उत्तम प्रकारें करीत राहतात !

प्रथम प्रथम प्रेक्षक लोकांची फार गर्दी व्हायची त्यामुळें कामकरी लोकांचें लक्ष कामाकडे लागत नसे. तेव्हां प्रेक्षकांना मज्जाव करावा कीं काय, हा प्रश्न विचाराकरितां निघाला; पण फोर्डनें सांगितलें, "असें करणें बरें नाहीं; कामकरी वर्गाचें लक्ष उडणार नाहीं अशा बेतानें प्रेक्षकांना कारखाना पहावयास सोडावें म्हणजे झालें." आतां तर प्रेक्षकांना कारखाना दाखविण्यासाठीं दर्शकच नेमलेले आहेत आणि सर्व देशांतले लोक फोर्डचे कारखाने पहायला येतात, व महिन्यांतील प्रेक्षकांची संख्या सरासरी सुमारें ५०००० भरते.

फोर्ड रथाचा व नांगराचा प्रत्येक भाग स्वतः करण्याची त्याची इच्छा असल्यामुळें फोर्ड कंपनीनें व फोर्डनें स्वतः जातीनें लोखंडाच्या व कोळ-

शाच्या खाणी व अरण्यें विकत घेतलीं आहेत. सारांश, अश्वहीन रथ, भाजलेला दगडी कोळसा, पोलाद, हत्यारें, यंत्रें, कृत्रिम कातडीं, तांब्याच्या तारा, कांच, सीमेंट, कागद, विमानें वगैरे गोष्टी करणें, त्याचप्रमाणें लोखंडाच्या, शिशाच्या व कोळशाच्या खाणी चालविणें, छापखाने चालविणें, छायाचित्रें घेणें (फोटोग्राफी,) विद्युत् काम वगैरे पहाणें, समुद्रावरील वाहतुकीची व्यवस्था करणें व जमिनीवर आगगाड्या चालविणें वगैरे विविध प्रकारचीं कामें फोर्डकंपनी सध्यां करीत आहे.

रिव्हररूझ येथें फोर्ड कंपनीचा नवीन स्थापन झालेला एक कारखाना पाहून एकजण म्हणतो, " आजमितीस माहित असणाऱ्या जगांतील सर्वांत महत्वाची व जरूरीची सुधारणा " येथेंच आहे. तो लेखक पुढें म्हणतो, " हेन्री फोर्डनें ईश्वराची अगाध करणी व मानवाची कर्तृत्वशक्ति यांचा एवढा संयोग केला आहे कीं, अशा रीतीचा अपूर्व चमत्कार इतर कोणत्याही कारखान्यांत कधींच दृष्टीस पडला नाहीं !" तोच गृहस्थ पुढें एके ठिकाणीं म्हणतो, " पिरॅमिडच्या रचनेनंतर एका माणसाच्या भगीरथ उद्योगाचें महत्वाचें उदाहरण म्हटलें म्हणजे हेंच होय. " या ठिकाणीं विजेच्या भट्ट्या व्यवस्थित रीतीनें काम करितात व धातूच्या रसाच्या कांबी बनविण्यापेक्षां एकदम तो साच्यांत ओतण्यांत येतो. ह्या अपूर्व गोष्टीही फोर्डनें घडवून आणिल्या आहेत. दगडी कोळसा व त्यापासून निर्माण करावयाच्या जिनसांचे अनेक कारखाने आहेत. फार काय सांगावें ? केवळ मालाची चढउतार करण्यासाठीं बांधलेला धक्काच अर्धा मैल लांब आहे.

रासायनिक द्रव्यांचा शोध करण्यासाठीं व कच्चा माल तपासून घेण्यासाठीं फोर्डची मोठी प्रयोगशाळा आहे. या ठिकाणीं कित्येक रसायनशास्त्री कामावर असून, प्रत्येक पोलादाच्या आयातीचें पूर्ण परीक्षण

केल्यावांचून ते पोलाद उपयोगांत आणूं देत नाहींत. या ठिकाणीं फोर्डला लागणाऱ्या वस्तूंचा नेहमीं शोध चालू असतो.

अश्वहीन रथ तयार करण्याची येथील पद्धती पाहून एकजण म्हणतो कीं, " फोर्डच्या कारखान्यांत माणसें अश्वहीन रथ तयार करीत नाहींत तर ते असले रथ सारखे ओकत असतात ! " हें म्हणणें अगदीं अक्षरशः खरें आहे. कारखान्याच्या एका बाजूनें कच्च्या मालाचा इतका पुरवठा होत असतो कीं त्या प्रवाहाला नदीच्या प्रवाहाचीच उपमा शोभेल; व दुसऱ्या मुखांतून परिपूर्ण झालेले अश्वहीन रथ आपल्या आपणच भराभर बाहेर पडत असतात !

सामान्यतः काम करण्याचे तीन संघ आहेत. पहिल्यांत कच्च्या मालापासून सुटे भाग तयार होतात. दुसऱ्यांत त्यांचें एकीकरण करून गटानिहाय ते भाग सांधले जातात, व तिसऱ्यांत भागांचे सर्व गट एकत्र बांधून गाडी बनविण्याची क्रिया पूर्ण होते. सर्व कामें यंत्रसहाय्यानें होतात. सुट्या भागांचीं मोजमापें इतकीं बिनचूक होतात कीं एका इंचाच्या $\frac{१}{२०००}$ भागाचीही तफावत असत नाहीं. फोर्डरथांत सगळे मिळून १७०० निरनिराळे भाग असतात, आणि प्रत्येक भागाला निरनिराळ्या अनेक कृतींतून निघावें लागतें. टप शिवणें किंवा रंगविणें ह्या क्रियाही इतक्या झटपट व नमुनेदार होतात कीं त्या पहाण्यांतसुद्धां आनंद वाटतो. सर्वांत गंमतीचा देखावा पहावयाचा असेल तर फोर्ड रथाची अखेरची उभारणी पहावी. रंगसफेती होऊन प्रत्येक मिनिटाला पांच फोर्ड रथ तयार होतात ! परमेश्वराचें स्वरूप जसें अवर्णनीय आहे त्याचप्रमाणें फोर्ड रथाच्या रचनेचें यथातथ्य वर्णन करणेंही अशक्यच आहे. स्वचक्षूंनीं पाहून त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्यालाच तें खरोखर कळणार आणि तोच खरा भाग्यवान होय !

प्रकरण अकरावें.

# समाजाच्या सुखाचें साधन !

फोर्ड रथानें मानवी जगांत केवढी क्रांती करून सोडली आहे त्याची नीट कल्पना यावयाला पाहिजे असल्यास साठ सत्तर वर्षांपूर्वीच्या समाजाच्या हालचालीकडे किंवा प्रवासाकडे थोडें लक्ष दिलें म्हणजे झालें. त्या काळीं फोर्ड रथाची कुणाला कल्पनाही नव्हती तर आजमितीला असला रथ ही एक जरूरीची बाब होऊन बसली आहे. १८९९ सालीं अमेरिकेंत साऱ्या ३७०० गाड्या होत्या. त्याच १९२६ सालीं २२००००००० झाल्या. म्हणजे प्रत्येक ६ माणसांना एक गाडी पडली !

आगगाड्यांप्रमाणेंच फोर्ड रथांनीं दळणवळणांत मोठीच क्रांति केली आहे. पांच पंचवीस वर्षांमागें अमेरिकेंतील सर्वसामान्य रस्ते अगदीं भिकार होते, आणि ज्यांना प्रवास करावा लागे त्यांना उरावर धोंड पडल्यासारखी वाटे. घोडे व गाड्या यांचीही दुर्दशा होई व आतां अगदीं सोय नाहीं असें झाल्याखेरीज रस्तेदुरुस्ती होत नसे. डियरबोर्नपासून डिट्रोटपर्यंतचा रस्ता चांगला नसल्यामुळेंच फोर्डचा बाप डिट्रोटला जाण्याचें टाळी व अगदीं जरूर पडली तरच आठवड्यांतून एकादे वेळेस जाई. त्या वेळीं दळणवळण फारच कमी असल्यानें शेतकऱ्यांचें जिणें एकलकोंडेपणाचें होई. आसपासच्या लोकांचा संबंध कमी येत असल्यामुळें त्यांच्या समजुती कोत्या होत्या. शहरांतील सुधारलेल्या लोकांच्या आकांक्षा, स्वभाव, रीतिभाती वगैरेंची ओळखच नसल्यामुळें नगरवासी जन व खेडवळ लोक यांच्यांत एक प्रकारचा परकेपणा व तुटकपणा दिसून येई. पुढारलेल्यांच्या विषयीं मागसलेल्यांच्या मनांत हेवा उत्पन्न होई व जो तो

खेडेगांव सोडून शहरांत जाऊन रहाण्याची हांव धरी. यामुळें शेतीवर फार अनिष्ट परिणाम होऊं लागला होता !

पुष्कळांना असें वाटे कीं शाळा घातल्या आणि रस्ते सुधारले म्हणजे याला आळा बसेल. पण रस्तेसुधराईसाठीं जादा कर कोणी द्यावा ? खेडेगांवच्या लोकांना चांगले रस्ते करण्यासाठीं कर देणें परवडत नसे तर शहरवासीयांना त्यांबद्दल मोठीशी कळकळ वाटत नसे. पण अश्वहीन रथाच्या उत्पत्तीनें हा प्रश्न कायमचा सुटला. नागरिक जन अश्वहीन रथांतून फिरूं लागल्यामुळें चांगले रस्ते असण्याची त्यांना अवश्यकता भासूं लागली. म्हणून खर्च करण्यास ते तयार झाले. खेडेगांवच्या लोकांना तर प्रथमपासूनच चांगल्या रस्त्यांची जरूर होती. ती आणखी वाढली त्यामुळें तेही करास कबूल झाले. वास्तविक वाईट रस्त्यांची ओरड दुचाकीच्या आगमनापासूनच सुरू झाली होती, पण तिकडे कोणी लक्ष दिलें नव्हतें; परंतु अश्वहीन रथाच्या वाढीबरोबर मार्गांचाही पुनर्जन्म होऊं लागला, आणि आजमितीला तर जिकडे तिकडे सुधारलेल्या राजमार्गांचें जाळें पसरलें असून कुणालाही मोठ्या वेगानें व सुखानें प्रवास करतां येतो.

म्हणजे लांब अंतराची किंवा पल्ल्याची भीति नष्ट झाली, शाळांची संख्या वाढली व आपोआपच लोक जास्त सज्ञान होऊं लागले. खेडेगांवची रहाणी एकलकोंडेपणाची वाटेनाशी झाली. पूर्वी २०–२५ मैलांचा प्रवास करायचा म्हणजे कोण जोखीम वाटे. पण आतां केवळ गांठ भेट घेण्यासाठीं सुद्धां मनुष्य शेसव्वाशें मैलांचा प्रवास सहज करतो ! खेडेगांवचे लोक शहरांत जातात व शहरचे लोक खेडेगांवीं येतात व या दळणवळणानें एकमेकांचा फायदा होतो.

अमेरिकेंतसुद्धां अशीं कांहीं दुर्लंघ्य स्थळें होतीं कीं त्या ठिकाणच्या रहिवाशांचा बाह्य जगाशीं क्वचितच संबंध येई. त्यामुळें ते अडाणी व

संकुचित वृत्तीचे असत. पण अश्वहीन रथाच्या कृपेनें आज केवढा चमत्कार झाला आहे ! अशा दुर्लंघ्य स्थळांतील रहिवाशांनासुद्धां बाह्यजगाच्या ज्ञानाचा फायदा घेतां येऊं लागला आहे. एवढेंच नव्हे तर अत्यंत उंच व खडकाळ पर्वतप्रदेशावर सुद्धां आपल्या नव्या कल्पना, नवे विचार, नवे शोध घेऊन तेथील लोकांना ज्ञानामृत पाजण्यासाठीं सर्पाकृती वळणें घेत घेत अश्वहीन रथ झुक झुक करीत चाललेला आढळतो !

धंद्याच्या दृष्टीनेंसुद्धां अश्वहीन रथानें शहरें व खेडेगांव यांच्यावर उपकारच केले आहेत. सर्व प्रकारच्या सामानाची हालचाल झटपट करितां येऊन प्रवासी लोकांचीही सोय झाली आहे. त्यामुळें लोकांना आगगाड्यांवर आतां फारसें अवलंबून रहावें लागत नाहीं व व्यापाराची भरभराट होत आहे. यापेक्षांही विशेष फायदा म्हटला म्हणजे ह्यामुळें शहरांतील गलिच्छ नासक्या हवेंत न रहातां शहराजवळच्या उपनगरांत राहून कामासाठीं शहरांत वेळेवर जाऊन पुन्हां आपल्या निवासस्थानीं लोकांना परत जातां येतें ! त्याचप्रमाणें खेडेगांवच्या लोकांनाही हां हां म्हणतां नगरांत मिळणारा माल आपल्या दारीं आणतां येतो व आपल्या शेतांतील मालाचा खप मोठमोठ्या शहरीं करतां येतो. सुमारें ४० लाख मोटारी अमेरिकेच्या शेतावर काम करीत आहेत. शेतकरी व व्यापारी यांच्याप्रमाणें धंदेवाल्यांनाही त्यापासून फार फायदा झाला आहे. आजमितीला एक लाख वैद्य या साधनाचा उपयोग करीत आहेत.

जिवाला आलेला थकवा घालविण्यासाठीं हजारों लोक अश्वहीन रथांत बसून फेरफटका करण्यासाठीं घराबाहेर पडतात, व ईश्वरनिर्मित सृष्टिसौंदर्याचा उपभोग घेऊन ताजेतवाने होतात. हा सुखाचा प्रवास कशानें होतो ? आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना मोकळ्या हवेंतील स्वातंत्र्याची व समाधा-

नाची प्राप्ती कोण करून देतो ? लांब लांबच्या ठिकाणीं रहाणाऱ्या आप्तेष्टांच्या, सग्यासोयऱ्यांच्या, गांठी भेटी कोण करवितो ? मोठमोठे प्रवास सुकर करून सुंदर व भव्य सृष्टिचमत्कार आणि ऐतिहासिक स्थळें दाखवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला चिरंतनत्व कोण देतो ? या सर्वांचें उत्तर अश्वहीन रथ हेंच होय !

शिवाय मोटारीचा धंदा निघाल्यापासून लाखों माणसांच्या पोटापाण्याची सोय झाली आहे हा केवढा फायदा ! उदाहरणार्थ, केवळ फोर्ड मोटार कंपनींतच दोन लाखांवर लोक काम करीत आहेत. दोन लाख माणसें फोर्डरथ विकण्याचीं वगैरे कामें करीत आहेत. शिवाय फोर्ड कंपनीला लागणारा माल तयार करणारे किती तरी आहेत ते वेगळेच. हेन्री फोर्ड म्हणतो त्याप्रमाणें " अठरा वर्षांपूर्वीं एका कल्पनेला मूर्त स्वरूप मिळाल्यामुळें " आज तीस लाख लोकांना उदरंभरणाची काळजी उरली नाहीं. सारांश जसजसा मोटारींचा प्रसार वाढत जाईल, तसतशा राष्ट्राराष्ट्रांतील कोत्या समजुती मावळून व भांडणांचें बीज नामशेष होऊन आंतरराष्ट्रीयत्वाची कल्पना या पृथ्वीतलावर बद्धमूल होईल असा भरंवसा फोर्डला वाटत आहे !

अश्वहीन रथाच्या निर्मितीमुळें वर उल्लेखिलेले फायदे मनुष्यजातीला मिळूं लागले. पण फोर्ड रथानें विशिष्ट अशी कोणची कामगिरी केली ? या प्रश्नाचें उत्तर द्यायचें तर "हेन्री फोर्डनें सामान्य जनांना अश्वहीन रथांत बसविलें" असें जें एलिस जोन्सनें म्हटलें आहे तेंच खरं आहे. अश्वहीन रथ बनविणारा प्रत्येकजण मानवी जीवितांत घडून आलेल्या क्रांतीला थोडाबहुत कारण आहेच, पण त्या क्रांतीचे सुपरिणाम सामान्य माणसाच्या पदरांत टाकण्याची मोठी कामगिरी फोर्ड रथानें साधली आहे. पूर्वीं मोटार म्हणजे लक्ष्मीपुत्राचें खेळणें किंवा चैनीची वस्तु समजली जाई, परंतु आज गरीबालासुद्धां मोटार जवळ असणें सुखाचें आणि उपयोगाचें झालें

आहे ! आणि याचें सर्व श्रेय हेन्री फोर्डकडे आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे चैनीची वस्तु सामान्य लोकांच्या आहारीं आणणारा जर कोणी असेल तर तो हेन्री फोर्ड होय.

अगदीं प्रथमपासून सामान्य माणसाच्या उपयोगीं पडेल अशी गाडी तयार करण्याचीच त्याची महत्वाकांक्षा होती; व कित्येक वर्षांच्या मेहनतीनें त्यानें ती सिद्धीस नेली. मध्यस्थितींतील इसमालाही घेतां येईल इतकी स्वस्त गाडी तयार करण्याचें त्यानें १९०९ सालीं जाहीर केलें. प्रथम ही गोष्ट कोणाला शक्यच वाटेना; परंतु त्यानें आपलें वचन खरें केलें; त्यामुळें आजमितीला जगांतील सर्व देशांत लहान थोर गरीब श्रीमान सर्वच फोर्ड रथाकडून सेवा बजावून घेत आहेत.

---

## प्रकरण बारावें.

# कृषियंत्र

—:०:—

परिस्थितीच्या प्रभावामुळें अश्वहीन रथ तयार करण्याकडे जरी फोर्डचें लक्ष वेधलें होतें तरी लहानशा शेतावर चालवितां येईल असा ट्रॅक्टर ( Tractor म्हणजे कृषियंत्र ) निर्माण करण्याची त्याची लहानपणची महत्वाकांक्षा कायम होती. शेतीच्या कामाला घोडे पाहिजे तेवढें काम देत नाहींत अशी त्याची खात्री होती. आणि शेतकऱ्यानेंही सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत सारखे काबाडकष्ट करून शरीर झिजविणें त्याला पसंत नव्हतें. कारण इतके कष्ट करूनही सुखाची भाकर खातां येण्याची त्यास मारामार पडे. तेव्हां स्वस्त व हलका असा मैदानी नांगर किंवा कृषियंत्र निर्माण करण्याकडे त्याचें चित्त वारंवार ओढ घेई; पण त्याला कार्यव्यापृतत्वामुळें फुरसतच सांपडत नसे.

१९१५ सालाच्या सुमारास हेन्री फोर्डच्या अंगावरील कामाचा बोजा कांहीं अंशीं हलका झाला. कारण फोर्ड मोटार कंपनीची घडी आतां नीट बसली होती. मध्यंतरींच्या कालांत शेतकरीही सुधारणेला अनुकूल होऊन पाणी व धान्य वगैरे वहाण्यास फोर्ड रथ वापरूं लागले होते व शेतीच्या धंद्याला उपयोगी पडेल असा नांगर निर्माण होईल तो सुदिन असें त्यांना वाटूं लागलें होतें. " चांगल्या घोड्यांच्या एका जोडीच्या किंमतींत शेतकऱ्याला मी एक चांगला मैदानी नांगर विकूं शकेन अशी मला उमेद आहे." असें हेन्री १९१४ सालीं म्हणाला. त्याबरोबर " हें तर शक्यच नाहीं " असा सगळ्यांनींच जबाब दिला. अर्थात् अशक्यतेला शक्यतेचें रूप देण्यासाठीं फोर्डनें चंग बांधला.

१९१५ च्या उन्हाळ्यांत त्याला जी थोडीशी फुरसत मिळाली, तिचा उपयोग त्यानें या कार्याकडे केला. या वेळीं तो आपल्या जुन्या घरीं राहात असे. चांगला विचार करून त्यानें एक नांगर तयार केला; पण तो त्याच्या मनास आला नाहीं. पुन्हां पुन्हां त्यानें कामाला सुरवात करावी, व तयार केलेला नमुना त्याला पसंत पडूं नये, असें कित्येकदां झालें. त्याला मुख्य अडचण वजनाची होती. जड नांगर तयार करणें फारसें कठीण नव्हतें; पण हलका नांगर तयार करणें तितकेंच मुष्किलीचें होतें. त्याचे यंत्रशास्त्रीसुद्धां म्हणत कीं नांगर जड केल्याशिवाय मागचें ओझें ओढण्यास त्याला जमिनीवर धर मिळणार नाहीं. यावर तो असें म्हणे, "झाडावर चढतां येण्यासाठीं मांजराचें अमूक एक वजन असलें पाहिजे असें आहे कीं काय ?" हें उत्तर जरी थोडेंसें विक्षितपणाचें दिसलें तरी त्यापासून हेन्रीनें एक कल्पना बसविली व नांगराला पंजे लावण्याचें त्यानें ठरविलें.

जवळ जवळ एका वर्षाच्या प्रयोगांतीं त्यानें पहिला फोर्डसन तयार केला व प्रदर्शनांत तो चालवून दाखविला. त्याबरोबर मागण्यांचा पाऊस पडूं लागला. परंतु एकही नांगर विकण्याचें त्यानें नाकारलें. कारण अशा रीतीनें धंदा करण्याच्या तो विरुद्ध होता. तो म्हणे "जरा थांबा, यापेक्षां जास्त चांगला नांगर करण्याची माझी धमक आहे. मग असा सर्वांग-परिपूर्ण नांगर तयार झाल्यावरच विक्रीस काढला तर काय वाईट ?"

शेवटीं फोर्डच्या मनाजोगता नांगर तयार झाला; तरी मोठ्या प्रमाणा-वर ते करण्याची तजवीज झाल्याशिवाय तो बाजारांत ठेवण्याची फोर्डची इच्छा नव्हती. परंतु १९१७ सालीं त्याचा अगदीं नाइलाज झाला. कारण त्या वेळीं लोकांची गरज फोर्डसनच भागवील अशी पाळी येऊन ठेपली होती. अमेरिकेनें जर्मनीशीं युद्ध पुकारलेलें होतें व जर्म-नांच्या पाणबुड्या बोटींमुळें इंग्लंडमध्यें अन्नाचा तुटवडा पडून लोकांवर उपासमारीचा प्रसंग आला होता. या वेळीं पाणबुड्यांवर तोड निघाली नसती तर इंग्लंडला दांतीं तृण धरून जर्मनीला शरण जाणेंच भाग होतें. तेव्हां वाटेल तें करून इंग्लंडमध्येंच अन्नाची पैदास वाढविण्याचें इंग्लंडनें ठरविलें. पण घोड्यांची संख्या नियमित असल्यामुळें पुरेसें अन्न पैदा कर-ण्यास मैदानी नांगराचीच आराधना करणें त्यांना भाग होतें. असे नांगर इंग्लंडमध्यें क्वचित् उपयोगांत आणिले जात ही एक गोष्ट; व असे नांगर तयार करण्यास कारखाने मोकळे नव्हते ही दुसरी गोष्ट; कारण युद्धोपयोगी दारुगोळा तयार करितां करितांच त्यांचे नाकींनऊ येत होते. अमेरिका नुकतीच युद्धांत पडलेली. अशा वेळीं इंग्लंडनें माघार घ्यावी तर अप-जय ठरलेला. अशा प्रकारें महायुद्धानें इंग्लंडवर हा मोठा कठीण समय आणिला होता.

फोर्डचा मँचेस्टरला जो कारखाना होता त्यांत पुष्कळ फोर्डसन तयार होऊन पडले होते. 'ब्रिटिश बोर्ड ऑफ अग्रिकल्चर' याच्या विनंतीवरून फोर्डसनची पहाणी करण्यांत आली व ते नांगर उत्तम असल्यावद्दल इंग्रज सरकारकडे लिहून गेलें. तेव्हां युद्ध चालू असेपर्यंत फोर्डसनच्या आकृति कर्जाऊ द्याव्या अशी फोर्डला विनंती करण्यांत आली. तींत असें म्हटलें होतें कीं, "फोर्डसनचा नमुनाच उत्तम असून व्यवहारोपयोगी आहे, व त्याच्यावरच राष्ट्राची मदार पूर्णपणें अवलंबून आहे" फोर्डनें इंग्लंडची विनंती मान्य केली, व फोर्डसन बनविण्यांत कुशल असलेले लोक पाठवून दिले. परंतु खोळंबा व्हायचा तो झालाच, आणि ५ हजार मैदानी नांगर पुरविण्याबद्दल फोर्डकडे मागणी करण्यांत आली.

त्या वेळीं मैदानी नांगराचा कारखाना उभारला गेला नव्हता तरी डियरबोर्न येथें एक कामचलाऊ कारखाना उभारून दोन महिन्याच्या आंतच मैदानी नांगर जहाजावर चढूं लागले, व पुढें तीन महिन्यांत ती मागणी पूर्ण करण्याचें श्रेय फोर्डनें घेतलें. तो नांगर लगेच उपयोगांत आणून बायकांनीं इंग्लंडला जी मदत केली, तिचें यथायोग्य वर्णन करणें अशक्य आहे. अन्न निर्माण करण्याच्या कामीं बायकांनीं मदत केली नसती तर तो प्रसंग कसा काय निभावला असता याची शंकाच आहे.

फोर्डसनची २२ अश्वशक्ति असते व राकेल तेलावर चालणारें ४ दंडगोलाचें यंत्र ती शक्ति निर्माण करतें. त्याला मागें दोन मोठीं चाकं असतात; त्यांचा व्यास ४२ इंच असून १२ इंच रुंदी असते. यावरच सर्व वजन अवलंबून असतें. त्याला "मांजराचे पंजे लावलेले असतात व त्यांतील कोण ४५ अंशांचा असतो. हें यंत्र दररोज ६ ते १० एकर जमीन नांगरूं शकतें व ताशीं दहा मैलांप्रमाणें त्याचा वेग असतो; शिवाय

पत्र्याच्या सहाय्यानें याची शक्ति इतर कोणत्याही यंत्राला देतां येते. १९२२ च्या जानेवारींत ३९५ डॉलरला फोर्डसन देतां येईल म्हणून फोर्डनें जाहीर केलें, आणि ही किंमत खरोखर घोड्यांच्या एका जोडीच्या किंमतीपेक्षां कमी होती. ४ कोटी भांडवल खर्च करून मोठा कारखाना उभारण्यांत आला व ६ लाख फोर्डसन प्रत्येक वर्षी निघूं लागले.

इतरांनींही वरींच कृषियंत्रें काढलीं पण फोर्डच्या कृषियंत्राचा विशेष हाच आहे कीं वजनानें तें हलकें असून अगदीं स्वस्त आहे. शिवाय त्याचे सुटे भाग मिळतात त्यामुळें एकादा भाग मोडला तरी तेवढ्यामुळें सर्व यंत्र टाकाऊ होत नाहीं.

या शेतयंत्रामुळें शेतकऱ्यांच्या जीवनक्रमांत केवढी तरी क्रांति झालेली आहे ! पूर्वी जबर श्रम करून संध्याकाळाला शेतकऱ्याचीं हाडें खिळखिळीं व्हायचीं ! पण आतां त्याला आपलें काम लवकर उरकून इष्टमित्रांशीं गुजगोष्टी करण्यास पुष्कळ वेळ मिळतो व थकवा येऊन त्याचा जीवही अर्धमेला होत नाहीं ! आतां घोडे जुंपायचे कसे, नांगर धरायचा कसा, नांगराचा फाळ आंत किती जाऊं द्यावयाचा वगैरे भानगडीच उरलेल्या नाहींत. आतां एकाद्या पोरालाही कृषियंत्रावर बसून नांगरणें, कुळवणें, लावणी करणें, कापणी करणें वगैरें सर्व कामें सहज करितां येतात.

पूर्वी जगांतील इतर माणसेंच काय पण पशुपक्षीसुद्धां आनंदानें नाचत बागडत आणि मौज करीत असतां दुर्दैवी शेतकऱ्याला मात्र नांगर धरून ढेकळांतून चालावें लागे व कंबर मोडेपर्यंत काम करणें भाग पडे; पण कृषियंत्राच्या उत्पत्तीपासून कृषिकर्मातील दगदग लयाला गेली आहे. फोर्ड म्हणतो, “ मनुष्यजातीच्या सुखाकरितां जीं जीं यंत्रें अर्वाचिन काळांत निर्माण झालेलीं आहेत, त्या सर्वांत कृषियंत्राला प्रथम पदवीचा मान

आहे.". त्याच्या योगानें पुष्कळ काम होतें एवढेंच नव्हे, तर चांगलें काम होऊन तें थोडक्या वेळांत होतें. म्हणजे लाकडी नांगर व लोखंडी नांगर यांत जो भेद आहे तोच लोखंडी नांगर व कृषियंत्र यांच्यांतही आहे. घोड्याचीं सर्व कामें त्यानें होतातच शिवाय माशांचा उपद्रवही वांचतो तो निराळाच !

केवळ शेताकडेच याचा उपयोग होतो असें नाहीं. त्यानें दळण्याचीं व कुटण्याचीं यंत्रें चालवितां येतात, गवत रचतां येतें, लांकडें फोडतां येतात, प्रकाशासाठीं वीज निर्माण करितां येते, पाणी काढतां येतें, आणि अशाच प्रकारच्या हजारों गोष्टी करितां येतात. याशिवाय युद्धांमध्यें तोफा ओढण्याच्या कामीं घोड्यांपेक्षां यांचा उपयोग फार होतो.

खरोखर पाहिलें तर मनुष्याला ही एक अलौकिक देणगीच प्राप्त झालेली आहे. कृषिविद्येंतील कित्येक अडचणी यानें दूर होतील व तिला एक नवीनच वळण लागेल यांत तिळमात्र संदेह नाहीं.

---

## प्रकरण तेरावें.

## खरें लोककल्याण !

निरनिराळ्या ५५ देशांतील मिळून दीड लाख लोक फोर्ड मोटार कंपनीच्या नुसत्या अमेरिकेंतील कारखान्यांत काम करीत आहेत. निर-निराळ्या भाषा बोलणारे इतके लोक एकत्र काम करीत असल्याचा हा देखावा खरोखरच अपूर्व म्हटला पाहिजे ! आजमितीला जगांतील भांड-वलवाले व मजूर यांच्यांत माजून राहिलेला लढा पाहिला म्हणजे फोर्ड हा एक मोठा जादूगार आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. लक्षावधि लोक

त्याच्या मनाप्रमाणें बिनतक्रार काम करीत आहेत यावरून असें वाटतें कीं त्यानें एकादी यक्षिणीची कांडी फिरवून आपल्या नोकरांना मारून टाकलें असलें पाहिजे !

अशी कोणती जादू फोर्डजवळ आहे ? ही जादू म्हणजे त्याचा लोकांवरील अढळ विश्वास होय ! तो म्हणतो, " लोकांची बाजू बरोबर आहे. " एकमेकांनीं एकमेकांस मदत करून प्रत्येकजण स्वतंत्रपणें आपल्या पायावर उभा राहील असें केलेंच पाहिजे. फोर्ड नुसता बोलून राहिला नाहीं, तर ' बोले तैसा चाले ' या तुकोबारायाच्या उक्तीप्रमाणें त्यानें आपलें आचरण ठेवलें आहे. म्हणूनच आज कर्मवीर म्हणून कोणीही मोठ्या आदरानें त्याला वंदन करण्यास मागेंपुढें पहात नाहीं. धंद्यांतील त्याचें धोरण काय असेल असा जर प्रश्न केला तर "लोकांकरितांच नफा मिळविण्याची त्याची खटपट असते," हेंच त्याला उत्तर आहे; कारण त्याचें ध्येयच मुळीं लोकसेवा हें आहे, आणि याच तत्वावर त्यानें आपल्या कामाची पद्धत बसविलेली आहे.

आपणही एकदां मजुरी मिळविण्यासाठीं जिवापाड श्रम करणारा कामकरी होतों हें हेन्री फोर्ड विसरलेला नाहीं. नोकरांच्या काय अडचणी असतात याची त्याला पूर्ण जाणीव आहे व त्या समजून घेण्यासाठीं तो सारखा प्रयत्न करितो. कित्येकांना तो नांवानेंही ओळखतो. १९१४ सालीं एका गृहस्थाला कारखाना दाखवीत असतां एक नोकर आला, आणि त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणाला, " हे पहा हेन्री, मी सांगितलें नाहीं तुला कीं, तूं कांहीं तरी अचाट काम करीत असतोस म्हणून ? " ही सलगी पाहून तो गृहस्थ आश्चर्यानें थक्कच झाला. पण बाकीच्यांना त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. कारण हेन्री व तो नोकर कित्येक वर्षें एकमेकांचे दोस्त होते. त्या नोकरानें वरील उद्गार काढला

त्याचें कारण फोर्डनें नुकतीच नफ्याच्या भागीदारीची एक कल्पना जाहीर केली होती. हेन्री म्हणतो, " माझ्या माणसांची व माझी ओळख असावी असें मला वाटतें. "

श्रद्धा व सचोटी यांतच फोर्डच्या कामाची गुरुकिल्ली आहे. आपल्या कारखान्याविषयीं व लोकांविषयीं बोलतांना तो नेहमीं " आपण " हा शब्दप्रयोग वापरतो. त्यामुळें त्याच्या नोकरांनाही त्याच्या कारखान्याबद्दल आपलेपणाची कळकळ वाटते. अमेरिकेंतील कामकरी लोकांच्या परिस्थितीचा नीट विचार करून त्यानें असें ठरविलें कीं दारिद्र्यामुळें मनुष्य झुरणीस लागतो, व त्या काळजीनें त्याच्या हातून व्हावें तितकें काम होत नाहीं; दुसरें फार वेळ कामाचा बोजा दिल्यानें तो खंगून जातो. म्हणून फोर्डनें आपल्या कारखान्यांत नोकरांचे पगार वाढविले, व कामाचे तास १० होते ते ९ केले. या सुधारणेमुळें काम चांगलें होऊन नफाही मिळूं लागला. याशिवाय त्यानें आणखी एक प्रयोग केला तो असा. त्यानें दोनशें निवडक माणसें काढलीं, व आपल्या कारखान्यांतील कामगारांच्या जीवनयात्रेची बारकाईनें चौकशी करण्यास त्यांस सांगितलें. चौकशीअंतीं असें दिसून आलें कीं चार हजार लोक अगदीं गलिच्छ घरांत रहात होते, तर ज्यांना स्वतःचीं घरें आहेत अशीं माणसें चारशें देखील नव्हतीं. इतरांच्या मानानें फोर्डच्या कारखान्यांत काम कमी तास करावें लागत असून पगारही जास्त मिळत होता; परंतु आपल्या नोकरांची ही स्थिति सुधारण्यासाठीं आणखी कांहीं तरी केलें पाहिजे असें फोर्डच्या मनानें घेतलें.

१९१४ सालीं फोर्ड कंपनीची सुस्थिति असल्यामुळें कांहीं प्रयोग करून पहाण्यास फोर्डला हरकत नव्हती. त्याला वाटे, " थोडे लोक अति श्रीमान होण्यापेक्षां पुष्कळ लोकांना सुखासमाधानानें रहातां येईल

असें करण्यांतच खरा पुरुषार्थ आहे." म्हणून त्यानें व जेम्स कझन्सनें मिळून अशी एक योजना काढली कीं, तीमुळें कंपनीच्या भरभराटींत नोकरांना भाग मिळण्याची संधी मिळाली. आणि यामुळें त्यांच्या शीलावरही विलक्षण परिणाम होऊन ते उत्तम नागरिक होण्याला एक प्रकारें चांगली मदत झाली.

त्यानें एक कोट डॉलर बाजूलाच काढून ठेविले, व जाहीर केलें कीं, "फायद्यासाठीं मनुष्यें जर चांगलें काम करितात, तर तो फायदा प्रत्यक्ष हातांत मिळाला तर ते किती चांगलें काम करतील बरें ! कांहीं लोक लक्षाधीश करण्यापेक्षां वीस हजार लोकांना सुखवस्तु करण्याचें समाधान तरी आपल्या लाभेल. धर्म करण्याची माझी इच्छा नसून न्याय्य गोष्टच मी करणार आहें. निव्वळ दानधर्माकरितां मजजवळ फारसें कांहीं नाहीं. तरी पण स्वावलंबी माणसांना थोडी फार मदत करण्याची माझी इच्छा आहे."

१९१४ सालीं त्यानें नवीन पद्धती सुरू केली. या योजनेमुळें त्याच्या कारखान्यांतील सर्वांत कमी पगार मिळणाऱ्यां नोकराला रोजीं आठ तासांच्या कामाबद्दल ५ डॉलर मिळूं लागले. यासाठीं त्यानें कारखान्यांतील काम तीन संघांत वांटून दिलें. प्रत्येक संघांत चार चार वर्ग निर्माण केले; काटकसरीनें रहाणाऱ्या लोकांचा वर्ग पहिला. ज्यांना काटकसरीनें राहून उत्तम काम करण्याची हौस होती, पण संधीच मिळाली नव्हती त्यांचा वर्ग दुसरा. ज्यांना अशा रीतीचें वळण लागण्यास दुसऱ्याच्या मदतीची आवश्यकता होती त्यांचा वर्ग तिसरा; व ज्यांची इच्छाही नव्हती व जे लायकही नव्हते त्यांचा वर्ग चौथा. पहिल्या वर्गाला कांहीं सांगण्याची जरूरीच नव्हती. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गाची सुधारणा होण्याकरितां

त्यांना सूचना करण्याचें कंपनीनें ठरविलें, व चौथ्या प्रकारच्या लोकांना सुद्धां या संधीचा फायदा घेण्याची बुद्धी होईल अशी व्यवस्था ठेविली.

आपल्या बायकापोरांची चांगली काळजी घेणारे, काटकसरीनें रहाणारे, बावीस वर्षांवरील अविवाहित, बावीस वर्षांखालचे अविवाहित असून ज्यांच्यावर एकाद्या नातलगाचें पोट अवलंबून आहे असे व ज्यांच्यावर एका नातलगाचें पोट अवलंबून आहे अशा बायका—अशा चार प्रकाच्या माणसांना फायद्याचा हिस्सा द्यावयाचा म्हणून फोर्डनें ठरविलें.

या काटकसरीच्या संवयीचा परिणाम असा झाला कीं थोडक्याच दिवसांत अडीच कोटींचे भाग कामकऱ्यांनीं विकत घेतले व कंपनीनें त्यावर दर वर्षास १६ टक्के व्याज दिलें. अर्थात् ही पद्धत सुरू झाल्याबरोबर जिकडे तिकडे "हें चालणें अशक्य आहे!" असा ध्वनी निघूं लागला. न्यूयॉर्क टाइम्सनेंही "फोर्डची योजना आजपर्यंतच्या अनुभवावरून पहातां फोल ठरेल!" असें लिहिलें. एकानें हें, एकानें तें, म्हणून सर्वांनीं फोर्डला पुन्हां वेड्यांत काढलें. परंतु फोर्डनें पुन्हां एक वार "अशक्य गोष्ट" शक्य करून दाखविली. त्याची योजना प्रसिद्ध झाल्याबरोबर शेंकडा ६० नोकरांनीं त्या योजनेचा फायदा घेतला. सहा महिन्यांत अशांची संख्या शेंकडा ७५ झाली व वर्षांत ती ८७ वर गेली आणि आतां तर जवळ जवळ प्रत्येकजण त्या योजनेचा फायदा घेत आहे. १९२६ सालीं कंपनीनें असें जाहीर केलें कीं कामाचे तास दर आठवड्यास ४० केले जातील व जे पूर्वीपासून कामावर आहेत त्यांना कमींत कमी दररोज ६ डॉलर मजुरी मिळेल व नव्या लोकांना ५ डॉलर मिळेल! ज्यांना धंदा नव्हता त्यांना धंदा देण्याच्या बुद्धीनें व त्यांना आपल्या बायकामुलांचें सौख्य मिळावें ह्या बुद्धीनें ही सुधारणा अमलांत आणिली गेली.

याचा परिणाम असा झाला कीं हजारों लोक फोर्ड मोटर कंपनीमध्यें काम मिळावें म्हणून डिट्रॉटमध्यें जमा झाले, व शेवटीं आग विझविण्याच्या **जलफेंकीनें** त्यांना पळवून लावणें भाग पडलें. या लोकांची निराशा झाल्याबद्दल फोर्डला फार वाईट वाटलें, पण दुसऱ्या कांहीं उपायांनीं त्यानें त्यांचें सांतवन केलें. एकंदरींत नव्या पद्धतीनें कंपनीचा कसा फायदा झाला हें पहावयाचें असेल तर माल तयार होण्याचें प्रमाण फार वाढलें एवढें सांगितलें म्हणजे पुरे. याशिवाय अन्य फायदे झाले ते निराळेच. आजपर्यंत पुष्कळ नोकर आपली नोकरी सोडून जात, व दरवर्षीं नवीन माणसांची भरती करणें भाग पडे. त्यामुळें काम झटपट उरकत नसे. आतां कोणी सोडून जाईना व पगार जास्त असल्यामुळें उत्तम कारागिरांचीहि वाण नाहींशी झाली. याशिवाय कित्येक लोक रजा घेऊन घरीं बसायचे ते बंद झाले. १९१४ सालापूर्वीं गैरहजेरींचें प्रमाण शेंकडा दहा होतें. म्हणजे १४०० माणसें दररोज घरीं बसत. त्यामुळें माल तयार होण्यास विलंब लागे. नवीन पद्धत सुरू झाल्यापासून गैरहजेरीचें प्रमाण होतां होतां शेंकडा $\frac{3}{10}$ एढं लागलें आहे, व पगारवाढ झाली तरी नफ्याचेंही प्रमाण वाढलें. त्यामुळें मालकाचाही फायदाच झाला.

आपल्या नोकरांना चांगल्या संवयी लागाव्या म्हणून फोर्डनें कांहीं उपदेशक नेमले होते. परंतु ते वैय्यक्तिक गोष्टींत बरीच ढवळाढवळ करूं लागले. फोर्डला हें मुळींच पसंत पडेना म्हणून त्यानें त्यांना रजा दिली. एकदां डॉ. एस्. एस्. मार्किस नांवाच्या एका उदारमनस्क धर्मोपदेशकाकडे तो गेला, व त्याला म्हणाला, " हल्लीं खाजगी वर्तनाविषयीं आमच्या लोकांकडून बरीच छाननी होते, ही गोष्ट उपयोगी नाहीं. कांहीं उद्दिष्ट हेतू साध्य करण्याकरितां माणसांनीं प्रामाणिकपणें उद्योग

करीत रहावें असें मला वाटतें, आणि हीच गोष्ट मला कामकऱ्यांच्या मनावर बिंबवावयाची आहे; तेव्हां अशा रीतीचें शिक्षण देण्याचें कार्य आपण हातीं घ्यावें अशी माझी आपल्याला विनंती आहे."

"फोर्ड मोटार कंपनी" पासून केवळ धट्टेकट्टे व धडधाकट असतील त्यांचाच फायदा होतो असें नाहीं, तर आंधळे, लुले, पांगळे किंवा गुन्हे केल्यामुळें हीनत्वाप्रत पावलेले अशा साऱ्यांना त्या कंपनींत आसरा मिळतो. ज्यांचा नैतिक अध:पात झाला आहे अशांना आपलें वर्तन सुधारण्याची फोर्डनें अशा रीतीनें संधी दिल्यामुळें आज कित्येक लोक सन्मार्गानें चालून आपली उन्नति करून घेत आहेत. फोर्डचा असा दृढ विश्वास आहे कीं, परमेश्वराप्रमाणेंच समाजानें सुद्धां पश्चात्तापतप्तांना पुनरुन्नतीची संधी दिली पाहिजे; आणि मनुष्याच्या वर्तमान व भविष्यकालाकडे नजर देऊन त्याच्या गत गोष्टींचा फारसा विचार केला जाऊं नये. म्हणूनच जे पतित आहेत त्यांना हात देण्यासाठीं फोर्ड सदैव तयार असतो. तो म्हणतो, "आमच्या कारखान्यांत येणाऱ्या नोकरांच्या मागील आचरणाची चौकशी आम्ही करीत नाहीं. कारण आम्ही माणसाच्या मागील कृत्यांना नोकरीवर ठेवीत नाहीं, तर त्या माणसाला ठेवितों. कोणीही मनुष्य सर्वांशीं टाकाऊ असत नाहीं. त्याला संधी मिळाली तर त्याचा चांगुलपणा प्रत्ययास यायला वेळ लागत नाहीं. मनुष्य एकदां तुरुंगांत गेला असला म्हणजे फिरून तो तुरुंगांतच जाईल असें म्हणणें वाजवी नाहीं. मूळचींच सदाचरणी माणसें आत्मोन्नतीच्या मार्गांत वरींच पुढें चालून गेलीं असलीं तरी अध:पात झालेल्यांना सदाचरणाच्या चालीला लागायला संधी तरी मिळायला नको काय? कारण प्रत्येक माणसाला स्वत:च्या "भविष्यकालावर पूर्ण ताबा ठेवितां येण्यासारखा असतो."

एके दिवशीं संध्याकाळीं एक मोठा क्रूर दिसणारा मनुष्य फोर्डच्या विक्रीखात्याच्या व्यवस्थापकाच्या घरीं आला. घरचा मालक पुढें आल्यावर तो मनुष्य म्हणाला,

" फोर्डच्या कारखान्यांतील हॉकिन्सची मला भेट पाहिजे आहे. "

" मीच तो; काय काम आहे ?" असा हॉकिन्सनें प्रश्न केला.

" मला काम पाहिजे " तो मनुष्य म्हणाला, " मी घरफोडी करणारा किंवा रस्त्यावर दरवडे घालणारा चोर आहें; आणि अशा गोष्टींबद्दल निरनिराळ्या तुरुंगांची हवाही मी खाल्ली आहे; परंतु आतां तसें करण्याचा मला कंटाळा आला आहे व सरळ वागावें असा विचार आहे; पण मला काम मिळालें पाहिजे. आज काम तरी मिळवीन, नाहींतर कोणाचें डोकें तरी फोडीन, असा मी निश्चय केला आहे."

" असें, नाहीं काम मिळालें तर काय करशील ? " हॉकिन्सनें पुन्हां प्रश्न केला.

" काम मिळालेंच पाहिजे; घरीं बायको आहे तिच्या पोटासाठीं पैसा मिळालाच पाहिजे " असें म्हणून त्यानें आपल्या विजारीच्या खिशांतून एक दारूची बाटली काढली व ती दाखवून म्हणाला, "मी अमूक रस्त्यावर अमूक ठिकाणीं रहातों. " ( त्यानें शहराच्या अगदीं भयंकर भागाचें नांव घेतलें ) "काम मिळालें नाहीं तर घरीं पोहोंचण्यापूर्वीं कोणावर तरी मी हिचा प्रयोग करीन तेव्हां स्वस्थ होईन. चांगुलपणानें पैसा नाहीं मिळाला तर बदमाषपणानें पैसा काढीनच काढीन. "

" बरं, आतां असं कर कीं, ती बाटली ठेव बाजूला, आणि घरीं जा, व उद्यां सकाळीं येऊन मला भेट. पण ध्यानांत धर, बरोबर तसलें कांहीं आणायचें नाहीं; कदाचित् उद्यां सकाळपर्यंत उपाशीं रहावें लागलें

तरी रहा. कारण अशानेंच चांगुलपणानें पैसा मिळवायचा म्हणजे काय करावें लागतें याची तुला कल्पना येईल. आतां तर मी तुला एक पै-देखील देत नाहीं; पण आज रात्रीं येथून तुझ्या घरापर्यंत जर का कांहीं गुन्हा झाला, अगर कोणाचें डोकें फुटलें तर तूं आहेस आणि मी आहें."

दुसरे दिवशीं तो मनुष्य आला आणि हॉकिन्सनें त्याला कामावर नेमलें. अजूनही तो त्या जागेवर काम करीत आहे. बँकेंत जेव्हां त्यानें आपल्या नांवाचें खातें उघडलें, तेव्हां तो हॉकिन्सला म्हणाला, "चोरी करण्याशिवाय बँकेंत अन्य हेतूनें मी आजच पाऊल टाकीत आहें." पुढें हॉकिन्सनें फोर्डला जेव्हां ही हकीकत कळविली, तेव्हां त्या मनुष्याला पहावें अशी त्याला इच्छा झाली. पाहणी करण्याकरितां फोर्ड त्या खात्याकडे गेला तेव्हां हॉकिन्स त्या माणसाला म्हणाला, "हे पहा, फोर्ड तुला भेटायला आले आहेत." त्या माणसानें फोर्डचें नांव कांहीं नीटसें ऐकलें नाहीं, व आपला काळाकुट्ट व तेलकट हात पुढें करून त्यानें हेन्रीशीं हस्तांदोलन केलें. पुढें तो हॉकिन्सजवळ येऊन म्हणतो, "अहो, लोक काय सांगतात ऐकलंत का?"

"नाहीं, काय बरें?" हॉकिन्स म्हणतो.

"अहो, माझ्याशीं हस्तांदोलन करणारा या कंपनीचा मालक आहे म्हणे! खरं कीं काय?"

"खरं म्हणजे? निःसंशय खरं."

"अहाहा! हेन्री फोर्ड जर आपल्या कारखान्यांत पायांनीं चालत येऊन माझ्यासारख्या माणसाशीं हस्तांदोलन करण्यास तयार होतो तर मला आणीक काय पाहिजे? ह्या माणसाकरितां तरी जो चांगलें वागणार नाहीं तो मूर्खच म्हटला पाहिजे."

गुन्हेगार लोकांविषयींच्या कामांत फोर्डला एवढें यश आलें कीं तो म्हणाला, "तुरुंगांतल्या प्रत्येक माणसाला चांगलें करण्याची आम्ही हमी घेतों." तो गुन्हेगार लोकांनाच तेवढी मदत करितो असें नाहीं, तर भुकेबंगाल, भटकणारे, दारूडे, वगैरेसारख्या लोकांनाही आपलें आचरण सुधारण्यास तो संधी देतो.

फोर्ड आंधळे, पांगळे, लुले व गुन्हेगार यांना कामावर घेऊन भरपूर पगार देतो. पण आपण हें काम भूतदयेनें प्रेरित होऊन करतों असें त्याला वाटत नाहीं. तो म्हणतो, "परोपकारबुद्धि ही कितीहि उदात्त भावना असली तरी तिच्या योगानें मनुष्याच्या आत्मविश्वासाला धक्का बसतो, मनुष्याच्या स्वतःच्या कर्तृत्वावरचा विश्वास उडतो व तो आपल्या पायावर उभें राहण्यास न शिकतां परावलंबी बनतो. अर्थात् असल्या भूतदयेपेक्षां ज्या भूतदयेनें मनुष्य स्वतः कष्ट करून पोट भरण्याच्या उद्योगाला लागतो, ती केव्हांही समाजाला जास्त श्रेयस्कर होय. भूतदयेपासूनसुद्धां अंतीं कांहीं तरी फलनिष्पत्ति झालीच पाहिजे.

एकाद्या नोकराला जर घर विकत घ्यायचें असलें तर कंपनीचे कायदेपंडित त्या घराच्या बाबतींत पूर्ण चौकशी करून व त्याच्या किंमतीचाही विचार करून, खरेदीखत करून देतात, व या कामाबद्दल त्या माणसाला कांहीं द्यावें लागत नाहीं.

कित्येकदां असा प्रश्न विचारला जातो कीं, फोर्ड मोटार कंपनी आपल्या नोकरांची जर एवढी काळजी वहाते तर त्यांच्याकरितां एक नमुनेदार गांवच का वसवीत नाहीं ? शास्त्रीय पद्धतीचीं घरें बांधून व उत्तम आरोग्य राहील अशी व्यवस्था करून वसविलेलें नगर उत्तम खरेंच, पण फोर्डची कल्पना थोडी वेगळी असल्यामुळें अशीं नमुनेदार नगरें वसविण्याच्या तो विरुद्ध आहे. त्याचें मत असें आहे कीं, अशा नगरांत रहाणाऱ्या

लोकांना एकाच मालकाच्या तंत्रानें वागणें भाग पडतें, व कांहीं अंशीं त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येऊन सामाजिक व्यवहारांत त्यांना तितक्या मोकळ्या मनानें भाग घेतां येत नाहीं, व त्यांच्या हालचालींवर व्यर्थ दड-पण पडतें. यापेक्षां नोकरांना भरपूर पगार देऊन त्यांना वाटेल तेथें स्वतंत्रपणें आनंदानें राहतां येण्यासाठीं घर करण्यास समर्थ करणें, यांतच त्यांचें अधिक कल्याण आहे. असें जरी आहे, तरी परिस्थितीच्या जोरामुळें त्यानें रिव्हररूज येथें उत्तम घरें आपल्या नोकरांना बांधून दिलीं आहेत व तें एक नमुनेदारच गांव बनलें आहे यांत शंका नाहीं !

एका परदेशीय नोकरानें आपल्या घरांत वीस माणसांना राहायला जागा दिली होती. वास्तविक त्याची जागा दहा माणसांनाच पुरेशी होती, तेव्हां ते लोक आळीपाळीनें झोंप घेत ! त्या माणसाच्या बायको-लाही इतकें काम पडे कीं, रात्रीं बारा ते पहांटे चारपर्यंत तिला विसावा असा क्वचितच मिळे. फायदा वांटण्याची पद्धत निघाल्यापासून त्या नोकरांना भाड्यानें रहाण्यास माणसें घेण्याची जरूर न पडतां आपल्या कुटुंबाच्या चरितार्थाला पुरेल एवढा पैसा मिळूं लागला होता. म्हणून फोर्डनें त्याला बोलावून आणून सांगितलें, "चांगल्या रीतीनें रहातां येईल इतका पगार मी तुला देत असतां आपल्या कुटुंबांत पैसे घेऊन इतरांना राहूं देण्याची काय जरूर ? इतःपर ही गोष्ट करूं नको. यामुळें तुझ्या बायकोलाही थोडी जास्त विश्रांती मिळेल. पहा, मी सांगतों तसें न करशील तर तुला फायद्याचा हिस्सा मिळणार नाहीं." फायद्याचा हिस्सा देण्यामुळें पुष्कळ लोक आपल्या स्वतःच्या मालकीच्या घरीं सुखासमा-धानानें राहूं लागले आहेत.

फोर्डनें सप्टेंबर १९२६ पासून तर आणखी एक सुधारणा घडवून आणली आहे. रविवाराप्रमाणें शनिवारींही फोर्ड कारखाने बंद असतात.

पण पगारांत मात्र काटकसर मुळींच होत नाहीं. यामुळें लोकांचा फायदा होऊन मालही उत्तम प्रकारचा निर्माण होत राहील असा त्याचा भरंवसा आहे. याप्रमाणें कमी काम व बाकीचें शरीरस्वास्थ्य या दोन गोष्टींचें ध्येय फोर्ड मोठ्या झपाट्यानें गांठीत आहे.

फोर्डचें असें म्हणणें आहे कीं, मालक व चाकर यांचें हित एकच आहे व तें एकत्र असण्यानेंच मिळणारें आहे, हें प्रत्येकाला कळलें पाहिजे.

फोर्डच्या म्हणण्याप्रमाणें मजुरीचा प्रश्न अत्यंत महत्वाचा असून त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. त्याच्या मताप्रमाणें पाहिलें तर नोकर व मालक हे एक प्रकारचे भागीदारच असतात; कारण " एकाच माणसाला ज्या वेळीं एकादा धंदा सर्वांशीं उरकत नाहीं, त्याच वेळीं तो इतरांची मदत घेतो, आणि अशी मदत करणारा जरी एकादा मुलगा असला तरी त्या धंद्यापुरता तो भागीदारच होतो. धंद्याच्या भांडवलाच्या दृष्टीनें एकच व्यक्ती मालक असूं शकेल, पण कामाच्या दृष्टीनें त्या व्यक्तीला आपल्या नोकरांवर अवलंबून रहाणें भाग असल्यामुळें मालक व नोकर हें नातें सापेक्ष असतें; तेव्हां दोघेही भागीदारच होत. यापैकीं कोणीही दुसऱ्याला खालीं दाबून आपण वर रहाण्याचा प्रयत्न करील, तर कालांतरानें त्यालाही खालीं जावें लागेल हें निश्चित. म्हणूनच भांडवलवाले व मजूर यांपैकीं कोणीही स्वतंत्र नसून परस्परावलंबी आहेत. यामुळें जर ते एकमेकांचें हित भिन्न आहे अशा खोट्या भावनेनें आपापसांत झगडूं लागतील, तर ज्या धंद्यावर त्या दोघांचेंही जीवित अवलंबून आहे तो धंदा विस्कळित होऊन दोघांनाही नामशेष होऊन जाण्याची पाळी येईल.

याकरितां मालकाची महत्वाकांक्षा आपल्या नोकरांचा पगार वाढवून त्यांना सुखी करण्याची असावी, व नोकरांची महत्वाकांक्षा ही गोष्ट शक्य करण्याची असावी. "नोकरांना काय द्यायचें आहे ?" ही वृत्ति मालकाची

असली म्हणजे ‘ काम करून जर त्याचें चीज होत नाहीं तर मग एवढी दगदग तरी कशाला करा ? होईल तें होईल काम.’ ही वृत्ति नोकरांची होते. अर्थात् कारखानदारानें पगार काय द्यावे ही गोष्ट गौण आहे. आडांतच नसलें तर पोहऱ्यांत कोठून येणार ? किंवा विहिरींत उत्पन्न होणाऱ्या पाण्यापेक्षां पंपानें जास्त पाणी वर खेचलें तर कालांतरानें विहीर कोरडी ठणठणीत पडेल हें उघड आहे. तेव्हां भलतीच पगारवाढ व्हावी म्हणूनही ओरड करण्यांत अर्थ नाहीं. ज्या धंद्यांत एक लाख रुपये उत्पन्न होतात, त्यांत दोन लाख वांटून चालणार नाहीं. तेव्हां एकादा धंदा सफाई बसविण्यासाठीं संप करणें, हा एक अक्षम्य गुन्हाच आहे; आणि अशानें कोणाचाच फायदा होणार नाहीं. कारण तो धंदा उभारण्यासाठीं कित्येकांनीं कष्ट करून आपलें आयुष्य खर्च केलेलें असतें; आणि कित्येकांच्या उदरनिर्वाहाचें एक साधन म्हणून लोक त्याकडे पहात असतात. तेव्हां संकुचितपणाची स्वार्थी दृष्टी ठेवण्यापेक्षां उदारपणाची स्वार्थी दृष्टी ठेवूनच जर मालक व नोकर अभ्युदयाचें एकच ध्येय गांठण्याची खटपट करतील, तर “मजुरांचा प्रश्न” सुटावयाला वेळ लागणार नाहीं. अर्थात् हें उघड आहे कीं मालकाला काय, किंवा नोकरांना काय, नफा किंवा पैसा मिळणें हें कामावरच अवलंबून आहे. काम न करितां आकाशांतून पैसा पडेल हें संभवनीय नाहीं. परमेश्वरानें हस्तपादादि इंद्रियें दिलीं आहेत, तीं निरुद्योगी बसण्यासाठीं खास नव्हे. अर्थात् उद्योग म्हणजेच भुक्ति आणि मुक्ति होय. खरोखरच्या समाजसमतेचा झरा सचोटीच्या उद्योगांतूनच उगम पावतो. म्हणून समाजाच्या धारणपोषणास जो जास्त मदत करतो त्याला जास्त मिळणें सर्वथैव रास्तच आहे. ”

या सर्वांचा मथितार्थ इतकाच कीं मजुरी व भांडवल या दोघांचीही किंमत सारखीच आहे. मजुरी—रोजमुरा, पगार—या शब्दांची

हेटाळणी करून भागणार नाहीं. खोल बुद्धीनें विचार करून पहाणारांना त्या शब्दांमागें एक प्रकारचें पावित्र्य दडलेलें आहे असेंच आढळेल. पगाराच्या तक्त्यावर मजुरी दर्शविणारा निव्वळ आंकडा असला तरी जगांत भाजीभाकरी, वस्त्रप्रावरण, शिशुसंगोपन, कौटुंबिक सुख आणि समाधान हीं त्या मजुरीचींच अनंत रूपें आहेत. त्याचप्रमाणें भांडवल म्हणजे वर उल्लेखिलेल्या मजुरीचा एक वाहता झरा आहे. तो आटून कोणाचेंही भागणार नाहीं. आतां धंद्यांत मिळणारा सर्व नफा एकाच व्यक्तीच्या घशांत जात असेल तर गोष्ट वेगळी. पण ज्या नफ्या-मुळें धंदा वाढीस लागतो, कामकऱ्यांची स्थिति सुधारते, त्यांना भरपूर पगार मिळतो, व पुष्कळांचें पोट चालतें, त्याची जरी एकाच्याच तंत्रानें विल्हेवाट लागली तरी त्यांत काय बिघडलें ? ज्या भांडवलावर पुष्कळांचें पुष्कळ सुख अवलंबून आहे, त्याला धक्का लावणें महत्पाप आहे. त्या भांडवलामुळेंच जनसेवा शक्य होते हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

त्याचप्रमाणें तिसऱ्याही एका घटकाला फायदा मिळाला पाहिजे, असें फोर्डचें म्हणणें आहे. तो घटक म्हणजे गिऱ्हाईक होय; कारण प्रत्येक धंदा उत्पादक, कामगार व सामान्य जनता या तिघांनाही फायदेशीर असला पाहिजे. म्हणूनच अजमास केल्यापेक्षां जास्त नफा एका वर्षी शिल्लक राहिल्यामुळें, फोर्डनें तो सर्व, प्रत्येक गाडीच्या गिऱ्हाइकास ५० डॉलर याप्रमाणें, परत करून टाकला !

नोकरांबद्दल फोर्डला जरी इतकी कळकळ वाटत असली तरी तो आपल्या कारखान्यांत कामगार संघ ( Labour Unions ) निर्माण होऊं देत नाहीं. हत्यारें करणारे नोकर आपली संघटना करीत आहेत, असें पाहिल्याबरोबर त्यानें तें खातें बंद करून त्यांना हांकलून लावलें. पुढें तो प्रश्न नाहींसा झाल्यावर त्यांच्यापैकीं बहुतेकांना त्यानें परत घेतलें हा

भाग वेगळा; आणि खरें पाहिलें तर फोर्ड कारखान्यांत कामगार संघ (Labour Unions) स्थापन होण्याची आवश्यकताच नाहीं. कारण भर पूर पगार, कमी काम, नमुनेदार आरोग्य, सुखसोयींची रेलचेल, व पूर्ण सुरक्षितता इतक्या गोष्टी असल्यावर आणखी काय पाहिजे? बरें, चांगला कारागीर असला तर त्याला काम मिळण्याची खात्री असते; आणि कामावर असलेला मनुष्य एकदम कमी केला जात नाहीं. एका खात्यांत तो चालला नाहीं, तर दुसऱ्या खात्यांत, दुसऱ्या खात्यांत चालला नाहीं, तर तिसऱ्या खात्यांत, याप्रमाणें त्याची बदली करण्यांत येते. मुख्य व्यवस्थापकाच्या हुकुमाशिवाय कोणालाच कमी करण्यांत येत नाहीं. जो कोठेंही काम करण्याला लायक नाहीं, व ज्याची वागणूक उघड उघड शत्रूसारखी आहे, अशाच माणसाला कामावरून दूर करण्यांत येतें.

आपल्या नोकरांना सज्ञान करण्यासाठीं फोर्डनें पाठशाला स्थापन केल्या आहेत. त्यांत परदेशस्थ लोकांना व अमेरिकनांना, अशा दोघांनाही इंग्रजी लिहिणें, वाचणें, बोलणें, गणीत करणें हे तर विषय शिकविले जातातच, पण त्याबरोबरच काटकसरीच्या वागणुकीचे फायदेही समजावून दिले जातात. याचप्रमाणें आपल्या कुटुंबाविषयीं, समाजाविषयीं व देशाविषयीं काय कर्तव्य असतें, मालक व नोकर यांच्यांतील संबंध कसे असले पाहिजेत, शारीरिक स्वच्छता कशी राखली पाहिजे, समाजांत कसें वागलें पाहिजे, वगैरे लहान थोर सर्व विषयांवर सांगोपांग माहिती मिळते. हें सर्व ज्ञान देण्यांत फोर्डचा उद्देश एवढाच आहे कीं, प्रत्येकानें उत्तम नागरीक व्हावें. काम करणें म्हणजे हीनपणाचें ही कल्पना मावळून काम करीत राहण्यांतच भूषण व कल्याण आहे, ही कल्पना दृढ व्हावी, मनुष्याच्या अभिरुचीला उत्तम वळण लागावें, उत्पन्नापेक्षां जास्त खर्च करण्याची घातक संवय लागूं

नये, तर मिळविलेला पैसा अनाठायीं खर्च न करितां त्याचा योग्य व्यय करावा; वगैरे उच्च तत्त्वें शिकविण्याच्या हेतूनेंच फोर्डच्या शाळा अस्तित्वांत आल्या व आजही चालल्या आहेत.

या शाळेंत नऊ महिन्यांचा अभ्यासक्रम असतो, व जे परीक्षा उत्तीर्ण होतात त्यांना पदवीपत्रें मिळतात. याचा एवढा चांगला परिणाम झालेला आहे कीं, अमेरिकेंतील न्यायखात्यानें कायमची वसती करून रहाणाऱ्या माणसाला अवश्य असलेलें ज्ञान मिळालें आहे किंवा नाहीं, तें पहाण्यासाठीं परीक्षा घेण्याची भानगड न ठेवतां, या पदवी-पत्राला मान देऊन, त्या माणसाला कायम वसती करण्यास परवानगी देण्यांत यावी अशी शिफारस केली व ती सरकारानें मंजूरही केली आहे.

या शाळेप्रमाणें 'उमेदवारीची शाळा'ही काढण्यांत आलेली आहे. त्यांत हत्यारें बनविण्याचें कामही शिकविलें जातें. त्याचप्रमाणें 'हेन्री फोर्ड व्यापारी शाळा' म्हणून एक शाळा काढलेली आहे; त्यांत ज्यांना शिक्षण मिळण्याचा संभवच नाहीं, अशा पोरक्या मुलांना, किंवा विधवांच्या मुलांना घेण्यांत येतें. या शाळेंत मुलगा रूजू झाला कीं, त्याला दरवर्षाला १५० डॉलरची शिष्यवृत्ति मिळते ! मुलगा कामांत रुळला व लक्ष घालून शिकूं लागला, तर हळू हळू त्याची शिष्यवृत्ति चढत जाऊन वर्षाला नऊशें डॉलरपर्यंत सुद्धां होते. सर्व सुट्यांचा पगार मिळतो हें निराळें सांगणें नकोच.

पहिल्या पगाराच्या दिवशीं त्याला एक जादा डॉलर देण्यांत येतो. हा त्यानें बँकेंत ठेवावयाचा, आणि जोंपर्यंत आपलें बँकेचें पुस्तक हजर करून आपला हिशोब बरोबर आहे असें तो दाखवीत जाईल, तोंपर्यंत दर महिन्याच्या पगाराच्या वेळीं त्याला एक जादा डॉलर देण्यांत येतो. पहिल्यानें या शाळेंत

जेव्हां विद्यार्थ्यांना घेण्यांत येतें तेव्हां प्रत्येकाची शारीरिक तपासणी करून घेण्यांत येतें. कोणांत जर कांहीं रोग वगैरे आढळला, तर त्याला लगेच औषधोपचार सुरू करण्यांत येतो. त्याचप्रमाणें तो कोणतें काम करण्याला लायक आहे याचीही परीक्षा केली जाते.

प्रत्येक मुलाला एक आठवडा शाळेंतील वर्गांत, इंग्रजी-भाषा, बीजगणित, भूमिती, रेखाकला व रसायनशास्त्र यांचें शिक्षण मिळतें आणि दोन आठवडे शाळेच्या कारखान्यांत प्रत्यक्ष प्रयोगादाखल काम करून पहायला सांपडतें. त्याला अगदीं क्षुल्लक कामापासून कौशल्याच्या कामापर्यंत, सर्व तऱ्हेच्या कामांत निष्णात करून सोडण्यांत येतें व त्याच्या चौकस व शोधक बुद्धीला पूर्ण वाव दिला जातो.

शिक्षण संपूर्ण झाल्यावर, मोठमोठ्या पगारांच्या जागा राखून ठेवलेल्या असतात, त्यावर अशा मुलांची नेमणूक होते. त्यांच्या सामाजिक व नैतिक आचरणाबद्दल विशेष खबरदारी घेण्यांत येते. कित्येकदां मुलांच्या जातीला अनुसरून त्यांच्यांत भांडणें होतात; तेव्हां त्यांचें भांडण आपसांत मिटलें नाहीं, तर कुस्ती करण्याची परवानगी देण्यांत येते. एकदा अशा प्रकारच्या दोन मुलांची मारामारीपर्यंत पाळी आली. आपसांत समजूत होत नाहीं असें दिसतांच देखरेख करणाऱ्यानें त्यांना मोजे देऊन कोपऱ्यांत लढायला पाठवून दिलें. फक्त अट ही होती कीं, हें द्वंद्व संपल्यावर भांडणाचा मागमूसही उरतां कामा नये आणि रस्त्यांत किंवा इतरत्र एकमेकांनीं एकमेकांच्या अंगावर हात टाकतां कामा नये. शेवटीं याचा परिणाम असा झाला कीं, त्या दोघां मुलांची थोडी कुस्ती होऊन ते दोघे मित्र बनले.

सारांश प्रत्येक मनुष्याला आपल्या शरीराचा, मनाचा, बुद्धीचा व स्वभावाचा सर्वतोपरी विकास करून घेण्यासाठीं मदत देण्यांत येते. अशा

रीतीनें फोर्डचें व त्याच्या नोकराचे संबंध लक्षांत घेतले म्हणजे फोर्ड मनुष्यजातीचा हितकर्ता कसा आहे, तें चांगलें समजतें. ॲलन बेन्सन नांवाचा एक समाजसत्तावादी अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीं निवडणुकींत एकदां उभा होता. त्यानें फोर्डचे कारखाने पाहून जे उद्गार काढले आहेत, ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो,

" लोक त्याला कितीही नांवें ठेवोत, मला मात्र तसें करितां येत नाहीं. आजमितीला नोकरवर्गाच्या उद्धारासाठीं तो जितकी खटपट करीत आहे, तितकी कोणताही समाजसत्तावादी करीत नाहीं. त्याची विचारसरणी कशीही असो, वस्तुस्थिति काय आहे तें पहा म्हणजे झालें !" खरोखरच आहे; व्यासपीठावर उभें राहून तारस्वरानें सामान्य लोकांच्या किंवा गरीबगुरिबांच्या कल्याणाचीं व्याख्यानें देणारे कोरडे देशभक्त पायलीचे पन्नास सांपडतात; पण गाजावाजा न करितां खरें लोककल्याण करण्यासाठीं अहर्निश झटणारा लाखांचा पोशिंदा अत्यंत दुर्मीळ असतो !

---

## प्रकरण १४ वें.

# महायुद्ध आणि गरुडनौका.

अमेरिकेच्या यादवीयुद्धाच्या काळीं हेन्री फोर्ड लहान होता. त्या युद्धांतील वीरश्रीचीं वर्णनें ऐकून त्याच्या अंगावर रोमांच उभे रहात. पण युद्धांत होणाऱ्या प्राणहानीमुळें त्याला फार वाईट वाटे. युद्धाबद्दल उत्सुकता अशी त्याला कधींच वाटली नाहीं; उलट जसजसा तो मोठा झाला तसतसा युद्धाबद्दल एक प्रकारचा तिटकारा त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झाला. स्पॅनिश युद्ध झालें आणि युरोपांत इतर दुसरींही पुष्कळ युद्धें झालीं, पण त्या सर्वांचा परिणाम हेन्रीच्या मनावर फार विलक्षण झाला. पुढें रूसो-

जपानी युद्ध झालें, त्याच्याही गोष्टी त्यानें वाचल्या; पण युद्ध म्हणजे कालापव्यय, द्रव्यहानि, व मनुष्यहानी यापलीकडे कांहींच नाहीं, अशी त्याची ठाम समजूत झालेली होती. प्रथमतः भावनोत्कटत्वामुळें तो युद्धाच्या विरुद्ध असे, पण समजूं लागल्यावर युद्ध करणें खरोखरच पाप आहे, असें त्याचें ठाम मत झालें.

कारण युद्धामुळें सामान्य लोकांचें जें नुकसान होतें त्याला अंत नाहीं. तो म्हणतो, "जगांतील अत्यंत अनिष्ट उधळपट्टी कोणची असेल तर ती युद्ध ही होय." अगदीं लहानपणापासून कोणचीही गोष्ट व्यर्थ फुकट गेलेली हेन्रीला आवडत नसे. फुकट जाणारे श्रम वांचविण्यासाठीं त्यानें (ट्रॅक्टर) कृषियंत्र निर्माण केलें व मनुष्याच्या मानेवरचें जूं यंत्राच्या मानेवर ठेऊन दिलें. अशा प्रकृतीच्या माणसाला युद्धामुळें होणारें कालापहरण, शक्तीचा नाश, मालमत्तेची जाळपोळ व प्राणहानी—या गोष्टी कशा रुचणार ?

फोर्ड म्हणतो, "युद्ध करून युद्धाचा शेवट लावणें कधींही शक्य नाहीं. असें करणें म्हणजे आग विझविण्यासाठीं वणवा पेटविण्याप्रमाणें आहे. परंतु हल्लींची सुधारणाच अशा विचित्र स्वरूपाची आहे कीं, राष्ट्राराष्ट्रांतील प्रश्न सुखासमाधानानें सुटत नाहींत. वास्तविक, युद्धानें म्हणजे ते प्रश्न सुटतात, असें मुळींच नाहीं. फक्त युद्धांत दमून गेल्यामुळें त्या प्रश्नांचा विचार करण्यासारखी त्यांची मनःस्थिति तयार होते इतकेंच !"

१९१४ सालच्या उन्हाळ्यांत महायुद्धाचा वणवा पेटला. प्रेसिडेंट विल्सन यांनीं या युद्धापासून अमेरिका सर्वस्वीं अलिप्त राहील असें जाहीर केलें; पण तसें होणें शक्य नव्हतें. कांहीं लोकांचा ओढा जर्मनीकडे होता, तर पुष्कळांचा दोस्तराष्ट्रांकडे होता. शिवाय अमेरिकेंतील

माणसांची प्रवृत्ति जरी युद्धानुकूल नसली, व युद्ध म्हणजे एक युरोपची बाब आहे, असें जरी त्यांना वाटत असलें, तरी त्या महायुद्धामुळें अमेरिकेच्या व्यापाराला जेव्हां खो बसूं लागला, तेव्हां इतर जगाहून सर्वस्वीं तुटून रहाणें आपणालाही शक्य नाहीं, हें अमेरिकनांच्या चांगलें लक्षांत आलें

थोडक्याच दिवसांत व्यापाराचें पारडें बदललें; तें इतकें कीं, युद्धांत समाविष्ट झालेलीं सर्व राष्ट्रें सर्व तऱ्हेच्या मालाची मागणी अमेरिकेकडे करूं लागलीं, व पैसा पाण्याच्या लोंढयाप्रमाणें अमेरिकेंत येऊन ओतूं लागला. खाद्य पदार्थ व दारुगोळा यांची मागणी ज्याप्रमाणें जोरांत होती त्याचप्रमाणें मोटारगाड्यांची मागणीही विशेष होती.

पण युद्धापासून मुळींच फायदा मिळवावयाचा नाहीं, असा निश्चय करून कोणत्याही राष्ट्राची युद्धोपयोगी सामान पुरविण्याची मागणी फोर्डनें स्वीकारण्याचें नाकारिलें. कंपनीला वारंवार मागणी पुरविण्याबद्दल आग्रह होत असूनसुद्धां, कंपनी मागणी पुरविण्याचें कां नाकारीत आहे, हें गौड-बंगाल कंपनीच्या अडत्यांना मुळींच उकलेना. फोर्ड आपल्या ध्येयाला इतका चिकटून बसेल, हें त्यांच्या स्वप्नांतदेखील आलें नाहीं. फोर्ड म्हणे, "या कारखान्यांत मी आपलें सर्व जीवित घातलें आहे. परंतु युद्धाकरितां दारुगोळा तयार करण्यासाठीं जर याचा उपयोग व्हाव-याचा असेल, तर त्याची विटान् विट पाडून त्याचा विध्वंस केल्याशिवाय मी कधींही रहाणार नाहीं !" महायुद्धाची मागणी नाकारण्याचें कारण सांग-तांना तो म्हणाला, "मला वाटलें असतें, तर या युद्धापासून कल्पनातीत फायदा मिळवून मी कुबेरालाही लाजविलें असतें; पण अशा रीतीनें कायेनें, वाचेनें किंवा मनानें युद्धांतील मनुष्यसंहाराला मदत करण्यापेक्षां भणंग भिकारी होऊन मेलेलें काय वाईट ?"

जसजशी महायुद्धाची धुमश्चक्री वाढत होती, तसतसा महायुद्धाचा शेवट कधीं होईल तो सुदिन, अशी त्याला तळमळ लागली होती. कांहीं शांतताप्रिय लोक युरोपला जाऊन मध्यस्थी करून महायुद्धाची इती श्री घडवून आणावी, अशा विचारांत होते. १९१५ सालीं फोर्डनें या मंडळीचें धुरिणत्व पत्करावें, म्हणून त्यांनीं त्याला विनंती केली. प्रथम त्याच्या मनांत ही गोष्ट करावी असें नव्हतें, पण वाशिंग्टनला गेल्यावर त्याचा बेत बदलला, व त्यानें युरोपला जाण्याचा निश्चय आपल्या वायकोला ध्वनि-वाहकानेंच कळविला.

शांतता प्रस्थापित करण्याच्या इराद्यानें युरोपला जाणाऱ्या लोकांच्या प्रवासाला लागणाऱ्या खर्चाची हमी फोर्डनें घेतली, त्यासाठीं एक जहाजही तयार केलें, व या मंडळीत [illegible] मिळण्यासाठीं त्यानें कित्येकांना निमंत्रणेंही पाठविलीं. आपल्या नेहमींच्या उत्साहानें व धडाडीनें फोर्डनें हें काम आपल्या शिरावर घेतलें. "नाताळ सुरू होण्यापूर्वीं सैनिकांना खंदकांबाहेर काढीन" अशी त्याला उमेद होती. मनुष्यांचा संहार बंद करण्याची भावना त्याच्या ठिकाणीं अत्यंत प्रबळ असल्यामुळें, त्या गोष्टीचा सांगोपांग विचार न करितांच त्यानें या कार्यांत उडी घातली. या कृत्यांत यश येणार नाहीं, म्हणून पुष्कळ मित्रांनीं त्याला सांगितलें; पण तो कोणाचेंही न ऐकतां म्हणाला, "सर्व जग युद्धाच्या मागें लागलें आहे, अशाच वेळीं कोणीतरी शांततेचा विचार केलाच पाहिजे."

झालें! "२ रें ओस्का" नांवाचें शांतताजहाज न्यूयार्क येथून ४ डिसेंबर १९१६ ला निघालें. त्यावर फोर्डसकट १४९ उतारू होते. त्यांपैकीं ५४ वर्तमानपत्रें व मासिकें यांचे बातमीदार होते, व ३० कॉलेजचे विद्यार्थी होते. विशेष महत्वाचे लोक म्हणजे चार्लस एक-एक्ड,

डॉ. विल्फ्रेड ग्रेनफेल, आणि जज्ज बेन लिंडसे हे होते. परंतु फोर्डची प्रकृती नादुरुस्त झाल्यामुळें ख्रिश्चियाना या ठिकाणीं त्याला उतरणें भाग पडलें. शांतता स्थापन करण्यासाठीं निघालेल्या मंडळीचें एकमत न झाल्यानें त्यांना कितपत यश आलें हें सांगण्याची जरूरीच नाहीं. प्रवास करण्या-इतकी ताकद अंगांत आल्याबरोबर फोर्ड मात्र अमेरिकेला परत आला.

फोर्डनें शांततेचें काम हातीं घेतलें, तेव्हांच त्याच्यावर टीकेचा भडिमार झाला होता, व त्याला सर्वजण हंसले होते. डॉन क्विझोटप्रमाणें फोर्ड अशक्य गोष्टींच्या मागें लागून बहकलेला आहे, व शेवटीं फजित पावल्याशिवाय राहणार नाहीं, असें पुष्कळांनीं भाकित केलें होतें; पण आपल्या कार्याबद्दल त्याला जी कळकळ वाटत होती तितकी कळकळ वाळगणारा मनुष्य अन्यत्र क्वचितच सांपडला असता.

फोर्ड युरोपला जावयाला निघाला त्या वेळीं किती तरी तरूण दिसे, पण परत आला त्या वेळीं त्याचे केंस पिकूं लागून वृद्धावस्थेची ध्वजा त्याच्या मस्तकावर फडकूं लागली होती. त्या आजारामुळें त्याचें नेहेमींचें स्मितही फार कमी झालें. जर्मनीच्या लष्करी सामर्थ्याचा पाडाव झाल्या-शिवाय शांतता होणें शक्य नाहीं, हें त्याला पूर्णपणें कळून चुकलें. युद्धासाठीं अमेरिकेनें सैन्याची किंवा नौकादलाची भरती करूं नये, असें त्याला वाटे; पण प्रसंग पडला तर अंतर्व्यवस्था ठीक राखून अन्नवस्त्राची तूट पडूं न देण्याची खबरदारी सरकारानें घ्यावी असेंही त्याला वाटे. राजकारणांत आजपर्यंत फोर्ड कोणत्याच पक्षाला चिकटून रहात नसे. तो खरा लोकपक्षीय होता म्हटलें तरी चालेल. पण अध्यक्ष विल्सन यांच्या कारकीर्दीमुळें तो खुष होऊन गेला होता; तेव्हां त्यांची फेर निवड-णूक व्हावी म्हणून त्यानें फार खटपट केली. फक्त लष्कराची व आरमा-

राची जय्यत तयारी ठेवण्याचें विल्सनचें धोरण त्याला मान्य नव्हतें, व तसें तो बोलूनही दाखवी.

राज्यकारभारांत एकादी मोठ्या मानाची जागा लाभावी असा लोभ त्याला कधींच झाला नाहीं. १९१४ त मिचिगनच्या अधिपती ( गव्हर्नर )च्या जागेसाठीं त्याचें नांव जेव्हां सुचविण्यांत आलें, तेव्हां तो म्हणाला, " राजकीय घडामोडींत पडण्याची माझी इच्छा नाहीं व कोणत्याही पक्षाला सामील होण्याचा माझा विचार नाहीं. अध्यक्षाच्या पदवीचासुद्धां मला लोभ नाहीं. मी माझें सर्व जीवित कारखान्याला वाहिलेलें आहे, व कोणत्याही पक्षाला मला माझ्या कारखान्यांतून काढून नेतां येणें शक्य नाहीं. "

१९१६ त त्याच्या विरोधाला न जुमानतां, त्याला लोकांनीं निवडून दिलें. सिनेटर अल्बर्ट कमिनिससारख्या वजनदार माणसालाही त्याच्या इतकीं मतें मिळालीं नाहींत. राजकारणी पुरुष आश्चर्यानें थक्क झाले. युद्धसिद्धतेच्या अगदीं विरुद्ध असणाऱ्या व राजकारणांत लक्ष न घालणाऱ्या माणसाला लोकांनीं निवडून द्यावें एवढें फोर्डजवळ काय आहे, याचा त्यांना उलगडा होईना. याचें कारण कांहीं असलें, तरी एवढें खरें कीं, अमेरिकेंत जे दोघे तिघे अत्यंत मोठे लोकप्रिय गृहस्थ होते त्यांच्यांत फोर्डचा अंतर्भाव होत असे.

फोर्डला निवडणुकींत यश मिळाल्याबद्दल विशेष असें कांहींच वाटलें नाहीं. निकाल जाहीर होतांच वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी त्याची मुलाखत घेण्यासाठीं त्याच्याकडे आले, तेव्हां तो म्हणाला, " एवढें जाहीर करा कीं, मला हा क्षण म्हणजे निव्वळ थट्टेचा वाटत आहे. थट्टा करणें हेंसुद्धां महत्वाचें असतें, व कुणाची थट्टा करावयाची हा प्रश्नसुद्धां फार महत्वाचा

आहे." आपण अध्यक्षपद घ्यावयाचें नाहीं, असा त्याचा निर्धार झालेलाच होता व म्हणून त्यानें विलसनलाच मदत करण्याचें ठरविलें.

या सुमारास संयुक्त संस्थानें व मेक्सिको यांच्यांतील लढा विकोपाला गेला होता, व संयुक्त राष्ट्रांकडून मध्यस्ती केली जाऊन तो लढा मिटवावा असें पुष्कळांना वाटत होतें. पण फोर्ड या धोरणाविरुद्ध असल्यामुळें बरेच लोक उघड उघड त्याचा द्वेष करूं लागले. त्याच्या भाषणाचा विपर्यास करून, व मुद्दाम खोट्या गोष्टी पसरवून त्याच्या नांवाला बट्टा लावण्याचा जणूंकाय कांहीं लोकांनीं विडाच उचलला होता. उदाहरणार्थ, राष्ट्रीय हांकेबरोबर त्याचे जे नोकर युद्धक्षेत्राच्या सीमेवर गेले, त्यांना त्यानें कामावरून कमी केले, असें उठविण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट होती. त्या नोकरांच्या जागा रिकाम्या ठेऊन, ते आल्यावर तो त्यांना त्या देणार होता; एवढेंच नव्हे, तर मध्यंतरींच्या काळांत त्यांच्या बायकामुलांना मदत करण्याससुद्धां त्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं; पण निंदकांना त्याचें काय होय ?

जर्मनीचा पक्षपात करणाऱ्या 'शिकागो' नामक वर्तमानपत्रानें तर फोर्ड बंडाळी करणारा बंडखोर आहे, असा त्याच्यावर आरोप केला. फोर्डनें त्याला चांगला हात दाखविण्याचा निश्चय करून त्या पत्रावर अब्रु-नुकसानीची फिर्याद लावली, व दहा लाख डॉलरची मागणी केली. या फिर्यादीचा निकाल १९१९ सालीं होऊन शिकागो ट्रिब्युनलच्या पदरांत दोषाचें माप पुरेपुर पडलें, व त्याला नुकसानभरपाई करून द्यावी लागली.

१९१७ च्या फेब्रुवारींत युद्धांत पाणबोटींचा उपयोग सरसकट करणार असें जर्मनीनें जाहीर केलें, तेव्हां अध्यक्ष विल्सन यांनीं जर्मनींतील आपल्या वकिलाला परत बोलावून, आपल्याकडील जर्मन वकिलाला

निरोप दिला; आणि कॉंग्रेसला त्याप्रमाणें त्यांनीं कळविलें. दोन दिवसांनंतर फोर्ड वॉशिंग्टन येथें गेला, तेव्हां चिटणीस यांनीं दिलेल्या मेजवानीस हजर राहिला होता. त्या वेळची हकीकत त्या चिटणिसाच्या बायकोनें सांगितली ती अशी:—" माझ्या उजव्या बाजूला अध्यक्ष बसले होते, व शांततेसाठीं इतकी जिवापाड मेहनत करणारे फोर्ड माझ्या डाव्या बाजूस बसले होते. भोजन होत असतां फोर्ड म्हणाले, 'अध्यक्षमहाराज, आज मी आरमार खात्याच्या चिटणिसांच्या भेटीला गेलों होतों, त्या वेळीं जें लागेल तें युद्धोपयोगी सामान तयार करण्यास माझ्या कारखान्याचा उपयोग करून घ्यावा, अशी मी त्यांना विनंती केली आहे." एवढ्यांवरच न थांबतां फोर्डनें सर्व तऱ्हेची मदत देशाला केली, यत्किंचितही मोबदला न घेतां त्यानें आपले कारखाने सरकारच्या हवालीं केले व बिनव्याजानें आपली सर्व संपत्ति सरकारास वापरण्यासाठीं देण्यास तो कबूल झाला. " संयुक्त-संस्थानावर जर कोणी चाल करून आला तर आपण जोराचें युद्ध केल्याशिवाय रहाणार नाहीं. " असेंही तो म्हणाला. आणि नुसतें बोलूनच न रहातां फोर्ड मोटार कंपनीचा त्यानें स्वराष्ट्रास शक्य तेवढा उपयोग करू दिला. तो म्हणाला, " युद्धकालांत कोणत्याही सरकारापासून कसल्याही मालांत मी फायदा कमविणार नाहीं. कारण युद्धापासून पैसा कमविणाऱ्या नफेबाजाबद्दल मला मुळींच आदर वाटत नाहीं. "

फोर्ड मोटार कंपनीनें किती तऱ्हेनें स्वदेशसेवा केली, याचा समग्र इतिहास लिहिणें म्हणजे एक पुस्तकच लिहिण्यासारखें आहे. " स्वातंत्र्य-रथ " नांवाची एक मोटार युद्धासाठीं केवळ २० डॉलरला देण्याचा त्यानें करार केला होता, पण आपल्या तैलबुद्धीचा कार्ल एम्डेशाच्या बुद्धीशीं मिलाफ करून त्यानें त्या गाडीची किंमत आणखी उतरविली, व ती पद्धत इतर कारखानदारांनाही शिकविली. याशिवाय तोफांच्या

उपयोगाचें सामान, खंदकांत लढणाऱ्या शिपायांना लागणारीं शिरस्त्राणें वगैरे ज्या युद्धोपयोगी जिनसा थोड्या खर्चांत फोर्ड कंपनीनें करून दिल्या त्यांची गणतीच नाहीं.

सर्वांत महत्वाची बाब म्हटली म्हणजे फोर्ड कंपनीनें बांधलेली "गरूड-नौका" होय. तिला लगेच "सागरसंचारिणी" असें नांव पडलें. या नौकेची कल्पना निघाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत ती जलसंचार करूं लागली. जर्मन पाणबोटींचा धुमाकूळ सुरू झाला, तेव्हां तोडीस तोड म्हणून '११०' नांवाची बोट अमेरिका उपयोगांत आणूं लागली; पण ती लांकडाची असल्यामुळें फार भिजे, व व्हावें तेवढें काम होईना; म्हणून नौकाशास्त्रज्ञांनीं 'गरूडनौका' शोधून काढली, व तिची रचना कशी असावी तें ठरविलें. १९१८ च्या जानेवारींत ही कल्पना निघाल्याबरोबर तीन आठवड्यांच्या आंत नमुन्यादाखल एक 'गरूडनौका' बनवून वार्शिग्टन येथील आरमारी जलप्रांतांत ती कशी काय चालते, याची परीक्षा करण्यांत आली व ती कल्पनेबाहेर यशस्वी ठरली! कल्पनेप्रमाणें नमुना तयार झाला खरा, पण अशा गरूडनौका एकदम शेकडोंशें तयार कोण करणार? जहाजें बांधणाऱ्या प्रत्येक कार-खानदारानें ही गोष्ट अशक्यतेमुळें आपल्याच्यानें होणार नाहीं म्हणून सांगितलें. 'कल्पना फार उत्तम आहे; पण शेकडोंशें नौका अशा रीतीनें भराभर बांधतां येतील हें संभवत नाहीं, हें एकच उत्तर सर्वजण देत.

फेब्रुवारी महिन्यांत फोर्डला भेटण्यासाठीं चिटणीस डॅनिएल आले होते; तेव्हां ते म्हणाले, "आमच्यासाठीं तुम्हांला एवढ्या गरूडनौका बांधून देतां येऊं नयेत म्हणजे मोठें आश्चर्य आहे बुवा!" फोर्डनें त्या 'रचना-कृती' (Plan) वरून एकदां सूक्ष्मरीतीनें नजर फिरविली व तो म्हणाला, "मला वाटतें, मी बांधून देऊं शकेन."

" किती लवकर द्याल ?"

" आपणाला किती लवकर पाहिजेत ?"

" या उन्हाळ्यांत द्यायला सुरवात करून पुढच्या वर्षाच्या आंत एकशें गरूडनौका आमच्याकडे आल्या पाहिजेत."

वाचकहो, फोर्डनें दिलेलें उत्तर ऐकण्यापूर्वी केवढें प्रचंड व जबाबदारीचें हें काम होतें, याची कल्पना करा. अजून जहाजें बांधण्याचा कारखाना उभारायचा होता ! अशा कारखान्याकरितां जागा शोधण्यापासून सुरवात करावयाची होती ! अशा रीतीच्या गरूडनौका बांधण्यासाठीं यंत्रसामुग्री निर्माण करून हत्यारेंही बनवावयाचीं होतीं ! आणि इतकें सगळें करून चार महिन्यांच्या मुदतींत दररोज एकेक नौका बांधून द्यायला लागायचें होतें !! परंतु अज्ञात व अगाध अशा कर्तव्यार्णवांत उडी घ्यावयाला फोर्ड कधींच कचरत नसे, आणि मानवाच्या कर्तृत्वसिद्धीला पायबंद घातलेला त्याला मुळींच पटत नसे. त्यानें तत्काळ उत्तर दिलें,

" ठीक आहे, मी बांधून देतों."

ह्या नवीन कारखान्यासाठीं फोर्डनें मनांत आणिलेली जागा रिव्हररूज येथें होती, पण ती फार दलदलीची होती; शिवाय फोर्डनें शिरावर घेतलेलें कार्य 'भीमकार्य' असल्यामुळें " फोर्ड एकदां केव्हांतरी चांगलाच आदळला जाणार आहे" असें लोक म्हणूं लागले.

संयुक्त संस्थानाकरितां शंभर व इटलीकरितां बारा 'गरूडनौका' बांधून देण्याच्या करारावर ता. १५ फेब्रुवारी १९१८ शुक्रवार रोजीं फोर्डनें सही करून दिली. तावडतोब डिट्रॉटशीं ध्वनिवाहकानें ( Telephone ) बोलून दुसरे दिवशीं सामानाची भरती करण्यास त्यानें सुरवात केली. रविवारीं मोजणीदारांनीं पाहणी करून सोमवारीं इमारतीचा पाया खोदा-

यला आरंभ झाला. अशा रीतीनें सर्व काम इतक्या झपाट्यानें व तांतडीनें उरकण्यांत आलें कीं, तीन महिन्याच्या आंत सर्व कारखाना बांधून तयार झाला. या अवाढव्य राक्षसी कामाची कल्पना शब्दचित्रानें येणें अशक्य आहे. पंचवीस हजार घनयार्डांचें कॉंक्रीटचें काम, चार हजार टनांपेक्षांही जास्त पोलादरचनेचें काम, ३५ लाख चौरस फुटांचें लाकडी, व १० लाख चौरस फुटाचें वीटकाम व्हायचें, म्हणजे कांहीं तोंडच्या बाता नाहींत ! सर्व कामाला २० लाख डॉलर खर्च आला.

या कारखान्यांत एक भलें जंगी दालन असून आजूबाजूला बऱ्याच इमारती आहेत. एका बाजूनें पोलाद वगैरे सामानाची आयात होते, तर दुसऱ्या बाजूनें गरूडनौका पूर्णावस्थेंत बाहेर पडते. या ठिकाणीं फोर्डनें भट्टीचें कामच शिल्लक ठेविलें नाहीं ! प्रत्येक भाग दाबून तयार करण्यांत येतो, व यंत्रसाह्यानें ४०–५० भाग एकदम कापून तयार होऊन पडतात ! ही उत्तम कल्पना यापूर्वीं कोणीच अमलांत आणिली नव्हती !

मध्यभागीं असलेल्या काचगृहांत गरुडनौकेची बांधणी करण्यांत येते, व सर्व काम फोर्डरथाप्रमाणें नमुनेदार पद्धतीनें झटपट करून टाकण्यांत येतें. अशी तयार झालेली नौका कॉंक्रीटच्या भिंतीवर उभारलेल्या धक्या-वर नेण्यांत येऊन, तेथून विजेच्या साहाय्यानें गोदींत नेऊन, ती सवाग-सिद्ध करण्यांत येते. गरूडनौकेची लांबी २०४ फूट, रुंदी २५ फूट असून, ती आठ फूट पाणी घेते. तीन हजार अश्वशक्तीच्या तैलयंत्रानें ती चालविली जाते. ॲटलँटिक महासागर ओलांडून जाण्यापुरेसें जळण तिच्यांत मावतें. ती सर्व धातुमय असून तिचें वजन ५५० टन होतें. तिच्यांत अधिकारी व खलाशी मिळून ६७ माणसांना पुरेशा खोल्या असतात. तिच्या-वर ४ इंचाच्या दोन व ३ इंचाची एक, अशा तीन तोफा असतात.

पहिली गरूडनौका जुलई १९१८ त तयार झाली; व आक्टोबर १० ला तपासणी होऊन तिची कामावर रवानगी करण्यांत आली. नव्हेंबर-मध्यें दोन नौका तयार झाल्या. इतक्यांत युद्ध तहकुबीच्या सह्या झाल्यामुळें इतलीच्या बारा व संयुक्तसंस्थानच्या ४० अशा बावन नौकांचा करार-नामा रद्द करण्यांत आला. आतां फक्त ५७ नौका करावयाच्या होत्या. त्या सर्व १९१९ च्या आगस्ट महिन्यापर्यंत तयार झाल्या. सामान आल्यापासून नौका तयार होण्यास कमींत कमी दहा दिवसांची अवधी लागे; व एका महिन्यांत २३ नौका बांधून होत. युद्धाचा शेवट झाल्या-मुळें दररोज एक नौका तयार करण्याचा मनोदय पूर्ण झाला नाहीं त्याला इलाज नाहीं. त्या ६० गरुडनौकांना तीन कोटी ३० लाख डॉलर खर्च आला. याप्रमाणें 'असाध्य तें साध्य करितां सायास' ही म्हण फोर्डनें खरी करून दाखविली. याला म्हणतात उद्योग आणि कर्तृत्व ! कोणत्याही प्रसंगीं मदतीला फोर्ड धाऊन आला नाहीं असें झालेंच नाहीं. उद्योग-परीक्षक म्हणून विल्सननें जे दहा लोक निवडले त्यांत फोर्डचें नांव अग्रभागीं घातलें होतें.

यावरून असें कोणी समजूं नये कीं, फोर्डला युद्धाची आवड उत्पन्न झाली होती. शांततेच्या ध्येयाला तो पूर्णपणें विलगून बसलेला होता, व हें महायुद्ध अखेरचेंच ठरो अशी त्याची सदिच्छा होती. तो म्हणतो, "मनुष्यजातीचा संहार करणाऱ्या युद्धाचा मी निषेधच करतों. माझें युद्धाबद्दल पूर्वींचें जें मत होतें तेंच कायम आहे. युद्धाचा नायनाट व्हावा म्हणूनच लढावें लागलें तर मी लढतों. युद्धाशिवाय शांतता नांदणेंच शक्य नाहीं, असें दिसून आल्यास मग मात्र युद्धाचा शेवट लागण्यासाठीं जिवापाड युद्ध केल्याशिवाय आम्ही रहाणार नाहीं हें जगाच्या निदर्शनास आणल्या-शिवाय माझ्यानें रहावत नाहीं."

या युद्धकालांतच संयुक्तसंस्थानांच्या सीनेटच्या निवडणुकी उपस्थित झाल्या. तेव्हां डिमोक्रॅटिक व रिपब्लिक अशा दोन्ही पक्षांनीं फोर्डनें आपल्या वतीनें उभें रहावें म्हणून खटपट केली व त्याच्या इच्छेविरुद्ध त्याचें नांव आपापल्या यादींत घातलें. परंतु अध्यक्ष विल्सन याचा सहाय्य-कर्ता म्हणून आम्ही तुम्हाला निवडून देणार आहोंत, असें डिमोक्रॅट पक्षाच्या लोकांनीं गळ घातल्यामुळें व अध्यक्ष विल्सन यांनाही फोर्डच्या मदतीची अपेक्षा असल्यामुळें फोर्डनें डिमोक्रॅट पक्षाच्या वतीनें उभें राह-ण्याचें कबूल केलें. पण त्यानें कळविलें कीं, " माझ्या निवडणुकीसाठीं मी कुठें जाणार नाहीं, किंवा भाषण करणार नाहीं, किंवा एक डॉलरही खर्च करणार नाहीं."

त्यानें अध्यक्ष विल्सन यांना मदत द्यायची ठरविल्यामुळें अर्थातच रिपब्लिक मुत्सद्यांनीं त्याला नाकारलें; व न्यूबेरी नांवाच्या एका गृहस्थाला त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून त्यांनीं उभें केलें. निवडणुकींत एकदां पडल्यावर यश मिळावें अशी फोर्डची सहाजिकच इच्छा होती. युद्धांत जय मिळावा व भविष्यकाळीं युद्धें होऊं नयेत एवढ्यासाठीं खटपट करण्याकरितांच त्याला सीनेटमध्यें निवडून यावयाचें होतें. राष्ट्रैक्य संस्थे ( League of nations ) ची कल्पना त्याला फार पसंत पडली होती. पाशवी शक्तीपेक्षां न्यायास-नासमोरच सर्व राष्ट्रांचे झगडे मिटावे असें त्याला वाटे. तो म्हणे, "कुंपणाबद्दल दोघां शेजाऱ्यांचा तंटा झाला, तर एक चार गुंड जमा करून आपल्या शेजाऱ्याचें डोकें फोडतो असें कधीं तरी होतें का ? तो न्यायासना-समोर दाद मागतो व त्याचें गाऱ्हाणें वाजवी असेल तर दूर होतें. मिचि-गन किंवा न्यूयॉर्क यांच्यांत मतभेद नाहींत असें थोडेंच आहे ? पण कोण-त्याही संस्थानाचे नागरीक हातांत तोफा बंदुका घेऊन दुसऱ्या संस्था-नांतील लोकांवर चाल करीत नाहींत, तर मध्यवर्ती श्रेष्ठ न्यायासनाचा

निकाल मान्य करून आपापले व्यवहार करितात. हें जर शक्य व खरें आहे, तर जगांतील राष्ट्राराष्ट्रांतच युद्धें कां व्हावींत? दोन शेजाऱ्यांप्रमाणें जगन्मान्य न्यायसभेपुढें आपलीं गाऱ्हाणीं मांडून निकाल लाऊन घेण्यास त्यांस काय हरकत आहे?"

प्रथमतः फोर्डला निवडणुकींत यश मिळेल असा बराच रंग दिसत होता. पण विरुद्ध बाजूच्या लोकांनीं त्याच्या विरुद्ध वाटेल त्या कंड्या पिकवून त्याची बदनामी करण्यास सुरवात केली. कोणी म्हणायला लागले कीं, 'तो जर्मनांच्या पक्षाचा आहे, व म्हणूनच युद्ध थांबण्याची खटपट करीत आहे.' या सगळ्यापेक्षां एका जाहिरातीचा परिणाम फार झाला. त्यांत फोर्डवर तर ताशेरा उडविला होताच, पण तो शत्रुपक्षीय लोकांना थारा देतो असेंही म्हटलें होतें. व त्यांत कार्लएम्डेच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख केला होता. वास्तविक हें सर्व बनावट होतें. कार्लएम्डे हा मूळचा जर्मन खरा, पण अमेरिकेचा तो कायमचा रहिवाशी झाला होता, व आपल्या नूतन राष्ट्राशीं तो अत्यंत एकनिष्ठपणानें वागतही होता. याचें उत्तम उदाहरण म्हणजे त्यानें (लिबर्टी मोटार) स्वातंत्र्यरथाच्या रचनेविषयीं केलेली सेवा हेंच होय. वरील जाहिरातीला उत्तरही तयार केलें गेलें होतें, पण कार्लएम्डेची भेट घेऊन त्याची समजूत करण्याकडे फोर्डचें सारें लक्ष असल्यामुळें त्यानें तें उत्तर लवकर वाचलें नाहीं व त्यामुळें तें लवकर प्रसिद्ध करतां आलें नाहीं. शेवटीं निवडणुकीचा दिवस येऊन ठेपला आणि पुष्कळ लोकांनीं केवळ गैरसमजुतीला बळी पडून न्यूबेरीला निवडून दिलें.

अर्थात् फोर्डला थोडें वाईट वाटलें. पण त्याची सदसद्विवेकबुद्धी अगदीं निर्दोष होती. आपल्यावर केलेल्या आरोपाबद्दलही त्याला जरा वाईट वाटलें; परंतु राजकीय उलाढालींत पडल्यावर अशा गोष्टीला मनुष्यानें

तयार असलेंच पाहिजे, अशी त्यानें आपल्या मनाची समजूत घातली. डामरांत हात घातल्यावर तो काळा झाला नाहीं तरच नवल !

---

प्रकरण पंधरावें.

## उत्पत्ति, कृति आणि गति

उतारवयांत तरी हरि हरि करीत स्वस्थ विश्रांति घ्यावी असें फोर्डला वाटत असेल, अशी जर कोणाची समजूत असली तर ती साफ चुकीची आहे. इतकीं वर्षें एकसारखी दगदग करूनदेखील कामाचा त्याला कंटाळा आलेला नाहीं. तो म्हणतो, "रूपांतर होण्याइतका मनुष्य जर म्हातारा झाला तर मेलेलेंच बरें." फोर्ड मरावयाला अद्यापि तयार नाहीं, व आपला उद्योग सोडायलाही सिद्ध नाहीं. स्वस्थ बसून त्याच्या मनाला चैनच पडणार नाहीं. विश्रांति न घेतां, न थांबतां, न दमतां एकसारखें श्रम करीत रहाण्यानेंच त्याला अधिक आनंद वाटतो. लोकांची सेवा करणें हाच छंद त्याला लागलेला आहे. यंत्रशक्तीच्या साह्यानें वाटेल तें घडेल असा त्याचा विश्वास आहे. या यंत्रशक्तीनें निसर्गावर मनुष्याला मात करतां येईल, असा त्याला जबरदस्त आत्मविश्वास वाटत आहे.

त्याचप्रमाणें यंत्रशक्तीमुळें अजून मानव जातीचें जरी पुष्कळ कल्याण व्हायचें असलें तरी अजून पुष्कळ सुधारणा झाल्या पाहिजेत, हेंही तो जाणतो. आज जगांत काम भरपूर आहे, व काम करणारे लोकही हवे तेवढे आहेत. पण कामाचा व कामकऱ्यांचा संयोग झालेला नाहीं. त्याच्या मताप्रमाणें ही नूतन परिस्थिति निर्माण व्हावयला मोठ्या थोरल्या क्रांतीची जरूर आहे, असें मुळींच नाहीं. किंवा ती राजकीय घडामोड

होऊनही साधेल असेंही नाहीं. तर यंत्रशक्तीचा उपयोग करून घेणाऱ्या तज्ज्ञांचा तो एक प्रश्न आहे असें त्याचें मत आहे.

तो म्हणतो, " आयुष्याचे मूलभूत धंदे तीन प्रकारचे आहेत. उत्पन्न करणें, तयार करणें व वाहून नेणें. शेतकी, कारागिरी व वहातुक या त्रयीवरच सर्व जगाची सुधारणा अवलंबून आहे, व प्रत्येक कामांत मनुष्याला आपला देह फार झिजवावा लागतो. तेव्हां सर्वत्र होतां होईल तों यंत्रशक्तीच्या साहाय्यानें काम करितां आल्यास मनुष्यजातीचें अधिक कल्याण होणार आहे." अर्थात्, शेतकींत क्रांति घडून आल्यास जगाचें रूप पालटेल यांत मुळींच शंका नाहीं. मात्र शेतकीला उद्योगधंद्याच्या वळणावर नेलें पाहिजे. या कामाला आतांपर्यंत कृषियंत्र अश्वहीन रथ मोटार, गॅसयंत्र वगैरे निर्माण करून फोर्डनें चालना दिलीच आहे व आपल्या डियरबोर्न येथील शेतावर सर्व नवीन उपकरणांचा उपयोग करून लोकांना त्यांची उपयुक्तता तो सिद्ध करून देत आहे. अगदीं नवीन तऱ्हेचीं शेतकीचीं हत्यारें बनविण्याची त्याची खटपट सुरू आहे. १८८१ सालीं ज्या प्रकारची कापणीची कोयती त्याच्या बापानें विकत घेतली होती तसलीच त्यालाही १९२० सालीं घ्यावी लागली. फरक इतकाच कीं, त्या दोहोंपैकीं त्याच्या बापाचीच कोयती चांगली होती !

शेतावर गुरांची जितकी कमी गरज लागेल तितकी लागावी म्हणून फोर्डचा प्रयत्न चालू आहे. ट्रॅक्टर कृषियंत्र निर्माण करून घोड्यांची गरज तर त्यानें कमी केलीच आहे; पण तो पाण्यापासूनही काम करून घेत आहे. रूज नदीच्या पाण्यावर तर ३०० अश्वशक्ति उत्पन्न करीतच आहे, पण ज्या ठिकाणीं पाणी नसेल त्या ठिकाणीं गॅसोलीनच्या साह्यानें ही शक्ति निर्माण केली आहे. आतां कोणी असें विचारील कीं, गॅसोलीन किती दिवस पुरेल ? तर त्याला उत्तर एवढेंच कीं, पुढें गॅसोलीनची जागा अल्कोहोल

घेईल, व मिचिगनच्या एका एकरांत निघणाऱ्या वटाद्यांमधून इतकें अल्कोहोल काढतां येईल कीं, तें शंभर वर्षेपर्यंत त्या एकरांची नांगरणी करण्यास पुरेल एवढी शक्ति सहज निर्माण करील.

त्याच्या प्रयोगावरून त्यानें असें ठरविलें आहे कीं, शेतकीचें वर्षाचें सर्व काम २१ दिवसांत उरकतां येतें, आणि बाकीचें सर्व काम निसर्ग स्वतःच मनुष्याकरितां करितो; आणि त्याच्या कल्पनेप्रमाणें त्याच्या शेतावर काम सुरू असतें. कापणीच्या मागून नांगरणी जोडून दिल्यामुळें दोन्हीं कामें एकदम होतात. त्याच्या मताप्रमाणें वागल्यास आयुष्यक्रमांत फारच मोठा फरक घडून येणार आहे. नगरवासी लोकांना कारखान्यांत राहून आपली शेती करतां येईल, व शेतकऱ्यांना शेती संभाळून शहरांतील उद्योगधंदे करतां येतील. तो म्हणतो, " एकवीस दिवस शेतकी करून त्यांना कपडे शिवतां येतील, घरें बांधतां येतील, पुस्तकें वाचतां येतील व लिहितां येतील व मोटारींत किंवा विमानांत वसून जगाचें निरीक्षण करतां येईल. येणेंप्रमाणें लोकांच्या जीवनक्रमाला एक निराळेंच पण इष्ट असें वळण लागेल, व त्यांच्या अंदाजापेक्षां आधींच हा फरक पडलेला दिसेल. "

थॉमस ए. एडिसन या प्रसिद्ध संशोधकाचें या बाबतींत फोर्डशीं ऐकमत्य आहे. तो म्हणतो, " फोर्डला आपला सर्व देश जलशक्तीच्या लहान लहान स्थानांनीं भरून गेलेला दिसतो. जेथें जेथें नदी, नाला, किंवा प्रवाह आहे, त्या त्या ठिकाणीं जलयंत्राची स्थापना होऊन सुख, संपत्ती व सौंदर्य यांनीं तीं सर्व स्थानें नटलेलीं केव्हां पाहीन असें त्याला होतें. असें झाल्यास आपल्यापैकीं फारच थोड्यांना शहराच्या गलिच्छ व कोंदट हवेंत रहावें लागेल. बहुतेक लोक या स्थानिक कारखान्याच्या

जोरावर जमीन पिकवून उत्पन्न काढण्यांत व पैसा कमविण्यांत गर्क झालेले आपल्या पाहण्यांत येतील."

या कल्पना जरा विचित्र दिसतात परंतु फोर्ड जरी त्रिकालज्ञानी नसला तरी त्याला भविष्यकाळची अंधुक कल्पना येत असते, हें निःसंशय आहे. त्याचबरोबर मानवी कर्तृत्वशक्तीला पायबंद घालणें किंवा मर्यादा घालणें हेंही त्याला पसंत नाहीं; तर आतांपर्यंतच्या त्याच्या कार्यानें 'किं दूरं व्यवसायिनाम्' हेंच वचन सत्य केलेलें आहे. तेव्हां नर करणी करील तर विश्वकर्म्याचें चातुर्य दाखवील, हेंच खरें. एका टीकाकारानें असें म्हटलें आहे कीं, "फोर्ड कर्तृत्ववान आहे हें म्हणणें मूर्खपणाचें आहे; कारण ज्या गोष्टी फोर्डनें पूर्णपणें सिद्ध करून दाखविल्या त्या गोष्टी करायला मूर्खांशिवाय कोणीच हात घातला नसता. कारण त्या अशक्य आहेत असेंच ज्याला त्याला वाटलें असतें."

ज्या ज्या ठिकाणीं पाणी आहे त्या त्या ठिकाणीं फोर्ड मोटार कंपनीनें आपले लहान लहान कारखाने काढायला सुरवात केली आहे, व अशा रीतीनें गजबजलेल्या शहरांतून आपल्या लोकांना मोकळ्या जागीं नेण्याची त्याची खटपट सुरू आहे. शिवाय फोर्डला असें वाटतें कीं, कोळसा जाळल्यानें व्यर्थ जास्त खर्च येतो, व तितकें कामही होत नाहीं. कोळशापासून जरी इतर पदार्थ काढले तरी पाण्यासारखा तो स्वस्त पडत नाहीं. तेव्हां जलशक्तीचा उपयोग करण्यासारखें सुख नाहीं. अमेरिकेंतील नद्यांचें एवढें मुबलक पाणी मिळतें कीं, यंत्राचें प्रत्येक चाक न् चाक त्यावर फिरेल, व अमेरिकेंतील प्रत्येक घरीं व रस्त्यावर प्रकाशाचा पुरवठा होईल.

यासंबंधीं 'मस्कल शोल्स' ची हकीकत मनोरंजक आहे. अल्बामा मधील टेनिसी नदीच्या पात्रांत एक लांबच लांब खडकाळ व उथळ भाग

आहे. त्याला 'मस्कल शोलस' म्हणतात. यामुळें तेथून जहाजें जाऊं येऊं शकत नाहींत. त्या ठिकाणीं बंधारा घालून जहाजांच्या जाण्यायेण्याला तो मार्ग सुकर करावा अशी एक कल्पना होती. पण १९१७ सालीं अमेरिका युद्धांत पडली तेव्हां तिला दारुगोळ्याकरितां सोऱ्याची फार मोठी उणीव भासूं लागेपर्यंत इकडे कोणी लक्ष दिलें नाहीं. मग मात्र त्या ठिकाणीं धरण करून सोरा तयार करण्याचा कारखाना काढण्याचें सरकारनें ठरविलें, व त्याप्रमाणें सोरा तयार होऊं लागला व 'विल्सन धरण' बांधण्यास सुरवात झाली. पण इतक्यांत युद्ध संपल्यामुळें तें धरण, सरकार पैसे खर्च करायला तयार नसल्यामुळें तसेंच अर्धवट राहिलें.

फोर्डला कांहींजणांनीं सूचना केल्यावरून त्याचें लक्ष तिकडे वेधलें व तो त्या ठिकाणीं गेला. सर्व गोष्ट ध्यानांत आणून त्यानें लगेच तो सर्व भूभाग कांहीं किंमतीला मागितला, व त्या ठिकाणीं खत तयार करण्याचें त्यानें ठरविलें. शिवाय युद्धकालांत सर्व स्फोटक द्रव्यें तयार करण्याचें त्यानें अंगिकारलें. त्या ठिकाणीं बंधारा बांधून सात लक्ष अश्वशक्ति निर्माण करून मोठा थोरला कारखाना काढण्याचें त्यानें योजिलें होत व टेनिसी नदीच्या कांठाकांठानें ७५ मैलपर्यंत लहांन मोठीं औद्योगिक शहरें वसविण्याचा त्याचा विचार होता. परंतु त्याची मागणी जाहीर झाल्याबरोबर जोराचा विरोध मात्र उत्पन्न झाला. आजपर्यंत जो प्रदेश अगदीं त्याज्य म्हणून लोकांच्या मनांतसुद्धां आला नव्हता, तोच आतां राष्ट्रीय उत्पन्नाची बाब आहे, असें जो तो प्रतिपादन करून फोर्डला विरोध करूं लागला. ह्या विरोधकांमध्यें कांहीं असे होते कीं, त्यांच्या हितसंबंधाआड ती कल्पना येत होती. सारांश, तो प्रदेश फोर्डला त्यांनीं पचूं दिला नाहीं. पण फोर्डच्या मागणीमुळें त्याची किंमत लोकांच्या नजरेस आली, हें काय थोडें झालें?

आतां वाहतुकीसंबंधी फोर्डचे काय प्रयत्न चालू आहेत ते आपण पाहूं. रिव्हररूझ येथें जे मोठमोठाले बदल व्हायचे होते त्यांना तेथील आगगाडीच्या रस्त्यावर मोठा थोरला पूल होणें अवश्य होतें. तो लोहमार्ग 'डिट्रोट, टोलेडो, आणि आयरंटन' या कंपनीचा होता. पण ती रेल्वे कंपनी अगदीं डबघाईला आली होती. तेव्हां त्या कंपनीच्या मालकांनींच फोर्डला कांहीं मार्ग सुचविण्यास सांगितल्यावरून फोर्डनें ती रेल्वे सर्व खर्च मिळून दीड कोटी डॉलरला १९२० जुलईमध्यें खरेदी केली.

या लोहमार्गावर कोळशाच्या दोन मोठ्या खाणी असून बरींच मोठीं शहरेंही आहेत. ४५० मैल लांबीमध्यें सुमारें १५ दुसऱ्या लोहमार्गांना हा लोहमार्ग ओलांडून जातो. ५० वर्षांच्या दरम्यान २६ वेळां जरी या लोहमार्गाची व्यवस्था बदलली होती, तरी एका कवडीचा देखील फायदा होत नव्हता. परंतु फोर्डच्या विचारसरणीप्रमाणें त्या लोहमार्गाचा दुहेरी उपयोग होऊं लागला.

पहिला उपयोग असा कीं, आजपर्यंत इतर लोहमार्गावर संप वगैरे अडचणी उत्पन्न होऊन आपल्या कच्च्या मालाच्या वहातुकींत खोळंबा होऊं नये म्हणून फोर्डला बरेंचसें भांडवल कच्च्या मालांत गुंतवून ठेवावें लागे, व भरपूर सांठा करून ठेवावा लागे. आतां हा लोहमार्ग स्वतःच्या मालकीचा झाल्यामुळें त्याचा बराचसा पैसा मोकळा झाला.

या लोहमार्गाचा दुसरा उपयोग म्हणजे फोर्डच्या वहातुकीच्या प्रयोगामध्यें मिळालेला अनुभव. प्रथमतः खर्च कमी करण्यासाठीं त्यानें निरर्थक गोष्टींची छाटाछाट करून टाकली. २७०० नोकर होते, त्यांच्यापैकीं १६५० ठेऊन बाकीच्यांना रजा दिली. रविवारच्या जादा गाड्या बंद केल्या, आणि कमींत कमी तनखा रोजीं सहा डॉलर ठरवून टाकला. या

सर्व गोष्टींमुळें चांगल्या प्रकारें काम होऊं लागलें, आणि वक्तशीर गाड्यांची रहदारी सुरू झाली. एका स्त्रीनें फोर्डला या बाबतींत रागावून पत्र लिहिलें, व म्हटलें कीं, “मी स्टेशनजवळच होत्यें, व गाडी हाकणाऱ्यालाही खूण केली, तरी त्यानें गाडी थांबविली नाहीं!” रेल्वेतील नोकरांनीं संपांत मिसळण्यानें त्यांचें कसें नुकसान होतें, हे फोर्डनें त्यांना दाखविलें. ते नफ्यामध्यें भागीदार झाल्यामुळें संपाची भीति नाहींशी झाली व काम उत्तम होऊं लागलें, असा दुहेरी फायदा मिळूं लागला. १९२२ सालीं दगडी कोळशाचा भाव उतरविला. फोर्डनें हा लोहमार्ग विकत घेतल्याबरोबर एकदां त्याची स्वतः पाहणी केली, व कांहीं प्रदेश तर पायांनीं आक्रमण केला. यामुळें त्याला अनेक सुधारणा करितां आल्या. एकदां एका मालगाडीचा डबा तापून गेल्यामुळें गाडी उभी करून जळलेले कापसाचे गठ्ठे डब्यांतून खालीं घेण्यांत येत होते. फोर्डनें थोडें निरीक्षण करितांच त्याला दिसून आलें कीं, त्या डब्याचा कणा मांडीएवढा जाड होता, व त्याला तेल भरपूर न मिळाल्यामुळें तो तापून गेला होता. लगेच फोर्डनें आपल्या पद्धतीप्रमाणें कणा बसविण्याची सुरवात केली. त्यामुळें तीन महिन्यांतून एकदां तेल दिलें म्हणजे पुरे होऊं लागलें. त्यानें इंजिनें व डबे यांचें वजनही कमी केलें.

आगगाड्यांप्रमाणें तलावांत फिरणारीं जहाजें मालाच्या वहातुकीसाठीं फोर्डनें घेतलीं, व नंतर समुद्रावर मालाची ने आण करण्याकरितांही मोठमोठालीं जहाजें त्यानें खरेदी केलीं. जगांतल्या कोणच्याही मालाच्या जहाजापेक्षां या फोर्डच्या जहाजांवर अन्न व जागा यांची जास्त चांगली सोय केलेली असते. सर्व खलाशांना सर्वत्र मिळणाऱ्या पगारापेक्षां दुप्पट पगार मिळतो, पण त्यांना विडी ओढण्याची मनाई असते.

जमीन व पाणी या दोहोंवर विजय मिळविल्यावर रोहली हवा. वहातुकीसाठीं हवेचाही पुष्कळ उपयोग होणार आहे, ही गोष्ट फोर्डच्या

लक्षांत आली आहे; व म्हणून त्यानें डिट्रोटपासून शिकॅगोपर्यंत आकाशयानाची जा ये सुरू केली आहे. डियरबोर्न येथें एक अवतीर्णस्थल बांधून १९२५ त 'स्टाऊट मेटल एरोप्लेन कंपनी,' त्यानें विकत घेतली. युद्धोपयोगी यंत्रें फार अवजड असून दळणवळणाच्या व्यापाराला तीं निरुपयोगी आहेत असें पाहून, फोर्डनें १९२५ च्या अक्टोबर महिन्यांत २०० अश्वशक्तीचें एक यंत्र बनविलें. व १९२७ सालीं तीन यंत्रांचीं विमानें आकाशांत यशस्वी रीतीनें संचार करूं लागलीं. आणि त्यांच्याच सहाय्यानें लेफ्टनंट कमांडर ब्यर्ड यानें उत्तरध्रुवाकडे उड्डाण मारून अपूर्व यश संपादन केलें! हल्लींच्या आकाशयानांत पुष्कळ सुधारणा करायला पाहिजेत, असें फोर्डचें म्हणणें आहे आणि आकाशांतून प्रवास करणें, किंवा मालाची वहातुक करणें या गोष्टी इतक्या साध्य ठरत आहेत कीं, इत:पर त्यांच्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं, असें फोर्डला वाटत असल्यामुळें या बाजूनेंही त्याचे प्रयत्न एकसारखे सुरू आहेत.

याप्रमाणें उत्पत्ति, कृति आणि गति या तिहींकडे फोर्डचें लक्ष सारखें लागून राहिलें आहे, व प्रत्येक क्षेत्रांत यांत्रिकशक्ति मनुष्याच्या उपयोगी पडावी अशा सुधारणा तो करीत आहे. कित्येक वेळां आपलें म्हणणें लोकांना रुचत नाहीं, किंवा पटत नाहीं, आणि कित्येक वेळां आपल्या हेतूंचा विपर्यास केला जातो, हें पाहून १९१९ सालीं त्यानें "स्वतंत्र डियरबोर्न" हें वर्तमानपत्र विकत घेतलें, व त्या साप्ताहिक वर्तमानपत्रांतून त्यानें आपला उद्देश जाहीर केला. तो असा, "माझ्या देशाच्या व जगाच्या भविष्यकालाबद्दल मला फार आस्था वाटत आहे; व माझी अशी दृढ श्रद्धा आहे कीं, माझ्या कल्पना व ध्येयें सर्वांचें कल्याण केल्याशिवाय रहाणार नाहींत; आणि माझ्या सर्व कल्पना व ध्येयें मी अगदीं अविकृत स्वरूपांत जनतेच्या चरणीं वहाणार आहें." त्याचप्रमाणें

फोर्डचा असा विश्वास आहे कीं आधींच सुंदर असलेल्या या वसुंधरेला मनुष्यप्रयत्नानें अधिक मोहक रूप देतां येईल. मनुष्य असो किंवा समाज असो, या कार्याला प्रत्येकाला हातभार लावतां येण्यासारखा आहे. ‘ मनुष्याला अशक्य असें कांहींच नाहीं ’ हें त्याचें तत्त्व अढळ आहे. तो म्हणतो, “ बेकारी, दारिद्र्य व प्राणनाश ( जीवनऱ्हास ) होण्याचें कांहींच कारण नाहीं. जो समाज आपलें धारण पोषण करण्यास आपला आपण समर्थ नाहीं, व ज्याच्याकरितां अन्नछत्रें व दुष्काळी कामें काढावीं लागतात, त्याला जगण्याचा हक्क नाहीं, व जगला तरी त्याचा उपयोग नाहीं. ” म्हणून सर्व जगाची संकटांतून मुक्तता जर कशानें होणार असेल, तर यांत्रिक शक्तीच्या उपासनेमुळें होय, असें त्याचें मत आहे. तो म्हणतो, “जेव्हां आपण यंत्रशक्तीला आपली दासी बनवूं, व जेव्हां आपलें अन्नवस्त्राचें काम फार सुलभतेनें आपल्याला करितां येईल, तेव्हांच जीवनयात्रेंतील आनंद व सुख यांचा मार्ग आपण गांठला असें होईल. व्यक्तिशः आपलें जीवित सुखाचें होईल. आपण या कामीं आपली सर्व बुद्धि व शक्ति खर्च केली, तर आपल्याला आयुरारोग्य लाभेल व ऐश्वर्याची अभिवृद्धि होईल, आणि परस्परांचें जीवित सुखाचें केल्याचें पुण्य पदरीं पडेल. ”

---

प्रकरण सोळावें.

## व्यक्तिविषयक.

हेन्री फोर्डच्या कीर्तीचा डंका चारी खंडांत दुमदुमत आहे. ज्यांनीं त्याला प्रत्यक्ष पाहिला नाहीं, त्यांना त्याच्या छायाचित्राची तरी ओळख करून घ्यावीशी वाटते. त्याची लोकप्रियता अपूर्व आहे. यंत्रकला म्हणजे

त्याच्या हाताचा मळ आहे. उद्योगधंद्यांत तो विलक्षण क्रांति करणारा असून द्रव्यार्जनाच्या कामीं नेपोलियनसारखा पराक्रमी आहे. जिराल्ड स्टॅन्ले ली हा म्हणतो, "फोर्ड म्हणजे चालता बोलता इतिहासच आहे !" लोकांना त्याच्याबद्दल इतकें कुतूहल वाटतें कीं, वर्तमानपत्राचे संपादक त्याच्या नांवानें आपलीं वर्तमानपत्रें भूषविण्याच्या संधीची वाट पहात असतात. इतकें आहे तरी त्याला नांवें ठेवणारे व त्याची निंदा करणारे लोक आहेतच! पुष्कळ वेळां खोट्या कंड्या पिकवून त्याच्या कीर्तीला कलंक लावण्याचा उपव्द्याप केला जातो !

एका प्रसिद्ध वर्तमानपत्रांत त्याच्या अजब कृतींचा गोषवारा दिला आहे तो असाः—

१ फोर्डनें गॅसोलिन मोटार निर्माण करून १३०००,००० पेक्षां जास्त गाड्या बांधल्या. आणि सर्व जगांतील इतर मोटारगाड्यांची संख्या त्या संख्येच्या दुप्पटही भरत नाहीं.

२ व्यक्तिशः पाहिलें तर त्याच्या एवढा लोहमार्गाचा मालक व लोह-मार्गाचें काम करणारा दुसरा कोणी नाहीं. अगदीं हीन स्थितींत असलेला ६०० मैलांचा लोहमार्ग विकत घेऊन त्याची पुनर्रचना व पुनर्व्यवस्था त्यानें केली, व लोहमार्गांना अनुकरणीय उदाहरणें घालून दिलीं.

३ सरोवरांत किंवा सागरांत फिरणारीं कित्येक जहाजें त्याच्या मालकीचीं असून, दक्षिण अमेरिकेस किंवा युरोपला तो आपला माल त्यांतून पाठवीत असतो.

४ जगांत व्यापारी आकाशयानें चालू करण्याच्या कामीं त्यानेंच पुढाकार घेतला असून, व्यापारी दृष्ट्या आकाशसंचार कसा फायदेशीर करतां येईल, याची तो खटपट करीत आहे; आणि विशेष गोष्ट ही कीं, या कामीं त्यानें सरकारचें सहाय्यही घेतलेलें नाहीं.

५ त्याच्या कोळशाच्या खाणी असून मिचिगनच्या उत्तर भागांत लोखंडाच्या खाणी आहेत, व फुंकण्याच्या भट्टीकामांत तो सर्वांच्या पुढें आहे. याशिवाय लाकूड कांतण्याच्या नवीन पद्धती त्यानें शोधून काढल्या आहेत, व फुकट जाणाऱ्या तुकड्यातुकड्यापासून तो अनेक पदार्थ तयार करीत असतो.

६ कांच तयार करणाऱ्या मोठमोठ्या कारखानदारांत त्याचा दर्जा दुसरा लागतो. तज्ज्ञांनीं अशक्य म्हणून शिक्का मारलेली गोष्ट म्हणजे जाड कांचेचे मोठमोठे पत्रे त्यानें केवळ तीन वर्षांच्या अनुभवानें तयार केले.

७ मिचिगन येथील सर्वांत मोठ्या शेतकऱ्यांमध्यें त्याची गणना होत असून १०००० एकर जमिनीची लागवड मनुष्य व यंत्रें यांच्या साहाय्यानें करून तो विलक्षण फायदा कमवीत आहे.

८ त्याला लागणाऱ्या तागाच्या कापडासाठीं तो स्वतः $\frac{१}{४}$ ताग निर्माण करितो. तो कापसाचें व लोंकरीचें कापड विणतो, व कृत्रिम कातडें तयार करितो.

९ कोळसा शोधून त्यांतून अनेक पदार्थ काढतो, व पांच डॉलरचे १२$\frac{१}{२}$ डालर करितो.

१० तो शिलारस तयार करतो, व केवळ डिट्रोटमध्यें प्रत्येक दिवशीं ६६ अडते मिळून २२००० गॅलन शिलारसाची विक्री करितात.

११ अखिल जगांत व्यक्तिशः पाहिलें तर त्याच्या एवढा मोठा बँकेंत पैसा ठेवणारा इसम तोच म्हणावा लागेल. कारण त्याचे नेहमीं २० कोटी डॉलर बँकेंत शिल्लक असतातच.

१२ तो एक मोठा शिक्षणदाता आहे. इतिहास म्हणजे राजांच्या लढायांवर केलेली झिलई असते, व त्यांत मनुष्याच्या इतिहासाकडे दुर्लक्ष

केलें जातें, असें त्याचें मत आहे. १०००००० डॉलर तेव्हां त्याच्या मताप्रमाणें योग्य तें शिक्षण देण्यासाठीं त्यानें खर्च केले आहेत.

१३ फोर्डच्या डियरबोर्न इंडिपेंडंट पत्राचा खप ६००००० प्रतींच्या वर आहे, व कित्येक आठवड्याला तो आपले विचार त्यांत प्रसिद्ध करितो.

१४ तयार कपडे, बूट, मांस व खाण्याचे पदार्थ तो आपल्या नोकरांना विकतो, व चांगलीं घरें बांधून त्यानें आपल्या कारखान्याजवळ एक नमुनेदार नगर वसविलें आहे.

१५ एक कोटी डॉलर खर्च करून डिट्रोटमध्यें त्यानें एक रुग्णालय स्थापन केलें आहे. त्या ठिकाणीं वैद्य व रोगी या दोघांचाही फायदा होतो.

१६ फोर्डला पक्ष्यांची फार आवड आहे. बरो नांवाच्या एका सृष्टपदार्थशास्त्रज्ञावरोबर तो कित्येक वर्षेपर्यंत खेड्यापाड्यांतून हिंडला. २५००० गुलाबांचे ताटवे लाऊन तो आज एक उत्तम उद्यान निर्माण करीत आहे.

सारांश त्यानें वहातुकीसाठीं रेल्वे विकत घेतल्या आहेत. कोळशासाठीं खाणी विकत घेतल्या आहेत. रबराच्या धावा तयार करण्यासाठीं रबराचीं वनेंच्या वनें त्यानें खरेदी केलीं आहेत. टप तयार करण्यासाठीं कापसाची लागवड करून त्यापासून सूत कातून कापड विणण्यासाठीं गिरण्या काढल्या आहेत. पाण्यापासून शक्ति निर्माण करण्यासाठीं धांवत्या नद्यांचे प्रचंड टापू त्याच्या मालकीचे आहेत.

अशा प्रकारचा हा कर्मवीर आहे तरी कोणत्या प्रकारचा? सध्यां हयात असणाऱ्या बारा मोठ्या अमेरिकन पुरुषांत ज्याची गणना होत आहे, असा हा फोर्ड दिसतो कसा, त्याच्या संवयी काय आहेत, त्याच्या आवडीनिवडी कोणच्या प्रकारच्या आहेत तें पाहूं.

फोर्डची शरीरयष्टी सडपातळ, मध्यम उंचीची व थोडी नमती आहे. त्याचे पाय लहान व हात लांब आहेत. ते सहजसंवेदी असल्यामुळें

यंत्रकलेंत फार कुशल आहेत. त्याचें भाळ विशाल असून त्याच्या मस्तकावरील पांढऱ्या केसांचा भार साफ करून मागें वळविलेला असतो. त्याचा चेहरा उठावदार असून नासिका सरळ व कमानदार आहे. डोळे घारे असून सीधेपणाची झांक त्यांत दिसते. लोकांशीं बोलतांना त्याचे डोळे लोकांच्या अंतरंगांत प्रवेश करितात, तर कित्येकदां भविष्यकाळच्या कल्पनेंत गुंग झाल्याप्रमाणें दिसतात. एकंदरींत फोर्डची दृष्टी तीव्र व भेदक आहे. नेहमीं दाढी केलेल्या त्याच्या तोंडावर एकप्रकारची सोनेरी छटा दृग्गोचर होत असते. सारांश त्याच्या चेहऱ्यावरून तो दयार्द्र, विचारांत गुंगणारा, साधासीधा पण चलाख व दक्ष असावा असें वाटतें.

त्याची रहाणी अगदीं साधी आहे. कोणासही त्याला भेटतां येतें. भिंतीला टेकून ठेवलेल्या झुलत्या खुर्चीवर बसणें त्याला विशेष आवडतें, व बसण्याची त्याची ठराविक पद्धत म्हणजे पायावर पाय टाकून किंवा दोन्ही हातांनीं गुढघा धरून बसणें ही होय. किंवा मांडीवर कोपर ठेऊन व तळहातावर हनुवटी टेकून तो बसत असतो. तो सरळ व निर्भीडपणें बोलतो व मतभेदाबद्दल अनादर न दर्शवितां तो आपलें म्हणणें स्पष्टपणें मांडतो. त्याचें बोलणें मुद्देसूद असतें इतकेंच नव्हे, तर प्रत्येक शब्दाला त्याच्या स्वानुभवाचा पाठिंबा असतो. त्याच्या भाषणांत पूर्वतयारी मुळींच नसते, तरी त्याचें भाषण अस्खलित होतें. सॅक्सन शब्दांचीच तो योजना करतो. त्याचा आवाज मृदु व कोमल असून प्रसंगविशेषीं तो आपोआप चढतो. तो एकाद्या विषयासंबंधीं बोलण्याच्या भरांत आला म्हणजे ज्याच्याजवळ बोलत असेल त्याच्या बाजूला तो थोडासा वांकून बोलूं लागतो, व त्याच्या डोळ्यांत एक विशिष्ट तेज चमकूं लागतें. तो उत्तम वक्ता आहे एवढेंच नव्हे, तर तो एक उत्तम श्रोताही आहे; म्हणजे लोकांचें म्हणणें ऐकून घेण्याइतका तो शांत असतो.

तो चालतांना त्याच्या देहाला उशी आल्याचा भास होतो. त्याचे कपडे अगदीं साधे व कमी खर्चाचे असतात. त्याच्या हाताला स्वस्थपणा हा ठाऊक नाहीं. कित्येक वेळां तो आपल्या खुर्चीवरून ताडकन उठतो, व खोलींत येरझारा घालीत असतो. यावरून त्याच्या मनांत चाललेल्या अनंत चळवळींचें प्रत्यंतर येतें. एकाद्या चपळ मुलाला घरांत कोंडून ठेविल्यास बाहेर पडण्यासाठीं त्याची जशी धडपड चालते, त्याचप्रमाणें फोर्डच्या मनांतही विचारांची एकसारखी खळबळ चाललेली असते. अगदीं स्वस्थ असा तो क्वचितच सांपडतो.

फोर्डचें बाह्य रूप आणि अंतरंग यांत बरीच साम्यता आहे. त्याचा स्वभाव अगदीं मोकळा असून त्याच्या ठिकाणीं गर्वाचा लवलेशही नाहीं. तो अगदीं मनमिळाऊ आहे, व आपल्या मित्रांवर त्याचा पूर्ण विश्वास असून त्यांच्यावर त्याचें फार प्रेम असतें. तो विनोदप्रिय आहे, आणि विशेषत: त्याची थट्टा केली असतां त्याला राग तर येत नाहींच, पण उलट गंमत वाटते. जीवित आनंदमय आहे, अशी त्याची समजूत असल्यामुळें लहान मुलांचा उत्साह त्याच्या ठिकाणीं स्पष्ट दिसतो. त्याच्या तोंडावर स्मितहास्य झळकतें, व कित्येकदां तो आनंदानें शीळ घालीत असतांना आढळतो. तो आदर्शभूत कारखानदार, आदर्शभूत व्यापारी व आदर्शभूत पुरुष आहे. कर्तृत्वशक्तीचा तो मूर्तिमंत पुतळाच होय.

समाजांत मिसळणें त्याला फारसें आवडत नाहीं. त्याच्या आवडीनिवडी कांहीं विशिष्ट प्रकारच्या आहेत. रूढींना उराशीं बाळगून बसणारा असा मनुष्य तो नव्हे. तो आपल्या अंत:करणप्रवृत्तीला पटेल तेंच करितो. तो म्हणतो, “मला स्वातंत्र्य पाहिजे; मला काम करावेंसें वाटलें म्हणजे मी काम करतों; दमलों कीं काम बंद करतों.” पण तो दमतो असें क्वचितच

घडतें. कारण त्याची प्रकृति चांगली असून काम करण्याची त्याची शक्ति अपरंपार आहे !

तो दररोज दोनदां साधें अन्न खातो; याशिवाय तरतरी आणण्यासाठीं तो विडी ओढत नाहीं, किंवा दुसऱ्या मादक पदार्थांचा उपयोग करीत नाहीं. "मद्य हें विष आहे" असें तो म्हणतो, "परंतु मी सांगतों म्हणून कोणी दारू पिण्याचें सोडलेंच पाहिजे, असा माझा आग्रह नाहीं. कोणतीही गोष्ट दाबून टाकण्याची माझी इच्छा नाहीं. धाकदपटशानें कोणाची खात्री होत नाहीं." यानंतर दारूबंदीचा कायदा पसार झाल्यापासून मात्र व्यक्तीच्या आवडीनिवडीचा प्रश्न उरलाच नाहीं. तेव्हां दारू पिणाऱ्या माणसाला तो आतां कामावर ठेवीतच नाहीं.

फोर्डच्या मागें अनेक उद्योगांचा भुंगा असल्यामुळें त्याची कचेरी किंवा ठराविक कामाची वेळ अशी नाहीं. तो जेथें असेल तेथें त्याची कचेरी असते व तेथेंच तो काम करितो. 'फोर्ड मोटार कंपनीचा' अध्यक्ष असतांना सर्व शाखांशीं त्याचा निकट संबंध येत असे. आतां जरी कंपनीच्या कामाची माहिती त्याला दिली जाते, तरी पुष्कळ व्यवसाय मागें असल्यामुळें चोहीं-कडे त्याचें लक्ष वेधलेलें असतें.

फोर्डला वाचनाची एवढीशी आवड नाहीं. उद्योगधंद्यांतील दुसरा एक प्रसिद्ध पुरुष, अँड्र्यू कार्नेजी, याची स्थिति मात्र फोर्डहून फार वेगळी आहे. त्यानें कांहीं वाचलें नाहीं असें नाहींच. त्या बाबतींत तो सर्वभक्षक आहे असें म्हटलें तरी चालेल. वर्तमानपत्रांतील आपल्या आवडीचे विषय मात्र फोर्ड वाचतो; व आपल्यावर कोणी टीका केली असेल तर ती वाचण्यास मात्र तो बिलकुल चुकत नाहीं. कारण टीके-पासून आपल्याला पुष्कळ धडा घेण्यासारखा असतो, असें त्याचें मत

आहे. पण असें आहे म्हणून त्याच्यावरील टीकेमुळें त्यानें आपल्या मतांत कधीं बदल केला आहे असें थोडेंच झालें आहे ? त्याला कादंबरी, इतिहास, किंवा काव्य यांची मुळींच गोडी नाहीं. मात्र त्याचें वायवलचें वाचन अखंड व अव्याहत चाललेलें असतें. इमरसनचे निबंध किंवा टॉलस्टॉयचे निबंध तो केव्हां केव्हां वाचतो. जॉन बरोचे सृष्टिशास्त्राचे ग्रंथ वाचणें त्याला आवडत असे. पुढें तर त्या दोघांची चांगलीच मैत्री जमली. पण वाङ्मयाची त्याला ओळखसुद्धां नाहीं, व " त्यासाठीं तो एक पैही खर्च करीत नाहीं."

त्याचे विलास त्याच्या सर्व आयुष्याला शोभतील असेच साधे आहेत. जलसंचयाबद्दल त्याला अपूर्व प्रेम वाटत असल्यामुळें ' सिअला ' नांवाच्या आपल्या नौकेंत बसून जलविहार करणें त्याला फार आनंदाचें वाटतें. हिवाळ्यांत बर्फाच्छादित भूमीवरून घसरणें किंवा वनभोजन करणें ह्या गोष्टी अजूनही चालतात. वनभोजनास गेलें असतां उत्तम स्वैंपाक करून दाखविण्याचेंही सामर्थ्य तो प्रकट केल्याशिवाय रहात नाहीं !

थॉमस एडिसन याच्या संगतींत फोर्डला जो आत्यंतिक आनंद वाटतो तो सांगतां सोय नाहीं. " सर्व जगांत त्याच्या एवढा कल्पक झाला नाहीं," असें फोर्ड याचें मत आहे. मनुष्यपणा, कल्पकता किंवा समाजसेवा या सर्वांच्या दृष्टीनें विचार केला तर एडिसनसारखी थोर व्यक्ती आपणाला भेटली नाहीं असें तो म्हणतो. १८९६ सालीं प्रथम त्याची व एडिसनची गांठ पडली, व उत्तरोत्तर त्याची मैत्री दृढ होत गेली. सर्व जग विद्युत्शक्तीच्या कर्तृत्वानें मोहित होऊन गेलें असतां विद्युत्शक्तीच्या प्रणेत्यानें मात्र फोर्डला पुढीलप्रमाणें प्रामाणिक सल्ला दिला. तो म्हणाला, " विद्युत्शक्तीनें वाटेल तें काम होण्यासारखें असलें तरी कोणतीही एक

विशिष्ट शक्ति देशाचें सर्व तऱ्हेचें काम करण्यास पुरी पडेल असें मला वाटत नाहीं. तुमच्या कल्पनेप्रमाणें पुष्कळ अश्वशक्ती निर्माण होणारें पण कमी वजनाचें यंत्र तुम्हांला निर्माण करितां आल्यास त्याचाही भविष्यकाळीं फार उपयोग होणार आहे हें विसरूं नका." एडिसनच्या या आश्वासनानें फोर्डला विलक्षण धीर आला असेल यांत शंका कशाला ?

जॉन बरो नांवाचा गृहस्थही त्याचा मोठा दोस्त होता. सृष्टपदार्थ-शास्त्रज्ञ असा दुसरा जगांत झाला नाहीं, अशी फोर्डची समजूत आहे. अनश्वरथाविरुद्ध त्यानें लिहिलेल्या लेखामुळेंच फोर्डला त्याचें नांव माहीत झालें. या बाबतींत बरोची चुकी त्याच्या पदरांत घालण्यासाठीं त्याच्या बरोबर वाद करण्याची फोर्डची इच्छा होती. पक्ष्यांच्या संबंधानें त्यानें लिहिलेल्या लेखावरून फोर्डच्या मनांत त्याच्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न झाली होती. तेव्हां बरोला आपल्या मनांतून एक मोटार नजर करावयाची आहे असें त्यानें बोलून दाखविलें. बरोला या देणगीचा अर्थच कळेना. पण शेवटीं त्यानें फोर्डची देणगी स्वीकारली. यानंतर खरोखरच त्याला असें आढळून आलें कीं, सृष्टिनिरीक्षणाच्या आड मोटार तर येत नाहींच, उलट थोडक्या श्रमांत त्याला पुष्कळ सृष्टिशोभा अवलोकन करतां येते. पुढें थोड्याच दिवसांनीं फोर्डच्या निमंत्रणाला मान देऊन बरो फोर्डकडे डियरबोर्न येथें गेला; तेव्हां "फोर्ड हा मोठा आस्थेवाईक, उदार अंत:करणाचा व साधासीधा मनुष्य आहे," अशी त्याची खात्री झाली. त्यांची दृष्टादृष्ट झाल्यापासूनच त्यांची एकमेकांच्या ठिकाणीं भक्ति बसली.

फोर्ड, एडिसन व बरो या तिघांची मैत्री फार उच्च दर्जाची असून त्यांच्या स्नेहांत कधीं अंतर पडलें नाहीं. आज बरो दिवंगत झाला

त्याला इलाज नाहीं; तरीसुद्धां फोर्ड व एडिसनरूपी गंगा यमुनांच्या संगमांत बरोच्या स्मृतीची गुप्त सरस्वती वहात असतेच.

हे तिघे मिळून प्रवासास निघावयाचे. १९१८ सालीं पिट्स्बर्ग पासून एशव्हॅलीपर्यंत त्यांनीं प्रवास केला. त्यांच्या टोळींत १४ माणसें होतीं. तीन माल भरलेल्या गाड्या व तीन बसावयाच्या गाड्या घेऊन ह्या मंडळींनीं सर्व प्रवास केला. सूर्यास्तापूर्वी एकादी चांगलीशी जागा पाहून ते तंबू ठोकीत. बरोचें वय झाल्याकारणानें सर्वजण त्याला फार जपत. एडिसन आपलीं विद्युत्पात्रें ( Batteries ) काढून क्षणार्धांत विजेची रोषणाई करी. पुष्कळदां तो रात्रीचा तासच्या तास वाचीत बसे, व दिवसा झोंप काढी. "या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी" याप्रमाणेंच त्याची स्थिति होती. फायरस्टोन नांवाचा एक गृहस्थ त्या मंडळींत होता; त्याच्याकडे सर्व बाजारहाटाची व्यवस्था असे. अग्नीसाठीं लाकूडफाटा जमविण्याचें काम फोर्डचें असे. याशिवाय तळ पडल्यावर किंवा रस्त्यावर कांहीं अडचण उत्पन्न झाली कीं त्या ठिकाणीं फोर्डचा उपयोग हा व्हायचाच. मोटारींचें कांहीं बिघडलें कीं, फोर्डचा कुशल हस्तस्पर्श होतांच सर्व दोष नाहींसे होत व मोटारगाड्या मांजरांप्रमाणें गुरगुरूं लागत. सकाळीं ६-३० वाजतां फोर्ड उठे व लगेच एकाद्या ओढ्यावर जाऊन बुडी मारून स्नान करी, आणि फराळ झाल्यानंतर प्रवाहाच्या बाजूनें हिंडायला जाई. एकाद्या ठिकाणीं मोठासा धबधबा दिसला, म्हणजे तेवढी जलशक्ती फुकट चाललेली पाहून त्याला अतोनात वाईट वाटे. अन्यप्रसंगीं आपल्या मंडळीबरोबर तो शर्यतीची किंवा उडी मारण्याची चढाओढ करी.

मार्गांत भेटणाऱ्या लोकांचें व फोर्डचें मोठें सूत जमे. एडिसन कोण होता हें लोकांना माहीत असे, पण त्याच्याविषयीं त्यांना एक प्रकारचें

भय वाटे. बरो कोणाला फारसा माहीत नव्हता. फोर्ड मात्र सर्वांना ठाऊक असून सर्वांना त्याचें प्रेम वाटे. एक दिवस त्यांना एक बाई भेटली; तिचें लक्ष फोर्ड व एडिसन यांच्याकडेच होतें पण सृष्टवस्तूवर पुस्तकें लिहणारा तो हाच बरो, असें कळल्या वेळेपासून तिची त्याच्या ठिकाणीं इतकी भक्ती बसली कीं, पुढें फोर्ड व एडिसन यांचें तिनें दर्शनही घेतलें नाही. फोर्डला याचें इतकें कौतुक वाटलें कीं, त्यानें घरीं जातांक्षणींच त्या बाईला बरोचे सर्व ग्रंथ नजर केले.

ह्या मंडळीनें आपला प्रवास घाईघाईनें मुळींच उरकला नाहीं. सकाळीं फार उशीरानें ते चालूं लागायचे व ज्या ठिकाणीं मन रमेल तेथें थांबायचे. एकदां रस्त्याच्या कडेला असणाऱ्या एका शेतांत एक शेतकरी ओट धान्याची कापणी करीत होता. त्याला "आम्ही तुला कापण्यास मदत करितों" म्हणून या मंडळीनें सांगितलें. ही शहरवाली मंडळी असें कसें म्हणतात म्हणून त्याला आश्चर्य वाटलें, व त्यांना त्या अवघड कामाची माहिती नाहीं, म्हणून कदाचित् ते आपल्याला मदत करण्याला सिद्ध झाले असतील, असें वाटून त्याला हंसूंही आलें. शेवटीं त्यांच्या आग्रहावरून त्यानें आपला विळा त्यांच्या स्वाधीन केला. पण सर्वांत फोर्डच्या लहानपणच्या शिक्षणामुळें त्याला तें काम सहज लीलेनें करितां आलें. येणेंप्रमाणें हा प्रवास त्यांनीं मोठ्या मजेंत केला.

फोर्डचें त्याच्या स्वतःच्या घरावर जें विलक्षण प्रेम आहे त्याचें बरोबर वर्णन करितां येणें कठीण आहे. लग्न झाल्यावर बांधलेलें घर त्यानें सुव्यवस्थित ठेविलें आहेच; पण ज्या घरांत तो जन्मला, तें घरसुद्धां त्यानें आपला भाऊ जॉन याच्यापासून विकत घेऊन उत्तम स्थितींत ठेविलें आहे. त्याची माता जिवंत असतां त्या घरांत जे जे पदार्थ होते, ते ते पदार्थ

किंवा त्यांच्या हुबेहूब नकला आणवून त्यानें आपल्या मातेची स्मृति कायम राखली आहे. सर्व पदार्थांच्या नकला मिळाल्या, पण चिनीमातीचीं एका विशिष्ट घाटाचीं भांडीं पुन्हां त्याला करितां येईनात, यामुळें त्याच्या मनाला मोठी हुरहुर लागून राहिली होती. शेवटीं आपल्या घराच्या आजूबाजूस खणून माती चाळीत असतां त्याला पाहिजे होता तसल्या चिनी मातीच्या भांड्याचा एक तुकडा सहज त्याला दिसला. त्याबरोबर त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. लगेच त्यानें त्यावरहुकूम सर्व भांडीं तयार करून आपल्या घरांत मांडलीं. याला म्हणतात बाळपणीचें भावनामय गोड गृहप्रेम !

इतिहासाबद्दल त्याला जरी विशेषसें प्रेम नसलें तरी कोणत्याही कामांत जे जे अग्रगामी ( pioneers ) लोक होऊन गेले त्यांच्याविषयीं त्याला फार आदर वाटतो. त्यानें आपल्या पदार्थसंग्रहालयांत सर्व तऱ्हेचीं वाहनें ठेविलीं आहेत. पूर्वींचें चांगलें कायम ठेवण्याकडे त्याचें नेहमीं लक्ष असतें. म्हणूनच पूर्वींच्या पद्धतीच्या नाचाचें त्यानें पुनरुज्जीवन केलें आहे.

फोर्डला पक्ष्यांचें फार वेड आहे; आणि हें वेड लहानपणीं तो तीन वर्षांचा असतांना आपल्या बापाबरोबर गाणाऱ्या चिमणीचें घरटें बघायला गेला होता, त्यावेळेपासून आहे असें म्हटलें तरी चालेल. त्याच्या घराभोंवतीं ५०० च्या वर पक्ष्यांकरितां जागा बांधलेल्या आहेत. कांहींना तर मोठमोठालीं दालनें आहेत. एकाचे ७५ भाग आहेत. यांत आयर्लंड व इंग्लंड यांतील बरेच पक्षी आणून ठेविले होते. पण आतां देशी पक्ष्यांचाच भरणा जास्त आहे. उन्हाळ्यांत हे पक्षी खाण्यापिण्याची सर्व तरतूद स्वतःच करितात. पण हिवाळ्यांत मात्र त्यांच्याकरितां दाणा आणि पाणी यांची खास व्यवस्था केलेली असते. जिकडे तिकडे तारांच्या टोप-

त्यांत गुरांची चरबी व दाणे भरून तीं अडकविलेलीं असतात. एक मोठा हौद खालीं विजेचा स्टो लाऊन पाण्यानें भरून ठेवण्यांत येतो. यामुळें पाणी गोठत नाहीं व पक्ष्यांना तें भरपूर प्यायला सांपडतें.

फोर्डचें पक्ष्यांच्यावरील हें प्रेम इतकें मनापासून आहे कीं, कधीं कधीं त्यांच्याकरितां स्वतःची अडचण झाली, तरी तो ती आनंदानें सोसण्यास तयार असतो. एकदां त्याच्या शेतवाडीच्या घरापुढील द्वारमंडपाच्या कोपऱ्यांत दोन तीन पक्ष्यांनीं आपलीं घरटीं केलीं होतीं. तेव्हां त्या घरट्यांतील पिल्लें मोठीं होऊन उडून जाईपर्यंत, फोर्डनें आपला पुढला दरवाजा बंद करून, पायरीवर " मागील दरवाजा वापरावा " अशी सूचना लिहून ठेविली होती. पक्ष्यांच्याकरितां झाडांवरचीं फळें, विशेषतः चेरी नांवाचें फळ, राखून ठेविलेलें असतें. त्याला कोणी हात लावीत नाहीं. फोर्डची एक नातेवाईक बाई त्याच्याकडे उन्हाळ्याच्या दिवसांत एकदां गेली होती. तिला एक चेरीसुद्धां तोडूं न देतां तो म्हणाला, " तुम्हाला लागतील तेवढ्या चेऱ्या, गाड्या चार गाड्या, मी विकत घेऊन देतों, पण झाडावरच्या मात्र पक्ष्यांना शिल्लक राहूं द्या, " पक्ष्यांची खरोखर तेथें अगदीं चैन आहे. आतां ह्या फळास एक चोंच मारावी, जरा वेळानें त्या फळाचा थोडासा स्वाद घ्यावा असें त्यांचें चाललेलें असतें! पक्ष्यांचा उपयोग तीन प्रकारचा आहे असें त्याला वाटतें. त्यांचें सौंदर्य व सोबत ही तर उपयोगाचीं आहेतच; पण सर्वांत मोठा उपयोग म्हणजे दुष्ट जीवजंतूंचा ते नाश करीत असतात हा होय. फोर्ड म्हणतो, " आम्ही आमच्या कारखान्यांतील लोकांचा कायदेमंडळावर वजन पाडण्याच्या कामीं एकदांच उपयोग केला; आणि तोसुद्धां स्थानांतर करणाऱ्या पक्ष्यांना निवासस्थानें तयार करून द्यावीं अशा तऱ्हेचें बिल पास करून घेण्याकरितांच ! "

पक्ष्यांच्याशिवाय ससे, खारी व इतर प्राणीही त्याच्या संग्रहाला पुष्कळच आहेत. या ठिकाणीं बंदुक उडवायला कोणालाच परवानगी नाहीं. उगवलेलें धान्य खारींच्या करितां राखून ठेवण्यांत येतें व लोहदंड एकमेकांवर आडवे उभे रचून, व झुडपांची छाया करून त्यांचीं क्रीडागृहें बनविलेलीं असतात.

त्याला अचल जीवाचा मोहही कांहीं कमी आहे असें नाहीं. त्याच्या कुसमवाटिकेंतील पुष्पनिकरावरून नजर फिरविणें म्हणजे नेत्रांचें पारणें फेडणेंच होय. त्याच्याप्रमाणें त्याच्या पत्नीलाही पुष्पांची फार आवड आहे. एवढेंच नव्हे तर रानटी फुलांच्या अनेक जाती त्या ठिकाणीं पहायला सांपडतात. त्याच्या घरासभोंवतालच्या वृक्षांच्या फांद्याही त्याच्या इच्छेव्यतिरिक्त तोडल्या जात नाहींत. या त्याच्या घरांत जुन्या कारखान्याऐवजीं नवीन कारखाना अस्तित्वांत आला आहे, आणि फोर्ड त्या ठिकाणीं अजूनही नवीन नवीन रचना, व घडामोडी करण्यांत गुंग झालेला दिसतो; व अशारीतीनें सारखें काम करण्यामध्येंच त्याला अवर्णनीय सुख होतें.

फोर्डला आपल्या घराचा इतका ओढा आहे कीं, त्याला 'घरकोंबडा' म्हटलें तर कांहीं वावगें होणार नाहीं. फोर्टमेयर्स व फ्लोरिडा येथें एडिसनच्या जवळ फोर्डनेंही थोडीबहुत जागा घेतली आहे. आणि एडिसनला भेटायलाही तो पुष्कळ वेळां जातो पण घरीं येऊन पोहचलें म्हणजे त्याला फार बरें वाटतें. त्याच्या वैवाहिक सुखांत कोणतीही न्यूनता म्हणून नाहीं. त्या पतिपत्नीमध्यें सलोखा, प्रेम, आनंद व शांति हीं अखंड नांदत असतात. आयुष्यांतील सुख:दुखाचे वांटेकरी म्हणून त्यांना एकमेकांबद्दल फार आदर वाटतो. मुलगा व नातवंडें यांच्याकडे पाहून त्यांना जो अभिमान व आनंद वाटतो, त्याची कल्पना प्रेमळ मातापितरांवांचून अन्यांना येणें नाहीं.

फोर्डच्या पत्नीला घराप्रमाणें समाजांतील मुलींना उत्तम वळण लावणें, व त्यांचें कल्याण करणें, ही कामगिरी फार आवडते. या समाजसेवेंत ती आपलें आयुष्य वेंचीत असते. आपल्या पतीप्रमाणेंच तीही विनोद-प्रिय आहे. एकदां इंग्लंडमध्यें असतांना हीं पतिपत्नी रोल्सरॉइस गाडींत बसून जात होतीं. तेव्हां लोक त्यांच्याकडे पाहून व बोटें दाखवून त्यांना ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें बोलूं लागले. यामुळें फोर्डला जरा चमत्कारिक झालें. तेव्हां त्याची पत्नी त्याला चिडविण्याच्या हेतूनें म्हणाली, " दुसऱ्या वेळीं आपण आपल्या फोर्डगाडींतच बसून जात जाऊं म्हणजे मग कोणी आपल्याकडे बघणार नाहीं. "

फोर्ड हा प्राटेस्टंट एपिस्कोपल धर्माचा आहे, पण त्याच्या कल्पना आकुंचित वृत्तीच्या मुळींच नाहींत. त्याचा धर्म तत्वप्रधान आहे असें म्हणण्यापेक्षां आचारप्रधान आहे म्हटलें तरी चालेल. तो म्हणतो, " इतर सर्व गोष्टींप्रमाणें धर्म ही एक अशी बाब आहे कीं, ती कृतींत उतरविली पाहिजे. स्वर्गापवर्गाचें अध्ययन करण्यांत पुष्कळ काळ दवडण्यांत मला कांहीं हंशील दिसत नाहीं." त्याच्या बायकोप्रमाणें तो नित्यनेमानें चर्चला जातोच, असें नाहीं. पण समाजसेवा करण्यांत मात्र दोघांचाही पाय पुढें असतो.

पुष्कळ क्रीडामंडळांचा, व अनेक संस्थांचा तो सभासद आहे. पण तो फार करून कुठें जात नाहीं. राजकीय बाबतींत तो आतां अगदीं स्वतंत्र बाण्याचा झाला आहे. पक्ष व उपपक्ष यांच्या खटपटीचा राष्ट्राला तितकासा उपयोग होत नाहीं, असें त्याचें ठाम मत असल्यामुळें पक्षभेदापासून अलिप्त राहण्याचाच त्याचा विचार असतो.

अंतःस्फूर्तीप्रमाणें वागणारा तो एक विचित्र माणूस आहे. कल्पनातरंगांत रंगणारा व भावनाप्रधान असा असलेला फोर्ड आपल्या प्रेरणे-

प्रमाणें सर्व गोष्टी करीत असतो. पुष्कळ अंशीं धडाडी, दीर्घोद्योग, प्रामाणिकपणा, उत्साह, चिकाटी, धैर्य, व आरंभींच्या अमेरिकन वसाहतवाल्यांचे गुण, त्याच्या ठिकाणीं उतरलेले आहेत असें दिसून येतें. त्याच्या हातून चुका होत नाहींत, असें थोडेंच आहे ? किती झालें तरी, तो मनुष्यच आहे व चुकीसही पात्र आहे. पण एकाद्या कामांत चुकी झाली म्हणजे त्या कामाचा नाद सोडून द्यायचा, हें त्याला ठाऊकच नाहीं. अन्य उद्योग करून ती गोष्ट साध्य करील, तेव्हां तो राहील. त्याची बुद्धी अलौकिक आहे व एकादें अवघड कामही सुकर करण्याची विद्या त्याला चांगली माहित आहे. एकादा भानगडीचा व घोटाळ्याचा प्रश्न तो हां हां म्हणतां सोडवितो व यांतच त्याच्या बुद्धीचा प्रभाव दिसतो.

फोर्डच्या अलौकिक कृतीवरून परीक्षा केली तर वॅट, ऑलिव्हर, मॅक्कार्मिक आणि एडिसन यांच्याच पंक्तीला तो बसतो, हें निर्विवाद आहे. जगांत स्तुती व निंदा करणारे असे दोन्ही प्रकारचे लोक असायचेच. त्याप्रमाणें फोर्डची स्तुति करणारेही अनंत आहेत, व त्याच्या राजकीय मताबद्दल त्याची निंदा करणारेही कांहीं कमी नाहींत. एका वर्तमानपत्राच्या बातमीदाराला फोर्डचें हास्यास्पद चित्र रंगविण्याविषयीं हुकूम झाला होता; पण तो म्हणतो, "फोर्डचें दर्शन झाल्यावर माझ्याकडून तसें करणें शक्य झालें नाहीं." यावरून एवढेंच दिसतें कीं, प्रांजलपणें त्याचा थोरपणा कबूल करणारे लोकही नाहींत असें नाहीं.

त्याच्या अलौकिक कृतींच्या गुल्लापुढें त्याच्या निंदकांना हार खावी लागते. खऱ्या विजयाची नौबत एकसारखी झडत असतां कुत्सित टीकाकारांनीं कितीही जोरानें कोल्हेकुई केली तरी ती ऐकायला कशी जाणार ? एकानें म्हटलें आहे " फोर्डच्या चमत्कारिक स्वभावामुळें त्याची निंदा करण्याचा प्रघातच पडलेला दिसतो, पण निःपक्षपातानें त्याच्या गुणदो-

षांचा विचार केला तर दोषांपेक्षां गुणांची संख्याच जास्त भरेल व त्याच्या पिढीच्या कोट्याधीशांत त्याचा दर्जा बराच वर लागेल यांत संशय नाहीं." सामान्य जनतेला तर फोर्डविषयीं फारच विलक्षण प्रेम वाटतें.

फोर्डच्या आयुष्याचें सारभूत तत्त्व पाहिजे असेल, तर सकलांठायीं विश्वास हें होय. या श्रद्धेमुळेंच त्याला चारी पुरुषार्थ साधतां आले, व याच श्रद्धेमुळें त्याला जगत्सेवाही करितां आली. "खरा विचार केला तर असें प्रत्ययाला येतें कीं, असल्याच श्रद्धेची जगाला जरूर आहे," असें त्यानेंही एकदां म्हटलें. त्याबरोबर 'श्रद्धा म्हणजे काय?' असा त्याला एकानें प्रश्न विचारला. त्याला त्यानें असें उत्तर दिलें, "आत्मविश्वास वाटणें, दुसरे लोक सत्याचरण करण्याचाच प्रयत्न करीत आहेत, असा विश्वास बाळगणें, आणि जग सन्मार्गानें प्रगतिपर होत चाललेलें आहे, अशी भावना ठेवणें याला श्रद्धा म्हणतात." या तत्त्वाप्रमाणें विचार केला तर "लोकांचें म्हणणें बरोबर आहे" या त्याच्या म्हणण्यानें लोकांच्या ठायीं असलेला त्याचा विश्वास व्यक्त होतो. "प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं चांगुलपणा असतोच असतो, असें मला वाटतें" असें त्यानें एके ठिकाणीं म्हटलेलें आहे. अर्थात् या कल्पना कांहीं नवीन नाहींत परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र होतांना दिसत नाहीं. त्यांना खरोखर मूर्तरूप देण्याची कामगिरी फोर्ड करतो. परंतु या बाबतींत त्याचें एक तत्त्व ठरलेलें आहे. तो म्हणतो, "जो आपल्याला मदत करतो त्यालाच मदत करा." म्हणजे लोकांच्या मदतीनें जो आपलें कल्याण करून घेतो, त्यालाच मदत दिली तर उपयोग. उगीच आळशावर गंगा लोटून काय करायचें? तेव्हां काम करायला जो मनुष्य माघार घेतो, तो मदत देण्यास त्याज्य समजावा. कामाच्या आवडीनें काम करीत रहाणारा अंतीं सुखी झाल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. म्हणून आपल्या कामाच्या रूपानें जो

लोकांच्या उपयोगी पडतो, तोच लोकांच्या मदतीस व सहानुभूतीस पात्र होतो. मजूरवर्गाची स्थिती सुधारण्यासाठीं त्याचे जरी अहर्निश प्रयत्न चालू आहेत, तरी तो पूर्ण व्यवहारज्ञानी आहे. तो म्हणतो "दारिद्र्य घालवायला कोणचेंही निरूपण उपयोगीं पडणार नाहीं व औषधानेंही त्याचा परिहार होणार नाहीं. केवळ अविश्रांत व कुशल कामाची मात्राच त्याचा नाश करण्यास समर्थ आहे."

जीविताकडे पहाण्याचीहि फोर्डची हीच दृष्टि आहे. सुखमय जीवन म्हणजे कांहीं एक ठराविक परिस्थिति नव्हे; तर जीवनाच्या आधारभूत तत्त्वांबरहुकूम काम करीत रहाणें, व एकसारखी प्रगति घडवून आणण्याची खटपट करीत रहाणें, याचें नांव जीवनयात्रा. त्याच्या मतें कर्तव्याला अंत नाहीं. "केलेल्या गोष्टीबद्दल मनुष्यांनीं स्तुती करण्यापलीकडे आपल्याला आणखी कांहीं करावयाचें उरलें आहे, असें ज्याला वाटत नाहीं, त्याचें जिणें संपलेंच म्हणायचें! यश हा शब्दसुद्धां आपल्या कर्तृत्वाला समाधि देणाराच शब्द आहे." तो एके ठिकाणीं म्हणतो कीं, "जीवित म्हणजे प्रवाह आहे. तो अखंड वहात असतो. आपण एकाद्या रस्त्यावर एकाद्या घरीं रहातों; पण त्या घरांत राहणारा मनुष्य कांहीं नेहमीं तोच असत नाहीं."

ही भावना त्याच्या ठिकाणीं बद्धमूल झाल्यामुळें त्याच्या आयुष्यांतील घडामोडींचें त्याला विशेष कांहीं वाटत नाहीं. "आयुष्यांत जर कांहीं सत्य असेल तर तो बदल होय! बदल होण्याइतका म्हातारा मनुष्य झाला कीं तो मरतोच." तसेंच "अंधपरंपरा व अंधविश्वास यांसारखे जगांत दुसरे शत्रू नाहींत. प्रत्येक पिढीच्या पुढें निरनिराळे प्रश्न उभे असतात, व प्रत्येक पिढीनें ते कसे सोडवायचे तें पाहिलें पाहिजे. आपले

वाडवडील ज्या गोष्टी करीत आले त्यांत आपल्याला किमपीही सुधारणा करितां आली नाहीं, तर आपल्या जगण्याचा तरी काय उपयोग ?"

सामान्यत: सर्वत्र चांगुलपणा व सत्यता भरलेली आहे असा जरी त्याचा विश्वास आहे, तरी कोणत्याही गोष्टीनें त्याचें समाधान मात्र होत नाहीं. उत्तरोत्तर मनुष्य जातीची प्रगतीच होत जावी, अशी त्याची इच्छा असल्यामुळें भूतकाळाविषयीं तो विचारच करीत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आज व उद्यां या जोडीकडेच त्याचें सगळें लक्ष वेधलेलें असतें.

कर्तृत्वावर तर त्याचा विश्वास आहेच, पण त्याहीपेक्षां जास्त विश्वास लोकसेवेवर आहे. प्रेम, मान किंवा जगांतील एकादी वस्तु मिळविण्याचें जर कोणतें एक हमखास साधन असेल तर ती लोकसेवा. नैतिक दृष्ट्या सेवेची किंमत जास्त आहेच, पण व्यावहारिक दृष्ट्यासुद्धां सेवा फायदेशीरच आहे. जो एकादी गोष्ट पुष्कळ लोकांच्या हिताची म्हणून करीत असतो, त्याला कांहीं कमी पडत नाहीं. स्वार्थबुद्धीनें केलेल्या प्रत्येक गोष्टीचें कटु फळ शेवटीं आपणालाच भोगावें लागतें. पण इतरांचें कल्याण केलें असलें तर प्रत्येक वेळां उलट आपलेंच कल्याण होतें, असा जगाचा अनुभव आहे. खरेंच आहे, कारण यंत्रांतील एका भागाला जी गोष्ट हितावह तीच इतरांना !" सेवेची व्याख्या तो अशी करतो, " सेवा म्हणजे उंची माल-मसाल्यापासून पुष्कळ मजुरी देऊन तयार करून फायद्यानें विकतां येण्या-सारखा कमी किंमतीचा पदार्थ होय." "याप्रमाणें माल तयार न करणाऱ्या कोणत्याही कारखानदाराला आपल्या धंद्यांत यश येईल, असें मला वाटत नाहीं."

जीरल्ड स्टॅन्ले ली म्हणतो, "फोर्डला वाटतें कीं आपण जितकें जितकें पुढें जाऊं, तितका लोकांचा फायदा अधिक होणार आहे, आणि हें सर्वस्वी

खरें आहे. पण याचा अर्थ असा नाहीं कीं, फोर्डची सेवा स्वार्थमूलक असते. त्यानें केलेल्या सेवेमुळें फायदा होतो ही गोष्ट खरी, पण फायद्यासाठीं सेवा नाहीं, तर सेवेचें फळ फायदा होय, हें तो पूर्णपणें जाणतो. म्हणूनच तो म्हणतो, " पैसा पैसा करून मला काय करायचें आहे ? पैसा माझ्या थोडाच उपयोगी पडणार आहे ? वीज खर्च केल्यानेंच ज्याप्रमाणें उत्तम प्रकाशाची प्राप्ति होते, त्याप्रमाणेंच द्रव्याचा सव्यय करण्यानेंच खरा उपयोग होणार आहे. म्हणून प्रत्येक माणसाला त्याचा उपयोग व्हावा, म्हणून मी माझा पैसा खेळता ठेवतों. दुसऱ्याचा तोटा करून आपलें हित साधणाऱ्या माणसाचें अनहित शेवटीं होणारच होणार हें नक्की समजावें.

त्याला स्वतःला कोणी उपकारकर्ता, दाता किंवा उदारधी म्हटलेलें मुळींच खपत नाहीं. तो म्हणतो, " मी दान असें कधींच देत नाहीं. ज्याच्यापासून उलट मला कांहीं मिळत नाहीं, त्याला मी कांहींच देत नाहीं. " याचा अर्थ असा कीं, तो एक प्रामाणिक व्यापारी आहे. तो म्हणतो " माणसाला स्वर्गांत नेण्याला समर्थ अशी जर कांहीं गोष्ट असेल तर ती सचोटी; आणि आपल्या पारलौकिक कल्याणास जर कांहीं उपयोगीं पडत असेल, तर इहलोकांतील आपल्या मनुष्यजातीची संपादन केलेली कृपाच होय. त्याच्या मतें खरा ध्येयवादी तोच, कीं जो दुसऱ्यासाठीं फायदा कमविण्याची खटपट करितो. "

तो जरी ध्येयवादी असला तरी शक्याशक्यतेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांपैकीं तो नाहीं. तो म्हणतो, " परमार्थ व व्यवहार हे दोन्ही अगदीं भिन्न आहेत असें लोक समजतात हीच चूक आहे. मी तर असें म्हणतों कीं, एकनिष्ठपणा, स्नेह व परोपकार करण्याची बुद्धि या गोष्टीच या जगांत फार महत्वाच्या आहेत, व त्या गोष्टी असल्या म्हणजे जगांतील

कोणचेही फायदे आपोआप मिळूं शकतात. जेव्हां विश्वबंधुत्वाच्या कल्पना व व्यावहारिक दूरदृष्टि यांच्यांत फरक नाहीं, असें लोकांना पक्कें कळेल तेव्हांच हांहां म्हणतां जगांतील सर्व भांडण व वाद नाहींसे होऊन, जगाचें रहाटगाडगें सुरळीत चाललें आहे, असें आपल्याला दिसून येईल. आतां मुख्य अडचण अशी आहे कीं, लोकांना आपलीं ध्येयें व्यवहारांत उतरविण्यास लागणारें धैर्य पुरेसें नसतें. ते म्हणतात, "खरें आहे, कल्पना फार चांगली आहे, हें आम्हांला कबूल आहे, पण तिला मूर्त स्वरूप कसें देणार?" मग ज्या कल्पनेला मूर्त स्वरूप देतां येत नाहीं,ती चांगली आहे, असें म्हणण्यांत तरी काय हंशील? जर कशाचा उपयोग असेल तर व्यवहारांत सिद्ध झालेल्याच कल्पनेचा. आज जगाची जी एवढी प्रगति झालेली आहे, तिचें कारणही मनुष्यांनीं श्रम करून आपल्या उत्तम कल्पना व्यावहारिक सिद्धतेच्या कक्षेंत आणून सोडल्या म्हणूनच."

यासाठींच चमत्काराविषयीं बोलतांना तो म्हणतो, "फक्त थोड्याच लोकांनीं अमलांत आणून दाखविलेल्या पुष्कळ लोकांच्या महत्वाकांक्षांनाच चमत्कार हें नांव शोभतें. सारांश, जॉन बरोनें फोर्डची व त्याच्या धूम-रथाची आणि मैदानयंत्राची तुलना केली आहे, तीच यथार्थ आहे असें दिसतें. तो म्हणतो "त्यांच्यावरून फोर्डची बरोबर ओळख होते. फार भव्य, संमिश्र, किंवा ओबडधोबड व अवजड नसून साधीं, सुटसुटीत व सर्वत्र कामास येणारीं अशीं तीं यंत्रें आहेत. त्यांच्याप्रमाणेंच फोर्ड ह्याच्या ठिकाणींही सद्गुण व सामर्थ्य यांचा उत्तम संगम होऊन तो एक उपकारशील, लोकप्रिय व लोकोत्तर पुरुष बनला आहे." त्याच्या तत्त्वा-प्रमाणें त्याचें आचरणही तंतोतंत बरोबर असतें. त्याचा जगड्व्याळ धंदा हेंच त्याच्या ध्येयासक्तीचें उत्तम उदाहरण होय. आणि विशेष लक्षांत ठेव-ण्याची गोष्ट ही कीं, आपल्या ध्येयसिद्धीसाठीं त्यानें कोणालाही दुखविलेलें

नाहीं, किंवा कोणाच्या कृपेचेंही तें फळ नव्हे, तर उच्च ध्येयावर नजर देऊन अविश्रांत सततोद्योग करण्यानेंच त्यानें तें फळ आपल्या हस्तगत केलें आहे. इतकेंच नव्हे तर अजूनही त्यानें आपल्या उद्योगाचा संन्यास घेतलेला नाहीं. तर शंका कुशंका, आशा निराशा, भय व जननिंदा यांना पायाखालीं तुडवून लोकसेवेचा कार्यध्वज हातीं घेतलेला हा विजयी वीरमणि अजूनही अतुल उत्साहानें आपला कर्तव्यमार्ग आक्रमित चालला आहे !

# संदेश !

—:०:—

या कर्मवीरापासून सर्व राष्ट्रांनीं जर कांहीं धडा घ्यावयाचा असेल तर युद्धापासून अलिप्त रहाण्याचाच. पुष्कळदां युद्धें गैरसमजुतीची पराकाष्ठा झाल्यामुळें उत्पन्न होतात; तर कित्येकदां स्वार्थसाधु लोक आपल्या स्वार्थासाठीं तीं उत्पन्न करतात. तो त्यांचा जणू काय धंदाच आहे ! पण त्यामुळें कांहींजण श्रीमंत झाले, तरी पुष्कळसे दरिद्री बनून धुळीला मिळतात ! म्हणून मानवजातीचे खरे हितकर्ते आपल्या बंधूंच्या प्राणांची आहुती देऊन स्वार्थ साधण्यास कधींही तयार होत नाहींत. मातांनीं आपल्या मुलांच्या मानेवर सुरी ठेऊन श्रीमंत होण्याची इच्छा धरणें जितकें अस्वाभाविक, तितकेंच खऱ्या जातिवंत देशभक्तांच्या मनांतही मनुष्यसंहार करून आपली तुंबडी भरण्याची कल्पना येणें अशक्य होय.

याचा अर्थ असा नाहीं कीं, शत्रूनें थोबाडींत मारली तर शांततेचा मंत्र जपत प्रत्येकानें दुसरा गाल पुढें करावा ! सामदामादि सर्व उपाय योजून शत्रूस वश करावा. परंतु मानवजातीच्या कल्याणासाठीं युद्ध करणें भाग पडलें, तर "हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्" ही भगवदुक्ति लक्षांत वागवून कायावाचामनेंकरून त्यांत युद्धाची कड लाविल्याशिवाय राहूं नये, असेंच त्याचें म्हणणें आहे.

युद्धाप्रमाणेंच परराष्ट्रीय व्यापाराविषयींचें त्याचें मतही सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो म्हणतो, "परराष्ट्रीय व्यापार म्हणजे हल्लीं एक भ्रामक समजुतींचा घोटाळा माजून राहिला आहे. प्रत्येक राष्ट्रानें शक्य तों स्वतःच्या पायावर उभें राहण्यास समर्थ व्हावें, अशीच आपली सदिच्छा

असली पाहिजे. परराष्ट्रांनीं आपल्या मालावर कायमचें अवलंबून रहावें, अशी इच्छा करण्यापेक्षां तो माल निर्माण करण्याचें त्यांनीं शिकावें व खरी सुधारणा घडवून आपली अभिवृद्धि करून घ्यावी अशी इच्छा ठेवणें वाजवी आहे. प्रत्येक राष्ट्राला ज्या वस्तू बनवितां येणें शक्य आहे, त्या बनविण्याची कला त्याला अवगत झाली, म्हणजेच व्यापारांत चढाओढ न रहातां एकमेकांच्या गरजा भागविण्याच्या स्वाभाविक व्यापाराच्या स्थितीला आपण पोहोंचूं. उष्ण कटिबंधांतील लोकांच्या विविक्षित माला-संबंधानें शीत कटिबंधांतील लोकांना चढाओढ करतां येणार नाहीं. आजच्या परराष्ट्रीय व्यापाराची मदार परदेशीय लोकांच्या अज्ञानावर आहे. आणि स्वार्थामुळें हें अज्ञान कायमचें जेणेंकरून टिकेल, तेंच करण्याची प्रत्येक राष्ट्राची धडपड आहे. अर्थात् कोणत्याही देशांतील लोक सज्ञान झाल्या-शिवाय तो देश सुधारणार नाहीं. "मेक्सिकन लोकांची उन्नति झाल्या-शिवाय मेक्सिको देशाची उन्नति होणें कठीण!" म्हणून परस्परांची सेवा म्हणजे व्यापार अशी त्याची व्याख्या आहे. आणि असा सेवामूलक व्यापार सुरू झाला म्हणजेच प्रत्येक राष्ट्र संपन्न राहून जगांत शांतता नांदूं लागेल.

फोर्डच्या मताप्रमाणें पाहिलें, तर सज्ञान नागरिक कोण याची कल्पना फारच हृदयंगम आहे. जो आपल्या स्मरणशक्तीनें इतिहासाच्या तारखा बिनचूक सांगतो, किंवा कांहीं विषयांचें ज्ञान आपल्या स्मृतीवर लिहून ठेवतो, त्या माणसाला सुशिक्षित म्हणतां येणार नाहीं; तर ज्याला विचार करतां येतो, ज्याला आपली बुद्धि कशी चालवावयाची, हें माहित झालें आहे, ज्याला आपल्या स्वतःच्या जोरावर एकादी गोष्ट संपादन करितां येते, तोच खरा सुशिक्षित होय. विश्वविद्यालयाच्या पुष्कळशा पदव्या असणारा, पण विचार करितां न येणारा मनुष्य खरा सुशिक्षित नव्हे. विचार करणें यासारखें दुसरें कठीण काम नाहीं आणि जगांत विचारवेत्ते इतके कमी क ां

असतात, याचेंही तेंच कारण होय. पुढल्या वर्षीं लोक काय करतील, याचें शिक्षण शाळेमध्यें मिळणें शक्य नाहीं; पण मागें लोकांनीं काय केलें, व त्यांचे प्रयत्न कसे फसले, यांचें जरी ज्ञान मुलांना झालें, तरी पुष्कळ झालें. कारण त्या अपयशाचा कटु अनुभव स्वतः घेण्याचें तरी त्यांच्या नशिबीं येणार नाहीं ! खरोखर ज्या शिक्षणानें मनुष्याला आपल्या सर्व शक्तींचा उपयोग कसा करावा हें कळतें, व तसा उपयोग करण्याचें सामर्थ्य उत्पन्न होतें, व जें त्याला विचारशील बनवितें, तेंच खरें शिक्षण होय. म्हणून विश्वविद्यालय हाच काय तो मन व बुद्धि यांचा विकास करणारा आखाडा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. कारण विद्यालयांतून बाहेर पडल्यावरच मनुष्याच्या खऱ्या विद्यार्थिदशेला आरंभ होतो. म्हणूनच आपल्या आयुष्याला एक प्रकारची शिस्त, एक प्रकारचें वळण लागतां लागतांच खरें शिक्षण मिळत असतें, असें त्याचें म्हणणें आहे.

ज्ञान याचा अर्थ गतकालीं कोणीं तरी जी गोष्ट मनुष्याला इंद्रियगोचर करून ठेविली, तिची माहिती असाच आहे. असें ज्ञान मनुष्याला वाटेल तेवढें आपल्या बुद्धिगर्भांत सांठवितां येईल. मात्र तशी त्याला इच्छा पाहिजे. अशा ज्ञानी किंवा विद्वान् माणसाचें मन म्हणजे भरगच्च भरलेली सिद्धांत-मंजूषाच होय. म्हणजे जरी मनांत ज्ञानाचे गठ्ठे रचले गेले असले, तरी त्याच्या मेंदूतून विचार स्फुरण पावतीलच असें नाहीं. एकादा मनुष्य जाडा पंडित अगर विद्वान् असेल, पण इतर दृष्टीनें कुचकामाचा असेल; तर एकादा मनुष्य विद्वान् नसतांही उपयोगी होईल. तेव्हां ज्ञानाचा नुसताच संग्रह करणें, यापासून विशेष कांहीं उपयोग नाहीं. तर मनुष्याच्या धारणपोषणास आपल्या शिक्षणानें काय मदत होते, हें पहाणें, हीच काय ती खऱ्या शिक्षणाची कसोटी आहे. एकादा मनुष्य आपल्या स्वतःचेंच तेवढें धारणपोषण करण्यास समर्थ असला

तर तो आपल्या पुरता सुशिक्षितच होय. जर तो शेकडों किंवा हजारों माणसांचा पोशिंदा असला, तर त्या मानानें त्याची किंमत जास्तच होणार. असा मनुष्य वाङ्मयमहोदधीमध्यें अवगाहन करून पुनीत झालेला असो अगर नसो, तो विद्वान् म्हणवून घेण्यास सर्वथैव पात्र आहे. कोणच्याही कार्यक्षेत्रांत कां होईना, मनुष्य जर पूर्ण तरबेज असेल, तर त्यानें आपली पदवी मिळविली, व सरस्वतिमंदिरांत त्यानें प्रवेश केला, असें म्हणायला हरकत नाहीं.

'लोकशाही' चाही हल्लीं बराच गाजावाजा चालू आहे. पण एक जुलमी सत्ता जाऊन दुसरी जुलमी सत्ता उत्पन्न होणें, असा त्याचा अर्थ लोकशाहीचे पुरस्कर्ते करतात कीं काय असा संशय येतो. फोर्ड म्हणतो, "ज्या कारभारांत प्रत्येक मनुष्याला त्याच्या कर्तृत्वाच्या मानानें अभ्युदयाची संधि मिळते, त्यालाच 'लोकशाही' हें नांव शोभतें. आज सर्व जगांत श्रीमंत आणि गरीब या दोन वर्गांत भयंकर लढा माजून राहिला आहे. मजूरपक्षाचीं वर्तमानपत्रें श्रीमंतवर्गावर यथेच्छ ताशेरे उडवितात, व श्रीमान् वर्गाचीं वृत्तपत्रें मजूरपक्षाचे वाभाडे काढतात. या दोन्ही प्रकारच्या लेखकांच्या लेखांमुळें वर्गावर्गांत द्वेष पसरतो. अर्थात् असली चळवळ अंतीं विध्वंसकच होते, असा अनुभव आहे.

संपांचें उदाहरण घेतल्यास असें दिसून येईल कीं, 'कामगारसंघा'च्या पुढाऱ्यांच्या चिथावणीवरूनच पुष्कळ वेळां संपांना उग्रस्वरूप प्राप्त होतें. 'कामगारसंघा'च्या फंडांतून त्यांचा पगार चालूच असल्यामुळें संपाच्या आपत्तीची झळ त्यांना लागत नाहीं. बिचारे गरीब लोक उपाशीं मरतात. पुष्कळदां हे पुढारी जनतेची सेवा बजावण्यापेक्षां संपाच्या आगींत तेल ओतून ती जास्त पसरवितात. 'आठ तासांचा दिवस झाला, तर सात तासांचा दिवस करण्याची ओरड करा. रोजीं १ रुपया मजुरी

मिळाली, तर दोन मिळण्याकरतां चळवळ करा; एवंच सारखी चळवळ करा.' हाच त्यांचा उपदेश! कारण अशा चळवळीवरच त्यांचें पोट भरणें, व त्यांची प्रसिद्धी होणें ह्या गोष्टी अवलंबून असतात. कामकरी वर्गाचा खरा पुढारी लोकांना उपाशीं मरण्याचा उपदेश न करितां काम करून पोट भरण्यासच सांगतो. कारण रिकामटेकडेपणानें पोट भरण्याची विद्या अजून कोणाला उपलब्ध झालेली नाहीं! आळशी बनून, किंवा काम न करून, कांहींच फायदा होत नाहीं. म्हणून सर्व उत्पत्तीचा जनक काम आहे.

अर्थात् ज्या वेळीं मालक नोकरांच्या स्वाभाविक हक्कांची पायमल्ली करीत असेल, व नोकरांना पिळून आपली तुंबडी भरण्यापलीकडे कांहींच करीत नसेल, त्या वेळीं संप करणें रास्त होईल, हें सांगण्याची जरूरीच नाहीं. परंतु सवलतीमागून सवलती मिळविण्यासाठीं वारंवार संप पुकारणें वेडेपणाचें आहे. त्यायोगें हजारों किंवा लाखों लोकांच्या तोंडचा घास नाहींसा होतो. आपलीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं संपाचें शस्त्र उपसणें घातुक आहे; कारण त्यायोगें काम बंद पडून आळशीपणाला उत्तेजन येतें. भावना उद्दीपित करणारीं भाषणें ऐकून सामान्य लोक विकारवश होतात, व पुढाऱ्यांच्या शिकवणुकीप्रमाणें धंद्याला राम राम ठोकतात ही गोष्ट खरी, पण तेरड्याच्या रंगाप्रमाणें मनांत क्षोभ पावलेल्या भावनांचा जोर फार दिवस टिकत नाहीं, आणि दुपारची भ्रांत पडूं लागली म्हणजे ब्रह्मांड आठवतें. तेव्हां उठल्या सुटल्या संप करण्याची भर देणारे पुढारी एक प्रकारचें पाप करतात, हें विसरूं नये.

बरें, मनुष्याचा कल श्रीमंत होण्याकडे असतो ह्या गोष्टीचा जरी विचार केला, तरी त्यामुळें लोकांना आळशी कसें बनतां येणार? जगांत

गरीब म्हणून राहिला नाहीं, व सर्वच लक्षाधीश झाले, अशी कल्पना केली, तरी त्यामुळें लोकांना काम करावें लागणार नाहीं, असें थोडेंच आहे? कांहीं लक्षाधीशांना शेतांत कुळव मारावा लागेल, कांहींना आग-गाड्या चालवाव्या लागतील व कांहींना गिरणींतही कावाडकष्ट करावे लागतील! असें न करतील तर लक्षाधीशावरही उपाशी मरण्याचा प्रसंग येईल! नुसते रुपये चाऊन खातां येणार नाहींत. तेव्हां या नाहीं त्या रूपांत भेदाभेद रहाणारच. समाजांत आत्यंतिक समता प्राप्त होणें दुर्घट आहे.

दुसरें असेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, नुसते द्रव्याचे ढीगच्या ढीग संपादन केले तरी त्या द्रव्याच्या मालकाला त्याचा फारसा उपयोग नाहीं. व्यक्तिशः विचार केला तर क्रोडोपतीलाही भिकाऱ्याप्रमाणेंच क्षुधाशमना-पेक्षां जास्त खातांपितां येत नाहीं! किंवा एकाच वेळीं एका खोलीपेक्षां जास्त जागेंत वावरतां येत नाहीं. तेव्हां निरुपयोगी द्रव्याला दगडापेक्षां काय किंमत असणार? परंतु ज्या धनिकाच्या मनांत लोकसेवेची स्फूर्ती उत्पन्न होते, सामान्य माणसाच्या आवांक्यावाहेरच्या प्रचंड कल्पनांना मूर्त रूप देण्याचे बेत ज्याच्या मनांत घोळत असतात, उद्योगाच्या बळा-वर ह्या वसुंधरेला अमरपुरीचें सौंदर्य मिळवून देण्याची ज्या धनिकाची महत्वाकांक्षा असते, आणि सामान्य जीवनक्रमाच्या वेलीला चारित्र्याचें पाणी देऊन सद्गुण-सामर्थ्याचें मनोहर व सुगंधी पुष्प निर्माण करण्याची मनोवृत्ती ज्या धनिकाच्या अंतर्यामीं तेवत असते, त्याचें द्रव्य म्हणजे सकळ शक्तींचें बीज होय हेंच खरें. त्या बीजाचीं अनंत फळें सर्वांनाच सूर्यप्रकाशाप्रमाणें उपकारक झाल्याशिवाय रहात नाहींत. कारण द्रव्याचा सद्व्यय केल्यास प्रत्येकाला लागणारें अन्नवस्त्रच काय, पण वाटेल तो पदार्थ देण्यास ही भूमाता समर्थ आहे.

सारांश, हेन्री फोर्डचीं मतें जरी प्रथमदर्शनीं चमत्कारिक दिसलीं तरी विचाराअंतीं सत्य व हितकारक असल्याचें आढळून येईल. प्रत्येक महाराष्ट्रीयानें, प्रत्येक हिंदी तरुणानें, फार काय, प्रत्येक उत्साही पुरुषानें हेन्री फोर्डच्या उपदेशाचें मनन करून त्याबरहुकूम आचरण केल्यास ऋद्धि-सिद्धि त्याला वरतील, यांत काय संशय ? कारण 'आधीं केलें आणि मग सांगितलें' असा फोर्डचा अधिकार आहे. ही अधिकारी आणि अनुभविक वाणी गर्जून सांगते कीं, "उद्योगी तरुणांनों, सृष्टीचे तुम्ही दास नाहींत ! तर सृष्टि तुमची दासी आहे. चराचर वस्तूवर तुमची मालकी आहे; कर्तुमकर्तुम् शक्ति तुमच्या ठिकाणीं भरलेली आहे. वाटेल त्या मार्गानें मानवजातीच्या कल्याणार्थ झटा, एकसारखे श्रम करा, म्हणजे विश्वकर्म्याची शक्ति तुमच्या ठिकाणीं स्फुरण पाऊन, वाटेल तें करण्यास तुम्ही समर्थ व्हाल. श्रद्धा ठेवा आणि कार्याला लागा. मनुष्याला सर्व कांहीं शक्य आहे."

समाप्त

RFFBK-0003879